शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र

(सत्र ३ : अभ्यासपत्रिका ३)

सभासदाची बखर व अनुवादप्रक्रिया

(सत्र ४ : अभ्यासपत्रिका ५)

वाणीकिडे व अनुवादप्रक्रिया

द्वितीय वर्ष : कला

मराठी : ऐच्छिक

(शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून)

ISBN- 978-81-8486-541-7

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०१४
बी.ए.भाग–२ (मराठी ऐच्छिक)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

☐ **प्रती : ३,०००**

☐ **प्रकाशक :**
डॉ. डी. व्ही. मुळे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ **मुद्रक :**
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ ISBN- 978-81-8486-541-7

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

★ दूर शिक्षण विभाग–विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सल्लागार समिती

प्रा. डॉ. एन. जे. पवार
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. पी. प्रकाश
मा. कुलगुरू,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ, हैद्राबाद

प्रा. डॉ. के. एस. रंगाप्पा
मा. कुलगुरू,
मानसगंगोत्री विद्यापीठ, म्हैसूर

प्रा. डॉ. आर. कृष्णा कुमार
मा. कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर डॅमजवळ, नाशिक

मा. प्राचार्य डॉ. ए. एस. भोईटे
प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २, ११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

डॉ. अनिल गवळी
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. आर. जी. फडतरे
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. डी. व्ही. मुळे
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. एम. ए. काकडे
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. अरुण भोसले (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. अनिल पांडुरंग गवळी**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. राजन गवस**
  प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. एकनाथ बाबूराव आळवेकर**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. सुनील वामन चंदनशिवे**
  राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, सदर बझार,
  कदमवाडी रोड कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सुमन कृष्णाजी चव्हाण**
  विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली
- **डॉ. शिवाजी महादेव होडगे**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. संजय दशरथ पाटील**
  दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कुंभार**
  नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. बळवंत तुरंबेकर**
  डी. आर. माने महाविद्यालय, कागल

अभ्यास घटकांचे लेखक : सत्र तिसरे **सभासदाची बखर व अनुवादप्रक्रिया**	
लेखक	**घटक शीर्षक**
प्रा. डॉ. विश्वास शंकरराव पाटील राधानगरी महाविद्यालय, राधानगरी	१. सभासद बखर : शिवचरित्र
डॉ. गिरीश मोरे राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी	२. सभासद बखर : प्रसंगचित्रे
प्रा. एस. व्ही. सुतार स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे	३. सभासद बखर : भाषाविशेष
डॉ. नंदकुमार मोरे मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	४. अनुवादप्रक्रिया (अनुवाद, भाषांतर आणि रुपांतर, अनुवादकाचे गुण व पूर्वतयारी
सत्र चौथे **वाणीकिडे व अनुवादप्रक्रिया**	
प्रा. प्रशांत गायकवाड श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर	१. वाणीकिडे : आशयसूत्रे
प्रा. संजय पाटील दूधसाखर महाविद्यालय, बिद्री	२. वाणीकिडे : आशय
डॉ. तातोबा बदामे पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव	३. वाणीकिडे : अभिव्यक्ती
डॉ. नंदकुमार मोरे मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	४. अनुवादप्रक्रिया (जाहिरातीच्या अनुवादाचे स्वरूप बातमीच्या अनुवादाचे स्वरूप)

■ **संपादक** ■

प्रा. एस. व्ही. सुतार
स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

डॉ. अनिल गवळी
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रास्ताविक

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. भाग २ या वर्षासाठी मराठी विषयासाठी गद्य अभ्यासपत्रिकेअंतर्गत सभासदाची बखर अर्थात कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र ही शिवाजी महाराजांचे चरित्र कथन करणारी बखर सत्र तीन अभ्यासपत्रिका तीनसाठी पाठ्यपुस्तक म्हणून नियुक्त केली आहे. तर वाणीकिडे हा निशिकांत गुरव यांचा कथासंग्रह सत्र चारसाठी व अभ्यासपत्रिका पाचसाठी नियुक्त केला आहे. त्याचप्रमाणे सत्र तीन व चारसाठी अनुक्रमे अनुवादप्रक्रिया हा घटक १. अनुवाद, भाषांतर आणि रुपांतर, २. अनुवादकाचे गुण व पूर्वतयारी, ३. जाहिरातीच्या अनुवादाचे स्वरूप, ४. बातमीच्या अनुवादाचे स्वरूप या उपघटकानुसार अभ्यासक्रमात उपयोजित मराठी अथवा व्यावहारिक मराठी म्हणून अभ्यासाला लावला आहे.

सभासदाची बखर ही डॉ. र. वि. हेरवाडेकर यांनी संपादित केलेली आहे. काळाच्या आणि इतिहासाच्या कसोटीनुसार सभासद बखर ही शिवचरित्रासाठी अत्यंत विश्वसनीय व वास्तवप्रामाण्य राखणारी अशी बखर आहे. इ.स. १६९७ मध्ये ती कृष्णाजी अनंत सभासद याने लिहिली आहे. कृष्णाजी सभासद हा शिवाजी महाराजांच्या दरबारात इ.स. १६६८ पासून कार्यरत असल्याने त्याने शिवाजी महाराजांच्या जीवनातील घटना व प्रसंग पाहिलेले आहेत. त्याचा तो साक्षीदार आहे. सभासदाने लिहिलेले हे शिवचरित्र एकूण ७१ प्रसंगांचे आहे. परिच्छेदाच्या स्वरूपात ते लिहिलेले असल्याने वाचकांना अत्यंत सुबोध वाटते. सभासदाने प्रसंग-घटनांची दिलेली माहिती, व्यक्तीची नावे, स्थळांची नावे तसेच घटनांचा क्रम या गोष्टी बऱ्याच अंशी विश्वसनीय आहेत. अर्थात काही बाबतीतच मतभेद होतील. शिवाजी राजांचा मुत्सद्दीपणा, त्यांचा दृष्टिकोण, राज्यकारभार, राजांचे धाडस, शौर्य या साऱ्या गोष्टींचे यथोचित वर्णन सभासद करतो. वाङ्मयाच्या दृष्टीनेही ही बखर उत्तम आहे. छोटी छोटी वाक्ये, काही वेळा उपमासारख्या अलंकाराचा वापर, उर्दू भाषेतील लकबी यांनी या बखरीला काही वाङ्मयीन गुण प्राप्त झालेले आहेत. काही अद्‌भूत प्रसंग आले आहेत मात्र त्या त्या काळानुसार तो एक श्रद्धेचा भाग ठरतो. शिवकाळ व शिवचरित्र यासाठी सभासद बखर हा ग्रंथ उत्तम आहे.

वाणीकिडे हा निशिकांत गुरव यांचा कथासंग्रह राज्य पुरस्कार प्राप्त असून समकालीन मध्यमवर्गीय जीवनाचे दर्शन घडवितो. या कथासंग्रहातील कथा शहर व ग्रामीण भागात घडतात. त्यातील माणसांचे जीवन हे मध्यमवर्गीय जीवनजाणिवा प्रकट करते. एकूण तेरा कथांतून त्यांनी हे जीवन उभे केलेले आहेत. साधारणतः १९८० ते २००० या काळातील भारतातील, महाराष्ट्रातील, पश्चिम महाराष्ट्रातील माणसांचे जीवन एका विशिष्ट पद्धतीचे आहे. इ.स. २००० नंतर पुन्हा जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाचे

विविध परिणाम मानवी जीवनावर उमटले. आपल्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. त्यामुळे आपला समकाळ सतत बदलतो आहे. ऐंशीच्या दशकातील एखाद्या कुटुंबाचे जीवन आज आपणास वेगळे वाटते, असे असले तरी त्या काळाच्या काही गोष्टी चटकन पुसता येत नाहीत. दुःख, बेकारी, व्यसन, शेतीचे व्यवहार अशा काही बाबतीत उलट एक प्रचंड अस्वस्थता आलेली आहे. म्हणूनच या कथा आपणास आजही आपल्या वाटतात.

अनुवाद प्रक्रिया या घटकातून आताच्या गतिमान काळात विद्यार्थ्यांना हवे असणारे अनुवादाचे कौशल्य अल्प का होईना प्राप्त व्हावे यासाठी जाहिरात व बातमीचा अनुवाद हे प्रात्यक्षिकाचे घटक अंतर्भूत केलेले आहेत. प्राचीन व अर्वाचीन गद्य म्हणजेच वाङ्मयाच्या अभ्यासाबरोबर जीवनात आवश्यक असणारे अधिकचे ज्ञान यातून प्राप्त होईल. आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

संपादक

प्रा. एस. व्ही. सुतार
स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

डॉ. अनिल गवळी
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
कला व ललितकला अधिष्ठाता,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अनुक्रमणिका

तृतीयसत्र : अभ्यासपत्रिका क्रमांक ३		पृष्ठ क्रमांक
घटक १	सभासद बखर : शिवचरित्र	१
घटक २	सभासद बखर : प्रसंगचित्रे	२७
घटक ३	सभासद बखर : भाषाविशेष	४६
घटक ४	अनुवादप्रक्रिया	५५

चतुर्थसत्र : अभ्यासपत्रिका क्रमांक ५		पृष्ठ क्रमांक
घटक १	वाणीकिडे : आशयसूत्रे	७७
घटक २	वाणीकिडे : आशय	९७
घटक ३	वाणीकिडे : अभिव्यक्ती	११७
घटक ४	अनुवादप्रक्रिया	१४३

■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयं अध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पुरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१४-१५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भ पुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र ३ : घटक १

सभासद बखर : शिवचरित्र

१.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- शिवाजी महाराजांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व कळेल.
- शिवाजी महाराजांचा मुत्सद्दीपणा लक्षात येईल.
- शिवाजी महाराजांचा दूरदृष्टिकोन समजेल.
- शिवाजी महाराजांची राजनीती लक्षात येईल.
- शिवाजी महाराजांनी सामान्यांमध्ये निर्माण केलेले राष्ट्रप्रेम समजून येईल.
- सभासद बखरीद्वारे आपणास शिवकालीन भाषाशैलीची ओळख होईल.

१.२ प्रास्ताविक

यादवकालानंतर सुमारे साडेतीनशे वर्षांनी बखर वाङ्मयाच्या रूपाने मराठी गद्याचा नवा आविष्कार जन्माला आला. 'खबर' या अरबी शब्दाचा अर्थ वार्ता, माहिती किंवा समाचार असा असून त्या शब्दांचा वर्णविपर्यय होऊन 'बखर' हा शब्द मराठीत रूढ झाला आहे. शिवरायांच्या रूपाने मराठ्यांच्या पराक्रमाला उधाण आले होते. शौर्याच्या कथा लिहिल्या जाऊ लागल्या होत्या. त्यांचा भावनिक आविष्कार पोवाड्यांप्रमाणेच बखरींमधूनही झाला. मुसलमानांच्या दैनंदिन नोंदी 'तवारिखा'तून दिसतात. त्याच प्रकारे आपले वंशचरित्र सांगण्याच्या हेतूने बखरी लिहिल्या आहेत. बखरकारांनी सत्य आणि कल्पना यांचा सुंदर मिलाफ 'बखर' लिहिताना केलेला दिसून येतो. हे ध्यानात घेऊनच श्री. वा. सी. बेंद्रे यांनी 'बखरी म्हणजे चरित्रग्रंथ' असे म्हटले आहे ते खरेच आहे.

कृष्णाजी अनंत सभासद-विरचित शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर) ही शिवचरित्राची ऐतिहासिक प्रामाण्याच्या अनुषंगाने विश्वासू बखर आहे. शिवकाळातील शिवकालीन विषयावरील हे पहिले चरित्र होय. शिवचरित्रातील घटना हा याचा विषय असून सुरुवातीस शिवाजीच्या पूर्वजांची माहिती देऊन नंतर शिवचरित्र सांगितले आहे. प्रस्तुत चरित्रात शिवाजींच्या आयुष्यातील ७१ प्रसंग सांगितले आहेत. ही बखर श्रीमंत राजाराम महाराज यांच्या राजाज्ञाने झालेली आहे, तर फलश्रुती सांगून शेवट केलेला आहे.

प्रस्तुत बखरीमध्ये शिवाजींच्या जन्मापासून ते छत्रपतींच्या देहावसानापर्यंत शिवचरित्राची मांडणी करण्यात आलेली आहे. बखरीतील अद्‌भुत प्रसंगाची वर्णने हा शिवचरित्रविषयक बखरीचा विशेष, याही

चरित्रात दिसतो. या चरित्रातील व्यक्तिवर्णने वेधक आहेत. ही वर्णने दोन प्रकारची आढळतात. १) साक्षात पद्धतीची व्यक्तिवर्णने २) प्रतिबिंबात्मक पद्धतीचे व्यक्तिचित्रण होय. या चरित्रातील प्रसंगवर्णनेही परिणामकारक आहेत. वर्ण्यप्रसंग आपल्या नजेसमोर प्रत्यक्ष घडत आहे, असे वाटावयास लावणारा चित्रगुण चरित्रकाराच्या लेखनात आढळतो. तसेच वस्तुवर्णने समर्पक अशी आहेत. उदात्तता हा वाङ्मयीन गुण या चरित्रात आढळतो. जीवनातील मांगल्य, जीवनातील सत्य व जीवनातील सौंदर्य ही उदात्ततेची विविध अंगे होत. शिवाजींसारख्या आदर्श ऐतिहासिक पुरुषाचे चरित्र हे मुळातच उदात्त स्वरूपाचे आहे. विषयाच्या उदात्ततेप्रमाणे त्याची मांडणीही तितक्याच उदात्तपणे झालेली प्रस्तुत चरित्रात दिसून येते.

व्यक्तिमत्त्व हा लेखनाचा गाभा तसेच संयम व आवेश या शैलीगुणामुळे प्रस्तुत चरित्र रमणीय झाले आहे. बखरलेखनाच्या दृष्टीने शिवकाल महत्त्वाचा होय. शिवपूर्वकालात बखरीचे लेखन झाले असले तरी शिवकालापासून त्याला एक विशिष्ट स्वतंत्र वळण लागले; किंबहुना मराठी बखरींची खरी परंपरा सभासदाच्या बखरीपासून निर्माण झाली आहे. स्वराज्य संस्थापकाचे मराठीतले पहिले समकालीन चरित्र म्हणून ऐतिहासिकदृष्ट्या सभासदाची बखर महत्वाची ठरते. त्याचप्रमाणे साहित्यगुणसंपन्न अशा या बखरीला मराठी गद्य वाङ्मयाच्या इतिहासातही अढळ असे स्थान प्राप्त झाले आहे.

शिवचरित्राचे विश्वसनीय साधन या नात्याने सभासदाच्या बखरीचे स्थान सर्वाधिक महत्त्वाचे आहे. शिवाजी महाराजांचे जीवन, त्यांची राजनीती आणि राज्यकारभार पद्धती यांचे साक्षेपाने ओळख करून देण्याचे कार्य सभासदाने या बखरीत केलेले आहे.

१.३ लेखक परिचय

चरित्रकार कृष्णाजी अनंत सभासद हे १६६८ पासून शिवाजींच्या राज्यकारभारात प्रविष्ट असावेत. ते त्यांना राजारामाच्या पदरी असून शिवाजींच्या काळातील चांगली माहिती असावी, असे बखरीच्या प्रारंभावरून दिसते. कृष्णाजी अनंताचे घराणे साताऱ्यानजीक वसंतगडचे. त्यांचे गोत्र कश्यप व उपनाव हिरेपारखी असे होते. राजारामाबरोबर जी अत्यंत विश्वासू निवडक मंडळी जिंजीच्या प्रयाणाच्या वेळी गेली त्यात चरित्रकार कृष्णाजीपंत होते.

या बखरीचे संपादक डॉ. र. वि. हेरवाडकर आहेत. डॉ. हेरवाडकरांनी ही बखर पुस्तकरूपाने प्रकाशित करून वाङ्मयीन दृष्टिकोनातून केलेला बखरीचा सविस्तर अभ्यास मराठी वाचकांसमोर ठेवला आहे. डॉ. हेरवाडकरांनी आपल्या संपादनपद्धतीची एक आखीव चौकट निश्चित करून ठेवलेली आहे.

डॉ. हेरवाडकरांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये सभासद बखरीची सर्व अंगानी अतिशय अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली आहे. ही प्रस्तावना आणि अर्थनिर्णयात्मक व स्पष्टीकरणात्मक टिपा यामुळे त्यांनी संपादित केलेली ही बखर जिज्ञासू आणि अभ्यासक या दोघांनाही उपयुक्त ठरणारी आहे.

१.४ विषय विवेचन

बखर वाङ्मयाचा अभ्यास करताना त्यातील इतिहासापेक्षा वाङ्मयीन गुणवत्तेला अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. त्यातील घटनाक्रम अचूक असत नाही. तसेच स्थल आणि व्यक्तिनामेही चुकीची आढळून येतात. याबरोबरच चरित्रनायकाचे उदात्तीकरण केलेले पाहायला मिळते. त्याच्या युद्धाची तुलना रामायण-महाभारतातील युद्धाशी केली जाते. अद्‌भूत आणि चमत्कारिक प्रसंग घुसडले जातात हा पौराणिक आख्यानांचा प्रभाव असतो; ते ध्यानात घ्यावे लागते.

सभासद बखर ही शिवछत्रपतींची चरित्रपर बखर आहे. या बखरीमध्ये शिवाजी महाराजांच्या बालपणापासून ते देहावसानापर्यंतचा भाग चरित्ररूपाने येतो. तसेच शिवाजी महाराजांचे उतुंग व्यक्तिमत्व त्यांचा दूरदृष्टीपणा, राज्यकारभारविषयक धोरण, राजनीती, त्यांनी सर्वसामान्य लोकांमध्ये निर्माण केलेले राष्ट्रप्रेम, शिवाजी महारांजाची युध्दनीती, मुत्सद्दीपणा इत्यादी गोष्टींचा आपल्याला परिचय होतो. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य, त्यांचा गनिमी कावा, त्यांनी केलेल्या स्वाऱ्या, जलदुर्गविषयी धोरण इत्यादी गोष्टींचा आढावा या बखरीमध्ये घेतलेला आहे. त्याचा आपल्याला अभ्यास करावयाचा आहे.

शिवचरित्रविषयक साधने

शिवकालातील व शिवाजीच्या जीवनावरील महत्त्वाची बखर म्हणून शिव-छत्रपतींचे चरित्र अर्थात सभासद बखरीचा उल्लेख करावा लागतो. याशिवाय शिवाजी महाराजांची बखर, एक्क्याण्णव कलमी बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र, मराठी साम्राजाची छोटी बखर, शिवदिग्विजय, शिवप्रताप, शेडगावकर बखर, भोसलवंशचरित्र, राजवाडे खंड ४ मधील शिवाजीची हकीकत, बुंदेल्याची बखर, मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचे वृत्त, रायरीची बखर व मराठ्यांची बखर इत्यादी बखरीतून शिवाजींची चरित्रविषयक माहिती मिळते.

शिवाजींचे घराणे

हे घराणे मूळचे चितोडच्या सूर्यवंशीय सिसोदे रजपूतांपासून निर्माण झाले. इ.स. १३०३ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने चितोड काबीज केल्यावर राणा घराण्यातील सज्जनसिंह व क्षेमसिंह दक्षिणेत आले. त्यांच्यापासून घोरपडे व भोसले या दोन शाखा उत्पन्न झाल्या. यापैकी भोसले घराण्यात इ.स. १५३० मध्ये बाबाजीचा जन्म झाला. त्यांना मालोजी आणि विठोजी ही दोन मुले होती. मालोजीचा जन्म १५५२ मधला. हे दोघेही भाऊ लखुजी जाधवाच्या आश्रयाखाली निजामशाहीत लष्करात होते. दोघेही शंभुमहादेवाचे भक्त होते. मालोजीस दोन मुले झाली. एक शहाजी (१५९४) व दुसरा शरीफजी. शहाजीचा विवाह निजामच्या मध्यस्थीने लखुजी जाधवांची कन्या जिजाबाईशी इ.स. १६०४ मध्ये झाला. त्यांना संभाजी व शिवाजी (१६२७) हे दोन पुत्र तर दुसऱ्या बायकोला व्यंकोजी हा मुलगा होता. शहाजी राजे बेंगळूरहून विजापूरला येत असताना बोगदरी या गावात घोड्यावरून पडून त्यांचा मृत्यू झाला. आपला पराक्रम पाहायला वडील राहिले नाहीत म्हणून शिवाजी महाराजांना मोठे दुःख होते. जिजाबाईला सती जाण्यापासून ते रोखतात.

शिवाजींना पहिली पत्नी, सईबाईपासून इ.स. १६५७ ला संभाजी हा मुलगा झाला, तर दुसरी पत्नी सोयराबाई, हिच्यापोटी इ.स. १६७० मध्ये राजारामाचा जन्म झाला. त्याचे प्रतापराव गुजर यांची कन्या जानकीबाईशी लग्न झाले. शिवाजींनी शालिवाहन शके १५९६, ज्येष्ठ मासी, शुद्ध १३ च्या मुहूर्तास (इ.स. १६७४) गागाभटाकडून आपला राज्याभिषेक करवून घेतला. यानंतर त्यांनी अष्टप्रधानांची नियुक्ती केली. पुढे सहा वर्षांनी म्हणजे शालिवाहन शके १६०२ (इ.स. १६८०) ला महाराजांचे देहावसान झाले. अशा प्रकारे या घराण्याची चरित्रात्मक माहिती आहे.

शिवाजीचा जन्म व बालपण

याबद्दल बखरकार सभासद असे म्हणतो की, शहाजीच्या प्रथम पत्नी जिजाबाई यांचे पोटी शिवाजीचा जन्म होताच शंभू महादेवाने स्वप्नात येऊन मी स्वतः जन्म घेत आहे, असे सांगितले. कालातंराने शहाजीराजे कर्नाटकात बंगळूर येथे असल्याने जिजाबाई व शिवाजी यांना पुण्याची जहागिरी सांभाळण्यासाठी सहसैन्य पाठविले. जिजाबाई व शिवाजी जेव्हा पुण्यास आले तेव्हा तेथील स्थानिक देशमुख, देशपांडे यांनी पुंडावा करून प्रदेश स्वतःच्या ताब्यात घेतलेला होता. वाडे-हुडे बांधून स्वतःचा कारभार करीत होते. त्यांचा बंदोबस्त करून शिवाजीने त्यांना सामान्य रयतेसारखे घरात राहणे भाग पाडले व कधी प्रेमाने तर कधी जबरदस्तीने, तर कधी देशप्रेमाची शिकवण देऊन राष्ट्रकार्यास जुंपले. प्रदेश स्वतःच्या ताब्यात घेतला, या पाठोपाठ जहागिरीतील किल्ले जे मध्यवर्ती प्रशासनाकडे होते (आदिलशहाकडे) ते सावधपणे कमीत कमी नुकसान सहन करून ताब्यात घेतले. अशारितीने बारा मावळावर स्वतःचा अंमल चालू केला. सैन्य वाढविले. त्यामुळे स्वराज्य विस्तारासाठी प्रदेश जिंकण्याची गरज निर्माण झाली.

शिवरायांनी मावळ प्रदेशातील तोरणा जिंकून स्वतःची पहिली राजधानी स्थापन केली. पाठोपाठ राजगड बांधला. स्वराज्य विस्तारासाठी जावळीच्या चंद्रराव मोरे यांना आवाहन केले. मात्र, त्यांनी स्वराज्यात येण्यास नकार दिला. म्हणून निवडक सैन्य घेऊन शिवरायांनी जावळीवर चाल केली व चंद्ररावचा पाडाव करून जावळी काबीज केली. तेथे प्रतापगड किल्ला वसविला. शिवथर खोरे जिंकले. पाठोपाठ शृंगारपूरचे राज्य जिंकले.

शिवाजीच्या या कृत्याचा परिणाम म्हणजे आदिलशहाने शहाजीस जाब विचारला व शिवाजीचा बंदोबस्त करण्यास सांगितले. मात्र, शिवाजी माझ्या जवळून पळून जाऊन पुण्यात हुकमत करतो, तो माझे ऐकत नाही, असे उत्तर पाठवून आपणच त्याबाबत योग्य ती कारवाई करावी, असे शहाजीराजेंनी सांगितले.

अफजलखानचा वध

शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी महमंद आदिलशहाची बडी बेगम सुलतान हिने सर्व सरदारांसमोर विचारणा केली की, शिवाजीचा बंदोबस्त कोण करतो यावर अफजलखान याने ''शिवाजी काय? चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो'' असे सांगितले. बडी बेगमने त्याचा सत्कार करून मातब्बर सरदार, मोठी फौज सोबत देऊन पाठविले. अफजलखानाने कृष्णाजी भास्कर यास वकील नेमून शिवाजींशी

बोलणी करण्यासाठी पाठवून त्याच्यामार्फत निरोप दिला की, तुम्ही मला भेटलात तर मी तुम्हास आदिलशहाकडून जहागिरी देतो, तळकोकणचे राज्य देतो. तुमच्या वडिलांचा व माझा जुना स्नेह आहे, म्हणून मी तुमच्याबाबत आदिलशहाकडे रदबदली करतो, असा निरोप देऊन शिवाजीस आपल्या भेटीस येण्यास सांगितले.

याच अफजलखानाने शिवाजीचे ज्येष्ठ बंधू संभाजी यास कतकगिरी येथे खोट्या लढाईत मारले होते. याचा विचार करून खानाच्या प्रचंड फौजेशी समोरासमोरची लढाई अत्यंत नुकसानकारक आहे, हे ध्यानात घेऊन शिवाजीने जावळीस (प्रतापगडी) जाणे पसंत केले. अफजलखानाच्या भेटीत जरी काही माझ्या जिवाचे बरे वाईट झाले, तर मातोश्रीच्या आज्ञेत सर्वांनी वागावे. पुढे राज्य करण्यास पुत्र संभाजी आहे, अशी तजवीज करून व गनिमीकाव्याची रणनीती आखून शिवराय प्रतापगडास गेले. या समयी ''श्री प्रसन्न जाहली, आता अफजलखान मारून गर्दीस मेळवितो'' असे बखरकार अनंत सभासद लिहितो.

राज्याची व्यवस्था लावून सर्व लष्कराला योग्य कामगिरी देऊन मी खानास विश्वास लावून जवळ आणतो. नेताजी पालकरने घाटमाथा सांभाळणे व रघुनाथ बल्लाळ, मोरोपंत पेशवे, शामराव नाईक व त्र्यंबक भास्कर या सेनाधिकाऱ्यांना योग्य कामगिरी सांगून शिवरायांनी गोपीनाथपंत या आपल्या वकिलास सर्व प्रकारे वचने देऊन, गोड बोलून युक्तीने खानास जावळीस आणण्यास पाठविले.

अफजलखानाच्या छावणीत गोपीनाथपंत यांनी 'राजे तुम्हा वेगळे नाहीत. जसे शहाजी महाराज तसेच तुम्ही म्हणूनच तुम्ही जावळीस भेटीस या असा आग्रह धरला'. 'शिवाजी घाबरणारा आहे तसेच तो युद्धास तयार नाही. त्यामुळे तो वाईत येऊन भेटणार नाही, तुम्हासच जावळीत भेट घ्यावी लागेल'. हे लक्षात घेऊन अफजलखानाने जावळीस येऊन भेटण्याचे मान्य केले.

भेटीची योजना

प्रतापगडच्या पायथ्याशी उत्तम प्रकारे सजवून भेटीसाठी तयार केलेल्या शामियानात शिवाजी महाराज व अफजलखान यांची एकांती भेट निश्चित झाली. यावेळी शिवरायांनी आपल्या सर्व लष्कराला भेटीनंतरच्या तोफांच्या आवाजाच्या इशारतीची कल्पना दिली. (जेव्हा तोफांचा आवाज होईल तेव्हा घाटमाथ्यावरील सैन्यांने खानाच्या लष्करावर हल्ला करावा.) स्वतः शिवाजींनी भेटीसाठी तयारी केली. जागोजागी झाडीत निवडक सैन्य ठेवले. अंगात चिलखत घालून त्यावर जरीचा कुडता घातला. डोक्यावर मंदिल (फेटा) बांधला. हातात बिछवा व वाघनख्या घातल्या. सोबत जिवा महाला व संभाजी कावजी या तलवारबहाद्दर सैनिकांना घेतले व भेटीसाठी गडावरून शामियानाकडे निघाले.

अफजलखान आपल्या लष्करी तळावरून भेटीसाठी निघाला. त्याने सोबत दीड हजार सैन्य घेतले; पण इतके सैन्य नेल्यास राजा घाबरून भेटणारच नाही म्हणून सैन्य वाटेतच बाणाच्या अंतरावर एक – एक ठेवून पालखीतून तुम्ही चलावे, असे गोपीनाथपंतानी सुचविले ते मान्य करून अफजलखान पालखीतून, तर सय्यद बंडा व कृष्णाजीपंत वकील पायी निघाले. ते सदरेवर पोहचले त्यावेळी सदरेवरील संरजाम पाहून अफजलखान अचंबित झाला.

शिवाजी महाराज हळूहळू गड उतरताना माहिती घेत होते. अफजलखानबरोबर सय्यद बंडा हा तलवारबहाद्दर आहे त्यास दूर उभे करावे, असे त्यांनी सुचविले. त्याप्रमाणे सय्यद बंडा दूर उभा राहिला. शिवाजी राजे, जिवा महाला व संभाजी कावजी सदरेवर आले. खानाने उठून शिवाजींना अलिंगन दिले. या वेळी शिवाजींची मान डाव्या बगलेत आवळून हातातील जमदाडा (खंजीर) शिवाजींच्या पाठीत खुपसला. मात्र, तो खरखरत गेला. अंगास जखम झाली नाही. मान बगलेत आवळल्याने व जमदाडा खुपसल्याने खानाचा बेत शिवाजींच्या लक्षात आला. त्यांनी खानाच्या पोटात वाघनख्या खुपसल्या. मारिले मारिले, दगा केला, वाचवा असे म्हणत खान पालखीकडे पळाला. भोयांनी खानास पालखीत घालून पालखी पळविण्याचा प्रयत्न केला. इतक्यात संभाजी कावजी याने भोयांचे पाय कापले, खानाचे शिर कापले व तो राजांकडे आला. या वेळी सय्यदबंडाने शिवाजींवर वार केला; पण जिवा महालाने सय्यद बंडाचा वार केलेला हात वरचेवर तोडला व शिवरायांना वाचविले.

खानाचा निकाल लावल्यावर राजे गडावर गेले व इशारतीच्या तोफांचा आवाज केला. भेटीत तह होणार म्हणून खानाचे लष्कर गाफील होते. त्यांच्यावर मराठ्यांनी अचानक हल्ला केल्याने पळापळ सुरू झाली, मोठे युध्द झाले. खानाच्या सैन्याचा पाडाव झाला. मराठ्यांना विजयाबरोबरच सैन्याची रसद, शस्त्रे, कापडचोपड, मालमत्ता, पालख्या, ६५ हत्ती, ३ लाख जडजवाहीरे, ४ हजार घोडे, १२०० उंट, ७ लाखाचे नगद होन, इत्यादी सामान व बरेचसे शरण आलेले सैन्य सापडले. अफजलखानाचा एक मुलगा मारला गेला, तर दुसरा फाजलखान झाडीतून पळून जाण्यात यशस्वी झाला. शिवाजींनी प्रतापगडाखाली येऊन शत्रूच्या सैन्यास अभय देऊन आपलेसे केले, तर युध्दात कामी आले त्यांच्या बायका मुलांच्या उदरनिर्वाहाची तजवीज केली. जखमी झाले त्यांना हत्ती, उंट, घोडे, हातकडी रोख बक्षिसे दिली.

या वेळी बखरकार म्हणतो की, ''मागें कौरवांचा क्षय पांडवी केला, (तेव्हां) असा वीरावीरांस झगडा जाहाला. खांसा खान राजियानें एकांगी करून मारिला. शिवाजी अवतारी पुरूष होता.''

अफजलखानाचा पाडाव झाल्याची बातमी विजापूरास चौथ्या दिवशी कळाली, त्यामुळे बडी बेगम विषन्न झाली. खुदाने मुसलमानांची पातशाही बुडविली, असे म्हणून तिने शोक केला. उद्या शिवाजी विजापूरही जिंकून घेईल, अशी भीती तिने व्यक्त केली.

शिवाजी महाराजांनी अफजलखान वधानंतर विजापूरकरांचे तळकोकणातील सर्व किल्ले जिंकून घेतले. जवळपास पन्नास साठ किल्ले व घाटावरील प्रदेशही जिंकून घेतले. आदिलशाही पाठोपाठ मुघलांच्या परांडा, हवेली, कल्याण, कुलबर्गे, आवसें, उदगीर, गंगातीर, औंरगाबाद या प्रदेशात आक्रमण करून ते विजयी झाले. त्यांनी चौथाईचा वसूल घेतला.

शिवरायांचे प्रशासन

शिवरायांच्या पूर्वी किल्ले हे मध्यवर्ती प्रशासनाकडे होते. मात्र, त्यावर हवालदार किंवा किल्लेदार हा एकच अधिकारी होता. त्याच्या ताब्यात किल्ल्यावरील शिबंदी व सर्व मालमत्ता असे. मात्र, शिवरायांनी

जसे किल्ले जिंकले तसे त्यांची डागडुजी केली व किल्ल्यासाठी वेगळी प्रशासनव्यवस्था निर्माण केली. ती पुढीलप्रमाणे; किल्ल्यावर समान दर्जाचे तीन अधिकारी नेमले. हवालदार, सबनीस, कारखानीस या तिघांच्या सहमतीने व सहीने कारभार होईल, असे ठरविले. जरी वरील व्यवस्था असली, तरी सहमतीनेच व्यवहार चालवावा. याशिवाय गडाबाहेर पाच-सात तटसरनोबत नेमावेत. अशा प्रकारे किल्ल्यांसाठी नियमावली बनवली.

घोडदळ

शिवरायांच्या घोडदळाचे दोन विभाग होते ते म्हणजे बारगीर व शिलेदार हे होत. सदर सैन्यास पावसाळ्यात घोडदळ ठेवण्यास शाखरलेली घरे बांधली जात असत. लष्करात स्त्रिया, दासी, गायिका नेण्यास बंदी होती. परमुलखात ब्राह्मण, मुले व स्त्रिया यांना उपद्रव देण्यास बंदी होती. आठ महिन्यानंतर परमुलखातून युध्दावरून परत आल्यावर छावणीत हजेरी द्यावी लागे. युद्धात मिळालेल्या लुटीतील सर्व माल सरकारी तिजोरीत जमा करावा लागे. पावसाळ्याच्या दिवसात या पागेची व्यवस्था सरकारी खर्चात होत असे. सैन्यात अयोग्य वर्तणूक खपवून घेतली जात नसे. सैनिकांना दर महिन्याच्या पहिल्या दिवशी जेथे असेल तेथे रोख पगार दिला जात असे. पगाराऐवजी वतन, जहागीर, मोकासा दिला जात नसे.

मुलकी कारभार

स्वराज्यातील प्रदेशाची व्यवस्था लावताना महसूलात योग्य, चौकस कर्तबगार व्यक्तींना शिवरायांनी कामे दिली. युध्दातील पराक्रमाइतकेच महत्त्व महसूल प्रशासनातील उत्कृष्ट कार्यालाही दिले. कर्तबगार व्यक्तींना योग्य वेतन दिले. मानमरातब दिला.

स्वराज्यातील मुलखाची मोजणी करून तिची प्रतवारी केली. मोजणीसाठी जे साधन वापरले त्यास (शिवशाही) काठी असे म्हणतात. ही काठी विशिष्ट मापाची असून वीस काठ्या औरस चौरस म्हणजे एक बिघा, एकशेवीस बिघा म्हणजे एक चावर होय. पिकाच्या उत्पन्नाचे पाच हिस्से करून, तीन हिस्से रयतेला तर दोन हिस्से सरकार जमा, असे निश्चित केले. याशिवाय अधिक कर वसूल करता येणार नाही, असे बंधन घातले. यासाठी वतनदार पाटीलऐवजी गावकामगार पाटील नेमले. त्यांच्या मदतीस कुलकर्णी बांधून दिला. रयतेला दुष्काळ, परचक्र या वेळी सवलती दिल्या.

पूर्वीप्रमाणे स्वराज्यातील जी देवस्थाने होती, पीर व मशिदी होत्या त्यास दिवाबत्ती, नैवेद्याची व्यवस्था केली. अशा रितीने स्वराज्याची सुयोग्य व्यवस्था शिवरायांनी लावली.

शाहिस्तेखानाची स्वारी

शिवरायांनी मुघल प्रदेशावर आक्रमण केल्याने दख्खनचा सुभेदार औरंगजेब चिडलेला होताच, अशा वेळी शिवाजीपासून विजापूर वाचविण्यासाठी आदिलशहाने औरंगजेबला विनंती केली. त्यामुळे शिवाजींचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने स्वतःचा मामा शाहिस्तेखान याला एक लाख सैन्य व अनेक मातब्बर सरदार, एक कोटीचा शाही खजिना देऊन पाठविले. शाहिस्तेखानही ''शिवाजी म्हणजे काय? त्यासि

जातांच कैद करतों. गड कोट मुलूख घेऊन फत्ते करितो'' असे म्हणून प्रचंड सैन्यासह दख्खनकडे निघाला.

शाहिस्तेखान येत आहे, हे पाहून शिवरायांनी सहकाऱ्यांशी चर्चा केली. त्यात तह करावा, असे अनेकांचे मत पडले. मात्र, तो मुसलमान त्यात बादशहाचा नातलग त्यामुळे लाचलुचपतीचा उपयोग नाही आणि भेटलो, तरीही तो स्वराज्याचा नाश करेल. तेव्हा भेटीपेक्षा कौशल्याने युध्द करावे, अशी हिम्मत शिवरायांनी धरली. शिवरायांनी असे ठरविले की, गनिमी काव्याने खुद्द शाहिस्तेखानावर छाप्पा घालावा, त्यासाठी बाबाजी बापूजी मुदगल व चिमाजी बापूजी मुदगल या बंधूच्या नेतृत्वाखाली एक हजार तलवार बहाद्दर व हुशार पायदळ घेतले. पुण्यात जागोजागी आपल्या लष्करातील लोक आपल्या हिकमतीने घुसवले. व खुद्द शाहिस्तेखानावर मध्यरात्री हल्ला चढविला. या हजारपैकी दोनशे खासे वीर लाल महालात घुसविले, त्यात खुद्द शिवाजीराजे सर्वांत पुढे होते. राजेंनी लक्षपूर्वक शाहिस्तेखानावरच हल्ला केला. मात्र, शाहिस्तेखानाची फक्त बोटे तुटली. तो पळून गेला, हे पाहून सर्व सहकाऱ्यासह शिवाजीराजे परतीच्या प्रवासास लागले व सहकाऱ्यासह राजगडावर पोहोचले. या प्रसंगातून कठीण प्रसंगात विचलित न होता ताकदवान शत्रूस शह देऊन यशस्वीपणे हल्ला करून गनिमी काव्याने विजयी मिळवता येतो, हे शिवरायांनी दाखवून दिले. यातून शिवाजीमहाराजांचा मुत्सद्दीपणा दिसून येतो.

सकाळी शाहिस्तेखानाच्या समाचारासाठी सरदार आले तेव्हा खान आपल्या सरदारांना म्हणाला, 'खाशा डेऱ्याजवळ गनीम येईपर्यंत कोणीही वजीर पुढे आले नाहीत, अवघे फितव्यात मिळाले? उद्या शिवाजी हल्ला करून माझे शीरही कापून नेईल. त्यापेक्षा माघारी दिल्लीस गेलेले बरे'. या प्रसंगामुळे बादशहा निराश झाला. मोहिमेवरील सरदारांच्या जहागिरी, इनामे बंद केली व शिवाजीस नामोहरम करेल असा कोण सरदार? याचा विचार करून मिर्झाराजा जयसिंग याची शिवरायावरील मोहिमेसाठी निवड केली. त्याला बहुमानाचा पोशाख, हत्ती, घोडे, सैन्य, दिलेरखान पठाण हा मोठा वजीर, विशेष तोफखाना, पठाण व रजपूत लढवय्ये सैन्य दिले. दिलेरखानास वेगळे बोलवून मिर्झाराजे व शिवाजी हिंदू आहेत, फितवा करतील, तुम्ही दासीपुत्र असल्याचे भासवा व पाळत ठेवा असे सांगून त्याला दख्खनच्या स्वारीवर पाठविले.

मिर्झाराजा ऐंशी हजार तर दिलेरखान पाच हजार पठाणी फौज घेऊन दक्षिणेत आला. त्यांनी पुरंदर आणि कोंडाणा यांच्यामध्ये मुक्काम केला व शिवाजीस पत्र पाठवून भेटीस बोलविले. त्यास मिर्झाराजाने दिल्लीपुढे आणि बादशहापुढे तुमचा टिकाव लागणार नाही, त्यापेक्षा सहा महिने किल्ले झुंजवा व मग भेटीस या, असा निरोप पाठविला. त्यानुसार शिवरायांनी तजवीज केली. शिवरायांचा वकील भेटून गेला. हे कळताच दिलेरखान दुःखी झाला. मी पुरंदर किल्ला जिंकतो, तुम्ही कोंडाणा गड घ्या, असे आवाहन त्याने मिर्झाराजेंना केले. यावेळी मिर्झाराजे म्हणाले की, गड जिंकले तर बरे अन्यथा बेअब्रू होईल. तेव्हा गड घेण्यापेक्षा मुलूख काबीज करावा. गडावर जाणारे सामान पोहचू न दिल्यास आपोआपच गड ताब्यात येईल, पण हा विचार न पटून दिलेरखानाने पुरंदर किल्ल्यावर चाल केली.

पुंरदरवर यावेळी मुरारबाजी हा किल्लेदार होता. त्याच्याकडे दोन हजार सैन्य होते. त्याने निवडक

सैन्यानिशी युद्धास सुरुवात केली. घनघोर युद्ध झाले. या निकराच्या लढाईत पाचशे पठाण मारले गेले. मुरारबाजीचे साठ लोक मारले गेले. खुद्द मुरारबाजी दिलेरखानावर चालून गेला. त्याचा पराक्रम पाहून दिलेरखानाने ''अरे तूं कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नावाजितो.'' अशी स्वतःची बाजू घेण्याची विनंती केली. पण त्याने ''तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजीराजाचा शिपाई, तुझा कौल घेतो की काय?'' असे म्हणून खुद्द खानावरच हल्ला केला. खानाने हत्तीवरून बाण मारून मुरारबाजीइतकेच शौर्यवान आहोत, अशी हिम्मत करून युद्ध पुढे चालू ठेवले.

मुरारबाजी युद्धात मारला गेल्याची बातमी समजल्यावर शिवरायांनी रघुनाथपंताना जयसिंगाकडे पाठवून त्याच्या भेटीची इच्छा व्यक्त केली व त्यानुसार भेटीसाठी महाराज गेले. आपणास जसा रामसिंग तसाच मी, त्याचे रक्षण कराल तसेच माझे करावे, अशी मिर्झाराजेकडे शिवाजींनी बोलणी केली. मिर्झा आम्ही-तुम्ही एकाच जातीचे तुमची मी काळजी घेईन, असे सांगितले. मात्र, दिलेरखान यात अडथळा ठरेल, हेही निर्दशनास आणून दिले.

शिवाजी-मिर्झा भेटीची बातमी दिलेरखानास समजली. मिर्झाराजाने आपला मामा सुभानसिंग यास दिलेरखानकडे पाठवून किल्ला शिवाजीने ताब्यात दिला आहे, असे सांगितले. त्यानुसार पुरंदरचा वेडा संपवून दिलेरखान परत आला.

शिवाजी – मिर्झाराजे तह

शिवाजी-मिर्झाराजे भेटीत मिर्झाराजाने सगळेच किल्ले बादशहाला द्यावेत, अशी मागणी मिर्झाराजे जयसिंगाने केली. त्यावेळी आपल्याकडील २७ किल्ले देतो आणि मी आणि माझा मुलगा बादशहाच्या भेटीस येतो, असे शिवरायांनी सांगितले. बादशहाने दक्षिणेची बादशाही, आदिलशाही, कुतुबशाही व निजामशाही माझ्या नावे करावी, मी त्या जिंकून देतो असे सांगितले. त्याप्रमाणे दोघांमध्ये करार झाला. शिवरायांनी स्वराज्याची व्यवस्था जिजाऊच्या अधिपत्याखाली लावली. सरदारांना योग्य सूचना दिल्या व दिल्लीस भेटीसाठी येत आहे, असे औरंगजेब बादशहास कळविले.

यानंतर मिर्झाराजे व शिवाजीराजे हत्तीवर एका हौद्यात बसून विजापूरवर चालून गेले. पुढे विजापूरकरांशी तह केला. यानंतर मिर्झाराजाने शिवरायांना तुम्ही दिल्लीस बादशहाच्या भेटीस जा. तेथे माझा मुलगा रामसिंग आहे, तो तुमची व्यवस्था करेल, असे सांगून पुढे पत्रे पाठवून शिवरायांची जागोजागी व्यवस्था केली.

आग्रा भेट व सुटका

राजगडावरून शिवाजीराजे व संभाजी दिल्लीस निघाले. प्रत्येक मुक्कामाची शहाजाद्याप्रमाणे व्यवस्था जयसिंगाने केली. राजे दिल्लीत आले, हे बादशहाला समजताच त्याने रामसिंगास व रघुनाथपंताना खुशाली विचारण्यास पाठविले. तसेच एका हवेलीची राहण्यासाठी व्यवस्था केली. शिवाजीराजे बादशहाच्या भेटीस निघाले, त्यावेळी औरंगजेबाने निवडक चतुर व शूर असे दोन हजार शिपाई आपल्याजवळ ठेवले. कारण

शिवाजी सामान्य नाही, सैतान आहे. अफजलखानाला भेटीत मारला. उडी मारून तक्तावर येऊन मलाही ठार केला तर? असा विचार करून खबरदारीने बसला. प्रत्यक्ष शिवाजीराजे आल्यावर ''आवो, शिवाजी राजे'' असे स्वागत केले व रांगेत उभे राहण्यासाठी हुकूम केला. तेव्हा माझ्या पुढील रांगेत कोण आहे, असे शिवरायांनी रामसिंगास विचारले. त्याने जसवंतसिंग असे उत्तर दिले. यावर ''जसवंतसिंगाच्या मागे आम्ही, अरे, यांच्या पाठी आमच्या लष्कराने पाहिल्या आहेत'' असे म्हणून राजे रागावले. यावेळी रामसिंग धीर धरा अशी विनंती करत होता, तर दोघांचा संवाद ऐकून बादशहाने काय झाले असे विचारले. तेंव्हा शिवाजी हा जंगली वाघ आहे, त्यास उष्मा सहन होत नाही, असे रामसिंगाने सांगितले. यावर शिवाजीस मुक्कामी घेऊन जा व उद्या सावकाश मुलाखत होईल, असे म्हणून बादशहाने निरोपाचे विडे दिले. शिवाजी राजे गेल्यावर आनंदित होऊन मोठा अनर्थ चुकला, शिवाजींची व आमची नजरानजर झाली होती, मोठ्या संकटातून सुटलो, असे बादशहा म्हणाला.

हवेलीत गेल्यावर शिवरायांनी झाल्या प्रकाराबद्दल रामसिंगाशी चर्चा केली, 'कोण बादशहा? मी शिवाजी राजा आहे. मला जसवंताच्या पाठीमागे उभे केले. मी यापुढे भेटू इच्छित नाही', असे सांगितले. त्यावेळी रामसिंगाने असे सूचविले की, तुम्ही भेटीस येऊ नये. योग्य वेळ पाहून निघून जा.

यातून मार्ग काढण्यासाठी शिवरायांनी औरंजबाकडे आपले लोक पाठवून तुमचा आमचा कुठलाही वैरभाव नाही, म्हणून मी माझ्या मुलासह भेटीस आलो आहे. तुम्ही मला कामगिरी सांगितल्यावर दक्षिणेतील आदिलशाही व कुतुबशाही जिंकून पुन्हा भेटीस येतो, असे सांगितले. मात्र, शिवाजीबद्दल दिल्लीस अनेक गैरसमजुती व अफवा पसरल्या होत्या. शिवाजी मोठा दगेखोर आहे. चाळीस गज उंच उडू शकतो. या अफवेने औरंगजेबाने शिवाजीची भेट टाळली. यानंतर शिवाजींनी जाफरखान या जहागिरदाराची भेट घेतली. मात्र, जाफरखान म्हणजे शाहिस्तेखानाचा मेव्हणा, त्यामुळे तो खुल्या दिलाने बोलला नाही.

दुसरे दिवशी शिवरायांच्या हवेली भोवती आग्र्याचा कोतवाल पोलादखान ५००० सैन्यानिशी वेढा टाकून बसला. यावेळी शिवाजीराजे चिंताग्रस्त बनले व वेढ्यातून कसे सुटावे? याविषयी विचार करू लागले. सुखरूप सुटकेविषयी रात्री भवानीचा साक्षात्कार झाला. यानंतर दुसरे दिवशी मिठाईचे पेटारे खरेदी करून वजीर व इतर सरदारांना दररोज मिठाई पाठवू लागले. सुरुवातीला त्यांची तपासणी झाली आणि पुढे तपासणी बंद झाली. याचा फायदा घेऊन शिवरायांनी आपला पेहरावा हिरोजी फरचंद यास चढवून पलंगावर झोपविले व स्वतः मुलगा संभाजीसह पेटाऱ्यात बसून दिल्ली पलीकडे दोन कोसावर उतरून निघून गेले. पेटाऱ्याबाहेर येताच सर्वांशी सल्ला मसलत केली की, सरळ दक्षिणेत जावे, तर बादशाही फौजा पाठलाग करून पकडतील. त्यापेक्षा दिल्ली पलीकडे जावे. इतरांनी जसे जमेल तसे जावे, असे सांगून शिवाजीराजे फकिराचा वेश करून मथुरेकडे गेले.

कैदेत हिरोजी फरचंद पलंगावर झोपला होता. तो दुसरे दिवशी वेष बदलून स्वतःच्या वेषात बाहेर आला व पहारेकऱ्यांना सांगितले की, राजांचे डोके दुखते आहे. कोणी कोठडीत जाऊ नका. तेथून रामसिंगाची भेट घेऊन तो दक्षिणेकडे चालू लागला. इकडे रामसिंगाने औरंगजेबाची भेट घेतली व शिवाजी तुमच्या

चौकी पहाऱ्यात आहे. त्यामुळे माझ्या जामिनाची गरज नाही, असे सांगितले. त्यावर बादशहाने ठीक आहे, शिवाजींचा बंदोबस्त आम्ही करू असे उत्तर दिले.

दुसरे दिवशी दिवस खूपच वर आला तरी हवेलीत माणसांचा राबता नाही, हे पाहून पोलादखान हवेलीत गेला असता तेथे कोणीही नव्हते. शिवाजीराजे पसार झाले होते. राजा पळाला हे पाहून पोलादखान औरंगजेबाकडे गेला व ''राजा कोठडीत होता. वरचेवर जाऊन पाहत असतां एकाएकी गइब जाहला. पळाला किंवा जमिनीमध्ये घुसला कीं अस्मानमध्ये गेला, हे नकळे, आम्ही जवळच आहों. देखत देखत नाहींसा जाला. काय हुन्नर जाहाला न कळे'' या शब्दात वर्तमान सांगितले. या बातमीने औरंगजेब प्रचंड रागावला व दोन लाख साठ हजार स्वार शिवाजीस शोधण्यासाठी पाठविले. शिवाजी वेषांतर करेल तरीही त्याला शोधून कैद करा, अशा सूचना केल्या. तसेच शिवाजी शहरातच दडून राहिला असेल व आपणास दगा करेल, या भीतीने स्वतःभोवती चौकी पहारे बसवून काळजी घेऊ लागला.

शिवाजी राजे व संभाजी मथुरेत आले तेथे मोरोपंत पेशव्यांचे नातलग शोधून त्यांच्या घरी संभाजीस ठेवण्याची व्यवस्था केली. तसेच आपण दक्षिणेत गेल्यावर जासूद पाठवून राजपुत्रास तुम्हासह नेतो व बक्षीस देतो, असे निळाजीपंतास सांगून संभाजीस तेथे ठेवले व पुढे गोंडवन, हैद्राबाद, विजापूरवरून राजगडावर सुखरूप पोहचले.

तहातील किल्ले परत मिळविण्यासाठी पुन्हा आक्रमणे

शिवरायांनी तहात दिलेले किल्ले आग्र्याहून परत आल्यानंतर घेण्याचा धडाका लावला. कोंडाणा जिंकण्याची जबाबदारी तानाजी व सूर्याजी मालुसरे यांचेकडे दिली. या वेळी कोंडाण्यावर उदयभानू रजपूत हा किल्लेदार होता. घनघोर लढाई झाली आणि त्यात तानाजी मालुसरे मारला गेला. मात्र, सूर्याजी व शेलार मामा यांनी किल्ला जिंकला. दुसरे दिवशी ही बातमी राजांना समजताच त्यांना फार दुःख झाले. 'एक गड घेतला परंतु एक गड गेला', असे राजे म्हणाले व दरबार भरवून शूरांना सोन्याची कडी व अपार द्रव्य दिले. याप्रमाणे अनेक किल्ले जिंकून घेतले.

संभाजी स्वराज्यात परत

मथुरेत ठेवलेल्या संभाजीला आणण्यासाठी दूत पाठवून सुखरूप राजगडावर परत आणले गेले. या वेळी ही कामगिरी विश्वासाने फत्ते केली. म्हणून कृष्णाजीपंत व त्यांच्या बंधूना 'विश्वासराव' हा किताब दिला गेला. यानंतर महाराजांनी राजसंरक्षक दळ निर्माण केले व अत्यंत विश्वासू कर्तबगार अशा लोकांची भरती करून त्यांना विशेष पोशाख, दोन्ही हातात सोन्याची कडी असा संरजाम केला. हे दळ हजार सैनिकांचे होते. त्यांच्या सेवेला सातशे लोक होते.

यानंतर शिवरायांनी आदिलशहाकडील पन्हाळा जिंकण्याचे ठरविले. नेताजी व स्वतःआक्रमण करून किल्ला जिंकण्याचे ठरले. मात्र, नेताजी वेळेत न आल्याने किल्ला जिंकता आला नाही, याचा राग येऊन शिवरायांनी सरनोबत पदावरून नेताजीस काढून टाकले व कुडतोजी गुजर यास सरनोबत (सेनापती) पद दिले. चार महिन्यात सत्तावीस किल्ले जिंकले.

संभाजीस सप्तहजारी मनसब

शिवाजीला आपणास युद्धात जिंकता येत नाही, हे लक्षात आल्यावर औरंगजेबाने आपला मुलगा शाहाआलम याला सुभेदारीवर नेमले व काहीही करून शिवाजीशी तह करण्यास सांगितले. त्यानुसार शिवाजी-मुघल तह झाला आणि संभाजीस मुघलांची सप्तहजारी मनसबदार म्हणून मान्यता देण्यात आली. त्यानुसार निराजी रावजी व संभाजी यांना औरंगाबाद येथे शाहाआलमकडे मनसबदार म्हणून पाठविण्यात आले. शाहाआलमने वऱ्हाड, खानदेशाची पंधरा लाख उत्पन्नाची जहागिरी संभाजीस दिली. हा तह दोन वर्षे टिकला. या काळात शिवरायांनी बराचसा आदिलशाही प्रदेश काबीज केला.

शिवाजी व शाहाजादा शाहाआलम जर एक झाले तर, बंड करून माझीच सत्ता उलथवतील, अशी शंका औरंगजेबास आली. त्याने पत्र पाठवून शाहाआलम यास निराजी रावजी व संभाजी यास कैद करण्यास सांगितले; पण शाहाजादा शाहआलमने गुप्तपणे निरोप पाठवून तुम्ही सैन्यासह पळून जावे, अन्यथा मला उद्या तुम्हास कैद करावे लागेल असा संदेश दिला. मराठा सैन्य रात्रीत औरंगाबाद सोडून स्वराज्यात आले. या वेळी महाराज म्हणाले, ''दोन वर्षे लष्कराचे पोट भरले आणि शाहजादा मित्र जोडला ही गोष्ट बरी जाहाली, आता मोघलाई मुलूख मारून खावयास वाव जाहाला.''

यानंतर आठ दिवसांनी मराठ्यांना कैद करण्याचे फर्मान औरंगाबादेत आले. मात्र, औरंगाबादेत मराठे नव्हते, तर मराठे मोघलांचा मुलूख जिंकण्यात मग्न होते.

सुरतेची लूट

शिवरायांचा गुप्तहेर प्रमुख बर्हिजी नाईक याने बातमी आणली की, सुरत येथे प्रचंड संपत्ती आहे; आणि बंदोबस्त तोकडा आहे. खासा लष्कर घेऊन आपण सुरत जिंकावी, असा विचार करून शिवरायांनी वीस हजार लष्कर व सात हजार घोडदळ सुरतेकडे प्रयाण केले. सुरतेचे लोक या आक्रमणाबद्दल गाफील होते. त्यामुळे मराठे सरळ सुरतेत घुसले. मोठ मोठ्या सावकार, व्यापाऱ्यांचे वाडे काबीज करून मौल्यवान वस्तूंची प्रचंड लूट मिळविली. ही लूट इतकी किमती व प्रचंड होती की, मराठ्यांनी सामान्य जिन्नसांना हात लावला नाही. दोन दिवस अगणित संपत्ती मिळवल्यावर लष्कराचे दोन भाग करून वीस हजार लोकांकडे किमती वस्तूंच्या गोण्या भरून त्यांच्यासोबत निम्मे घोडदळ पाठवून दिले व निम्या घोडदळास शत्रू सैन्याच्या आक्रमणापासून वाचविण्यासाठी पिछाडीस ठेवले. यावेळी मोहब्बत खान व दाऊदखान हे सुरत वाचविण्यासाठी आले. त्यांच्याशी शिवरायांचे घनघोर युद्ध झाले. तीन हजार मुघल सैन्य मारले गेले. चार हजार घोडे मराठ्यांना सापडले. या वेळी रायबागच्या स्त्रीने मराठ्यांवर आक्रमण केले. मात्र, तिचा पराभव शिवरायांनी केला. तिने शरणागती स्वीकारली. सुरतेच्या लुटीत पाच करोड होनांची संपत्ती मराठ्यांना मिळाली.

जलदुर्ग बांधणी

मराठ्यांच्या स्वराज्यात देशाबरोबरच आता कोकणात कल्याण, भिवंडी, राजापूर ते मालवण या

समुद्रकिनाऱ्यावर सिद्धींचा सातत्याने त्रास होत असे, कारण त्याच्याकडे समुद्रातील किल्ले रेवदंडा, राजापूर आणि जंजिरा होते. जहाज जवळ होते. ते समुद्राबाहेर येऊन रयतेला त्रास देत असत. यावर उपाय म्हणून शिवरायांनी जहाज बांधणी उद्योग सुरू केला. तसेच समुद्रात जे डोंगर आहेत, तेथे किल्ले बांधण्याचे धोरण राबविले. जोपर्यंत आपणांकडे समुद्रातील किल्ले (जंजिरा) आहेत, तोवर शत्रूला शह देणे शक्य आहे; म्हणून त्यांनी जलदुर्ग बांधण्याचे धोरण स्वीकारले. त्या जोरावर सिद्धीच्या प्रदेशावर मराठ्यांनी आक्रमण केले व राजापूर, तळा, घोसाळा जिंकून समुद्रकिनारा मराठ्यांनी ताब्यात घेतला.

शिवरायांच्या नौदलाने बसनूर हे शहर केवळ एक दिवसात आक्रमण करून लुटून घेतले. बिदनूर येथील शिवाप्पा नाईक हा मराठ्यांना घाटमार्गात अडवणूक करीत होता, म्हणून स्वतः शिवाजी महाराज दिवस उगवण्यास जहाजातून बसनूरमध्ये गेले. तेथील लोक बेसावध होते. त्याचा फायदा घेऊन एका दिवसात शहर लुटून फस्त केले. त्यात दोन कोटी होनांची संपत्ती मिळाली.

या पाठोपाठ मुघलांचे औरंगाबाद, कारंजे ही शहरे जिंकली व अगणित संपत्ती मिळविली. यावेळी दिलेरखान, बाहादुरखान, एखलालखान, बेलोलखान व इंद्रमणी इत्यादींनी मराठ्यांना प्रतिकार केला. मात्र, मराठ्यांनी त्यांना नामोहरम केले व सात कोटीची संपत्ती मिळविली.

यानंतर महाराजांनी त्र्यंबक गडापासून सालेरीपर्यंत चाळीस किल्ले घेतले. काही वसविले. कोळवण, रामनगरचे राज्य जिंकले. कणेरगडाचे युद्ध जिंकले, इखलाखानास जिंकले, दिलेरखानास पराभूत केले व तो पळून गेल्याने औरंगजेबाने दख्खनचा सुभेदार बहादुरखानास पाठविले. शिवरायांनी त्याच्याकडे तहाची बोलणी चालू ठेवली व दुसरीकडे आदिलशाही प्रदेश जिंकून घेतला. पन्हाळा, चंदनवंदन, नांदगिरी, परळी, वाईचा कोट, कऱ्हाडचा कोट, शिरोळ, कोल्हापूर ते रायबागपर्यंतचा प्रदेश जिंकला.

राज्याभिषेक सोहळा

आदिलशाही सरदार मोरे याच्याकडून रायरी गड महारांजानी पूर्वी जिंकला होता, तो पुन्हा सुसज्ज बनविला व तेथे राजधानी करावयाचे निश्चित केले. त्यासाठी राजवाडा, राणी महाल, अठरा कारखाने, बारा महाल, इतर प्रशासकीय इमारती व व्यापारीपेठ यांची बांधणी केली. गड इतका मजबूत केला की, पृथ्वीवर दौलताबाद अवघड किल्ला. मात्र, उंचीने कमी. त्यापेक्षा रायगड, दीडगांव उंच चकोट किल्ला. गडाचे किडे तासल्याप्रमाणे, पावसाळ्यात गवत उगवत नाही, म्हणून तक्तास हीच योग्य जागा असा विचार करून रायगडावर राज्याभिषेक करण्याचे शिवरायांनी निश्चित केले. त्यासाठी राजांची कीर्ती ऐकून वाराणसीवरून गागाभट शिवरायांच्या दर्शनास आले व त्यांनी ''मुसलमान बादशहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यांनीही चार पादशाही दबाविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असे (मिळविलें) असतां त्यांस तक्त नाही, याकरिता मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा असें चित्तात आणिले. आणि (ते) राजियासही मानिलें.'' शिवराय हे सिसोदे रजपूत घराण्यातील आहेत. त्या घराण्याच्या रिवाजाप्रमाणे राज्याभिषेक करण्याचे ठरवून विविध विधी करून त्यांना बत्तीस मण सोन्याच्या सिंहासनावर विधीपूर्वक विराजमान केले. या वेळी महाराजांनी शिवशकाचा प्रांरभ केला. राज्यकारभारासाठी

अष्टप्रधानांची नियुक्ती केली. त्यांची नावे संस्कृत भाषेत ठेवली. तसेच राज्यकारभाराच्या सोयीसाठी 'राज्यव्यवहार कोश' या ग्रंथाची निर्मिती करून जनतेस सुराज्याचे वचन दिले. ''येणेप्रमाणे राजे सिंहासनावर रूढ जाले. या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. हा मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला. ही गोष्ट कांही सामान्य जाली नाही.'' शिवाजी महाराज छत्रपती झाले, ही बातमी ऐकून औरंगजेब अत्यंत दुःखी-कष्टी झाला.

दिग्विजय मोहीम

राज्याभिषेकानंतर महाराजांनी कर्नाटक प्रांतात दिग्विजय मोहीम काढण्याचे ठरविले. त्यासाठी भागानगरच्या कुतुबशहाशी तह केला. यासाठी स्वतः शिवाजी महाराज भागानगरला गेले. शिवाजी महाराज येताहेत हे पाहून कुतुबशहा स्वागतासाठी चार गावे पुढे आला. या वेळी शिवरायांनी निरोप पाठविला की, आपण वडील भाऊ मी धाकटा भाऊ. आपण पुढे न यावे. यावर मादंणापंत अकंणापंत या सरदारांना राजांनी पाठवून दिले. संपूर्ण शहर सडा, रांगोळ्या, गुढ्या, तोरणे निशाणांनी सजविले. शिवरायांवर सोन्या रूप्याची फुले उधळली, योग्य स्वागत केले व दोघांमध्ये तह झाला. यानंतर महाराज कर्नाटक मोहिमेस बाहेर पडले. श्री शैल्याचे दर्शन घेऊन महाराजांनी चंदी जिंकले, त्रिमळ महालचा प्रदेश जिंकला. शेरखान या पठाण सरदारांस जिवंत पकडला व प्रचंड संपत्ती मिळविली.

शिवाजी व व्यंकोजी राजे यांची भेट झाली. या भेटीत स्वागतानंतर व्यंकोजी आठ दिवस महारांजाबरोबर राहिला. मात्र, दोन भावांमध्ये पुण्याची जहागीर व बंगळूरची जहागीर या वाटणीवरून बेबनाव निर्माण झाला. त्यामुळे व्यंकोजी आपल्या राज्यात रात्रीच पळून गेला. यावर शिवाजीराजे आश्चर्यचकित झाले व म्हणाले, ''अति धाकटे ते धाकटे, बुद्धीही धाकटेपणा योग्य केली.'' तरीही शिवरायांनी त्याची जहागिरी न जिंकता शाबूत ठेवली व त्याच्याशी तह केला. त्याच्या सरदारांना वस्त्र, भूषणे देऊन अभय दिले. या मोहिमेत शिवाजी महाराजांनी जवळपास शंभर किल्ले जिंकून घेतले. वीस लाख होन उत्पन्नाचा प्रदेश जिंकून घेतला. यानंतर शिवरायांनी मोघलांच्या प्रदेशावर हल्ला केला. जालना शहर जिंकले व प्रचंड संपत्ती मिळविली.

शिवाजीराजे व युवराज संभाजी बेबनाव

शिवरायांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी हे राजांवर नाराज होऊन मोघल सरदार दिलेरखानास जाऊन मिळाले.दिलेरखानाने ही बातमी बादशहाला सांगितली व त्यांचा सन्मान करण्यास सुचविले. मात्र, औरंगजेबाने संभाजीस कैद करण्याचा हुकूम पाठविला. यावेळी दिलेरखानाने संभाजी राजांना सूचना करून पळून जाऊ दिले. संभाजी पन्हाळ्यावर सुखरूप आले. हे समजताच शिवाजी महाराज पुरंदरवरून पुत्र भेटीसाठी पन्हाळगडावर आले. त्यांनी संभाजीची समजून काढली की, मी दोन पुत्रांसाठी दोन राज्ये निर्माण केली आहेत. धाकटा राजाराम महाराष्ट्रातील राज्य चालवेल, तू ज्येष्ठ पुत्र कर्नाटक राज्य चालव. मी देवाचे नामस्मरण करीत राहतो. त्यावेळी संभाजीराजे म्हणाले, ''आपणास साहेबाचे पायांची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायांचे चिंतन करून राहीन.'' यावर शिवरायांनी संपुष्ट होऊन स्वराज्याबद्दल

सर्व तपशील लष्कर, खजिना, किल्ले, महत्वाचे सरदार याबाबत संभाजीशी चर्चा केली. नंतर पुढे राजारामाचे लग्न केले.

यानंतर काहीच दिवसांनी महाराजांना ज्वर (ताप) आल्याने ते आजारी पडले व त्या आजारपणातच त्यांचे देहावसान झाले.

१.५ समारोप

सभासद बखर ही शिवचरित्राच्या दृष्टीने एक महत्त्वाची बखर आहे. शिवाजी महाराजांचे बालपण ते देहावसानापर्यंतचा भाग या बखरीमध्ये येतो. अत्यंत वेचक आणि वेधकपणे शिवकाळातील घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रणे उत्तम भाषेत प्रामाणिकपणे सभासदाच्या बखरीत चित्रित केलेली आहेत. प्रस्तुत चरित्रात शिवाजीच्या आयुष्यातील ७१ प्रसंग सांगितले आहेत. शिवाजींची राजनीती, राज्यकारभारविषयक धोरण, किल्ले प्रशासन, जलदुर्ग धोरण, युद्धनीती, सामान्य लोकांमध्ये निर्माण केलेले राष्ट्रप्रेम, राज्याभिषेक सोहळा असे प्रसंग बखरकाराने चित्रित केले आहेत.

१.६ वाचन उतारे

- **वाचन उतारा क्रमांक १**

सुरतेची लूट

तों इतक्यांत सुरतेहून पाळती बहिरजी जासूद आला कीं, ''सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल.'' असें सांगितलें. त्याजवरून राजियांनी विचार केला, ''लष्कर चाकरीनफरी, काम मनाजोगें होणार नाही. याजकरितां, जावें तरि आपण खासा लष्कर घेऊन जावें.'' असा विचार केला. आणि मकाजी आनंदराव म्हणजे शाहाजी यांचा फरजंद पाळलेला व वेंकाजी दत्तो ब्राह्मण मोठे लष्करी नामोशाचे सरदार, हे महाराजांकडून सेवा सोडून राजियाकडे आले होते; त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंचहजाऱ्या सांगितल्या. आणि प्रतापराव सरनौबत व वेंकाजी दत्तो व (मकाजी) आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेच सात पांच हजार मावळे लोक निवडक व सरकारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व अणाजीपंत व दत्ताजीपंत व बाळ परभू चिटणीस असे बरोबर घेतले. कोळवणांतून नीट सुरतेस पांच गांव, सात गांव एक मजल करून एकाएकीं सुरतेस पावले. ''सुरतेचे लोक गैरहुशार होते. चढे घोड्यानिशीं सुरतेच्या दरवाज्याजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलांचीही फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहाली. तांब्राकडील लोक बहूत मारिले. आणि सावकारांचे वाडे काबीज करून सोनें, रुपें, मोतीं, पोवळे, माणीक, हिरे, पाच, गोमेदराज, वैडूर्य, असे नवरत्नें; नाणें, मोहोरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या असफ्या, होन, नाणें नाना जातीचें इतक्या जिनसांच्या धोंकटिया भरल्या. कापड भांडें तांब्याचें वरकड हान (अन्य ?) जिन्नस यास हात लाविलाच नाही. असें शहर दोन दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युद्धांत व सावकारांच्या घरात सापडले तितके घेतले आणि राजियांनीं विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतून निमे घोडीं भांडावयास लष्करी ठेविलीं. निमे घोडियावरि घोंगटिया

मालाच्या घातल्या. पाईंच्या लोकांस हमेण्या करून त्याजवळ दिधल्या. अशी मुस्तेदी करून, वोझी घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं. अवकाश थोडा म्हणून शहर मारून चालिले. ही खबर मोंगलांचे सुभेदार वीस उमराव व मोहबतखान व दाऊदखान असे सात गावची दवड करून, बराबर हजार स्वार एक एक सुभ्याबराबर, चालून आले. त्यांनीं राजियास गाठलें. गनीम आला ऐशी खबर कळली. राजा खासा घोड्यावर बसून बख्तर घुगी घालून, हातीं पट्टे चढवून मालमत्ता घोडीं, पाईंचे लोक पुढें रवाना करून आपण दाहा हजार स्वारांनिशीं सडे सडे राऊत उभे राहिले. वणी दिंडोरी म्हणवून शहर आहे. ते जागां उभे राहून सुभ्यांचे लोक आले त्यांशीं घोरांदर युद्ध केलें. मोहबतखान व दाऊदखान यांनीं युद्ध केलें. राजियांनीं आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढें होऊन मोठी कत्तल केली आणि मोंगल-मारून मुरदे पाडिलें. दोन प्रहर युद्ध जालें. मराठे यांणीं शर्त केली. तीन हजार मोंगल मारिले. तीन चार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोंगलाई सांपडले. असे फत्ते करून आले. तो पुढें उदाराम वजीर मोंगलांचा याचा लेंक जगजीवन (व) उदाराम (याची) बाईल रायबागीण असे व सरदार पांच हजार मोंगल घेऊन उंबर-खिंडीस आले. त्यांस मारून चालविलें. रायबागीण कोंडली. तिणें दांतीं तृण धरून लेंक राजियाची म्हणून बोलून कौल घेतला. मग तीस कौल देऊन अनात करून सोडिली आणि माघारे राजे राजगडास आले.

शाहाजीचा मृत्यू

इतकियांत राजियाचे बाप शाहाजी महाराज बेंगरुळी होते ते विजापुराकडे येत असतां एकाएकीं चित्रदुर्गांत (ल्या) विलायतीमध्यें बोगदरी गांवीं घोडियावरून पडून मृत्यू पावले. हें वर्तमान राजियास कळलें. बहुत शोक केला. सर्वही विधान करून दानधर्म अपार केले, आणि बोलले कीं, मजसारख्या पुत्राचा पराक्रम महाराज पाहाते तरि उत्तम होतें. आपण आपला पुरुषार्थ कोणास दाखवावा? मागें अफजलखान मारिला व शास्ताखानास शास्ती केली, पराभवातें पावविला, आणि मिरजा राजियाची भेट घेऊन दिल्लीस गेलों, पादशाहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरें मारिलीं आणि पागा, शिलेदार लष्कर चाळीस हजार केलें. असें पराक्रमाचे वर्तमान ऐकून महाराज संतुष्ट जाले. समाधान-पत्रें आपणांस वरचेवर येत होतीं. तैशीच अलंकार वस्त्रें पाठवीत होते. या उपरि त्यांमागें आपणास कोणी आतां वडील नाहीं!'' म्हणून मोठा खेद केला. त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून, गळां मिठी घालून रहाविली. ''आपला पुरुषार्थ पाहावयास कोणी नाहीं. तूं जाऊं नको,'' म्हणून मोठा यत्न करून राजियांनीं व सर्व थोर थोर लोकांनीं राहाविली. असें वर्तमान जालें.

- **वाचन उतारा क्रमांक २**

संभाजी दिलेलखानाकडे

इतकियांत संभाजीराजे राजियांचे पुत्र ज्येष्ठ राजियावर रुसून मोंगलाईत गेले. ते जाऊन दिलेलखानास भेटले. मग त्यांनी बहूत सन्मान करून चालविलें. पातशाहास दिल्लीस दिलेलखानानीं लिहून पाठविलें कीं, ''राजियाचा पुत्र संभाजी राजा रुसून आपणाजवळ आला आहे. त्यास गौरव करून आम्हीं ठेवून घेतला

आहे. तर पादशाहांनीं मेहरबानं होऊन त्यांस नांवाजावें म्हणजे राज्यांत दुई होईल. राज्यांतील लष्कर उठोन आपोआप येईल आणि किल्ले कोट साधतील,'' म्हणून लिहिलें. त्याजवरून पादशाहांनीं विचार केला कीं, ''राजियाचा पुत्र आला आहे, त्यास नांवाजितां पातशाहींत फितवा करून पातशाही बुडवितील. नांवाजूं नये. हुजूर आणून कैदेंत ठेवावा.'' ऐसा विचार करून दिलेलखानास लिहून हुकूम पाठविला कीं, संभाजी राजियास घेऊन हुजूर येणें. असें लिहिलें. तों अगोदर दिलेलखानाचा वकील पातशाहाजवळ होता, त्यानीं हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें वर्तमान खानास कळतांच संभाजी राजियास सूचना करून पळविलें. तें पळून पन्हाळियास आले. मग पितापुत्रांची भेट जाहाली. बहूत रहस्य जाहालें. त्या उपरि राजे म्हणूं लागले कीं, ''लेंकरा, मला सोडूं नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता, परंतु श्रीनें कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जालें. आतां तूं ज्येष्ठ पुत्र थोर जालास, आणि सचंतर राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तीं आहे असें आपणास कळलें. तर मजला हें अगत्य आहे. तरि तुजलाही राज्य एक देतों. आपले पुत्र दोघेजण एक तूं संभाजी व दुसरा राजाराम. ऐसियास हें सर्व राज्य आहे, यास दोन विभाग करतों. एक चंदीचें राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हें एक राज्य आहे. दुसरें तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत एक राज्य आहे. ऐसीं दोन राज्यें आहेत. त्यास तूं वडील पुत्र, तुजला कर्नाटकीचें राज्य दिधलें. इकडील राज्य राजारामास देतों. तुम्हीं दोघे पुत्र दोन राज्यें करणें. आपण श्रीचें स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतों,'' असें बोलिले. तेव्हां संभाजी राजे बोलिले कीं, ''आपणास साहेबाचे पायांची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायांचें चिंतन करून राहीन.'' असें उत्तर दिधलें. आणि राजे संतुष्ट जाहाले. मग पिता पुत्र बैसून कुल राज्य आपलें देखिलें. कर्नाटक किती आहे व खजीना काय आहे व मुत्सद्दी सरकारकून लोक कोण कोण? लष्कर, पागा, शिलेदार किती? सरदार काय काय? गड कोठें? किती? हशम काय? समुद्रांतील जंजिरे, पाणियांतील जाहाजें किती? इसमांचा आकार केला. बितपशीलः– कारखाने अठरा व महाल मुलूख नाना जिन्नसवार संख्या करणें तो केला.

- **वाचन उतारा क्रमांक ३**

गडकोटांचा बंदोबस्त

जे जे गड घेतले त्या गडांवर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पद्धत घातली कीं, गडावरि हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरि गल्लयाचें, सामानाचे अंबर करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागां सात पांच तट–सरनोबत ठेवावे. त्यास तट वाटून द्यावे. हुशारी – खबरदारीस त्यांनी सावध असावें. गडावरि लोक ठेवावे, त्यांस दाहा लोकांस एक नाईक करावा. 'नऊ पाईक दाहावा नाईक', येणेंप्रमाणें जातीचे लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आडहत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनी नजरगुजर (करून) एक माणूस पाहून ठेवावें. गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यापैकी घेऊन मग ठेवावे सबनीस ब्राह्मण

हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हर एक फितवा – फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना. ये रितीनें बंदोबस्तीनें गड–कोटाचे मामलें केले. नवी पद्धत घातली.

पागांची व्यवस्था

तसेंच लष्करांत पागा केली. पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोलदारीखालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचे चालेना. पागेमध्यें दर घोड्यासि बारगीर एक.(असे) पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक जुमला म्हणून नांव ठेविलें. जुमालदारास पांचशे होन तैनात व पालखी त्यास एक, व (त्याच्या) मजमुदारास शें सवाशें होनांची (तैनात) करावी. पंचवीस घोड्यांस एक पखालजी व एक नालबंद. असे दाहा जुमले म्हणजे एक हजारी. यास एक हजार होन तैनात, एक मजुमदार व एक मराठा कारभारी व एक जमनीस परभू कायस्थ. त्यास पांचशें होन. याप्रमाणें असामींस तैनात (व) पालखी द्यावी. आला जमाखर्च चौघांचे विद्यमानें करावा. अशा पांचा हजारिया मिळोन एक पांचहजारी करावा. त्यास दोन हजार तैनात. तसेच मजुमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांच हजारिया सरनोबताच्या हुकुमांत. ये जातीचा मामला पागेचा. तसे शिलेदाराकडे सुभे वेगळाले, तेही सरनोबताचे आज्ञेंत पागा (व) शिलेदार मिळोन सरनोबत यांचे आज्ञेंत वर्तावें. दर हजारी, पंचहजारी, सरनोबत यांजवळून वाकनिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ बहिरजी जाधव नाईक, मोठा शाहाणा, जासुदाचा नाईक केला. तो बहूत हुशार चौकस करून ठेविला.

लष्कराची 'रीत'

लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशात यावें. त्यास दाणा, रतीब औषधें, घोडियांस (व) लोकांस घरें, गवतानें शाकारून ठेवविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें जातेसमयीं कुल लष्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे, आणि मुलुखगिरीस जावें. आठ महिने बाहेर लष्करांनी परमुलखात पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलखात पोर बायका न धरावीं. मर्दाना सापडला तरि धरावा. गाई न धरावीं. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस उपद्रव्य न द्यावा. खंडणी केल्या जागां ओळखियासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअमल न करावा. आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाखमासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कात धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलियास दिवाणांत द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारास जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीत आलियावर हिशेब करून सोनेंरूपें, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनी बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्कराच्या लोकांचे हिशेब देणें, (व) फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट मशागत केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद वर्तणूक कोणीं केली असेल आणि नामर्दी

केली असेल त्यांची चौकशी करून, बहुतां मतें शोध करून, त्यास दूर करून शासन करावें. वरचेवर शोध करावा. चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें. राजियाच्या आज्ञेनें ज्या प्रांतीं स्वारी जावयाची होईल त्या प्रांतीं जावें. अशी लष्कराची रीत.

पायदळास आज्ञा

तसेंच मावळे लोकांत एक नाईक. पन्नास लोक म्हणजे पंच-नायकी यांस एक हवालदार. दोन तीन हवाले मिळून एक जुमलेदार. दाहा जुमले मिळून एक हजारी. जुमलेदारांस शंभर होन तैनात सालीना. एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनात. हजारी यास पांचशें होन तैनात. (त्याच्या) सबनिसास शंभर सव्वाशें होन पर्यंत. ऐशा हजारियांस (नेमणुका केल्या.) सात हजारिया मिळोन एक सरनोबत येसजी कंक म्हणून केला. याचे आज्ञेंत सर्वांनी असावें.

मोंकासे नाहीत

सरनोबतास व मजुमदारास व कारकुनांस व हुजुरांतील लोकांत तनखे वराता देत होते. शेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणे त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वांटणी हुजूर व मुलुकावरि वराता. येणेंप्रमाणें सालझाडा वरचेवर करीत होते. लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाशे महाल गांव दरोबस्त देणें नाही. जें देणें तें वरातेनें द्यावें. अगर पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखांत साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनी द्यावें. मोकाशी जाहालियानें अफरा होईल आणि बळावेल. कमाविशीची कैद चालणार नाही. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडे होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीदार एक जाहालियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेच नाहीत.

मुलकी कारभार

मुलूख काबीज होतो त्यास मुलखास सरबरा चौकशीस कारकून ठेवावा. आधीं लिहिणार चौकस दप्तरदारी करून, कागद घडणी (?) करून, मोकासबा दिला म्हणजे दप्तरदारीमध्यें शाहाणा पाहून मुलुखांत ठेवावा आणि माहालची मजमू सांगावी. कोणास माहालचा हवाला सांगावा. कोणास सुभ्याची मजमू सांगावी. पुढें होतां होतां शाहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा. सुभ्याचा मजमुदार लिहिणार, चौकस, हिशेब जाणता त्यासच मामला माहालाचा सांगावा. केवळ लिहिणें येईना, कमाविशी न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा आणि पादशाहींत चाकरी करणें अगर घोडें घेऊन शिलेदारी करणें, असें सांगोन निरोप द्यावा. मुलखास कारकून ठेवावे, त्यांस माहाल पाहून हवालदारास तीन होन तैनात अगर चार पांच होन इतकी तैनात; मजमुदारास तीन चार पांच, पन्नास पाऊणशें होन, येणेंप्रमाणें करावें. दोन माहाल मिळोन लाख, सव्वा लाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकून करावा. त्यास दर असामीस चारशें होन तैनात करावी. मजमुदार सुभ्याचा करावा त्यास शंभर सवाशें होन करावे. सुभेदारास पालखी चारशें होनांत करार करवावी. मजमुदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी. पादशाहींत छत्री वजिरी उमराव मातबर लोकांस होती, तो शिरस्ता मोडून टाकिला; कीं पादशाहावर छत्र आणि चाकर लोकांवरही छत्र, ही गैर-पध्दत. याकरितां पादशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला. सर्वत्र

लष्कर, हशम मुलुखगिरीस (जातील) त्यांत भर सवाशें होन तैनात असेल त्यानें अबदागिरी बाळगावी. मुलुखांत देश पाहून लाख रुपयास सुभा ठेविला. धामधुमीचा मुलूख सरदेचा पाहून मुलूखगिरीच्या कारकुनासमागमें लष्कर, स्वार हशम जे जागां जितकी तोलदारी पाहिजे तितकी करून द्यावी.

जमीन–मोजणी व महसूल

(तशीच) मुलखाची जमीन मोजणी करून धुरंग, झाड, चावर करून आकार केला. पांच हात व पांच मुठींची काठी. हात चवदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची. वीस काठया औरस चौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशे वीस त्यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची गांवास मोजून चौकशी केली. बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या. दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या. येणेंप्रमाणें रयतेपासून घ्यावे. नवी रयत येईल त्यास गुरेंढोरें द्यावी. बीजास दाणा पैका द्यावा. भक्षावयासि दाणे पैका द्यावा तो ऐवज दोहों चोहों वर्षांनीं आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा. ये जातीचें रयतेचें पालग्रहण करावे. गांवचा गाव रयतेची रयत कारकुनानें कमावीस पाहून रयतेपासून वसूल पिकाचे पिकावर घ्यावा. मुलखांत जमीदार, देशमुख व देसाई यांचे जप्तीखाली कैदेत रयत नाहीं. यांणीं साहेबी करून नागवीन म्हटलियानें त्यांचे हातीं नाही. इदलशाही, निजामशाही, मोंगलाई देश कबज केला, त्या देशांत मुलकांचे पाटील कुळकर्णी यांचे हाती (व) देशमुखांचे हातीं कुल रयत. यांणीं कमाविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गांवीं मिरासदारानीं घ्यावे, ते गांवीं दोनशें तीनशें दिवाणांत खंडमक्ता द्यावा. त्यामुळें मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेवून बळावले. दिवाणास भेटणें नाहीं. दिवाणानें गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहतात. ये जातीनें पुंड होऊन देश बळावले. त्यास राजियाने देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहाला तेथें (आपलें) ठाणें ठेविलें. आणि मिरासदाराचे हातीं नाहींसे ठेविलें. असें करून मिरासदार इनाम इजारतीने मनास मानेसारखें आपण घेत होते तें सर्व अमानत करून जमीदारास गल्ला व नख्त गांव पाहून देशमुखास व देशकुलकर्णी यांस व पाटील कुळकर्णी यांसि हक्क बांधून दिला. जमीदारांनी वाडा बुरजांचा बांधू नये. घर बांधून राहावें. ऐसा मुलकाचा बंद केला.

देवस्थानादिकांचा योगक्षेम

मुलखांत देव देवस्थानें जागजागां होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविलें. वैदिक ब्राह्मण यांसि योगक्षेम ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी गांवोगांवीं सत्पुरुष पाहून त्यांचें कुटुंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस लागेल त्याप्रमाणें, धान्य द्रव्य त्यांस गांवचे गांवीं माहालीं नेमून देऊन, साल दरसाल त्यांस कारकुनांनीं पाववावें. ब्राह्मणांनीं तें अन्न भक्षून, स्नानसंध्या करून, राजियासि कल्याण चिंतून सुखरूप असावें. असे गड, कोट, लष्कर, हशम, मुलूख हुजरातीची चौकशी करून राज्य करीत चालले.

शास्ताखान पुण्यावर

मोंगलाईंत धुंद उठविली ही खबर दिल्लीस औरंगजेब पादशांहास कळोन, मनात बहुत चिंतातुर होऊन, ''शिवाजी बळाविला; विजापूरच्या अफजलखानासारखी फौज, बारा हजार स्वार, बुडविले; गडकोट पादशाहाचे घेत चालिला; त्याचा तरतूद काय करावी?'' म्हणून विचार करून, कुलवजीर उमराव बोलावून आणून एक लाख सुभा फौज घोडा राजियावर दक्षिणेस रवाना करावा म्हणून विचार करितां, नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी, आणि नातलग, याची रवानगी करावी असा मजकूर करून नबाबास बोलावून आणून विचार केला. नबाब बोलला जे, ''शिवाजी म्हणजे काय? त्यासि जातांच कैद करतों. गड कोट मुलूख घेऊन फत्ते करितों.'' अशा कित्येक गोष्टी बोलून सिद्ध जाहाले. उपरांत पादशाहा बहुत संतोष होऊन शिरची कलगी व पोशागी सनगें व घोडे, हत्ती, अलंकार देऊन खुशाली केली. बराबरि पाऊण लाख घोडा व हत्ती, यांखेरीज कित्येक लोक मुच्छदी वगैरे, तिरंदाज, बरखंदाज, रजपूत व स ती ली वाले (?) तसेच हत्तीचा तोफखाना, उंटाचा तोफखाना, घोडियावरील तोफखाना, बरचीवाले, आडहत्यारी, पाईच्यांची गणतीच नाहीं. बराबरि फरासखाना त्यासि शंभर हत्ती, तसेच भांडते हत्ती चारशें, असे पांच सहाशें हत्ती. तैसेच अगणित उंट. याखेरीज बाजारबुणगे, दारूगोळी, बाणांच्या भांडत्या गाड्या, आराबा. असें अमर्याद सैन्य दिलें. स्वारी म्हणजे कलयुगींचा रावणच! जैशी रावणाची संपत्तीची गणना न करवे, तैसाच बरोबरी खजीना बे मोहिन हत्ती, उंटें, खेचरें, गाडियावर भरून नख्त व सोनें, रूपें, मोहरा, होन, रुपये असे बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशी दक्षिणेस राजियावर चाल करून आला. लष्कर मुकाम करीत तेंव्हा दोन गांवें लांब व गांव दीड गांव रुंद लष्कर राहात असे. मजल दरमजल चालून येऊन तीन महिन्यांनीं पुणियास आला.

खानाची बोटे उडाली

हें वर्तमान दिल्लीहून रवाना होतांच राजियासि कळलें. राजे राजगडास होते. कुल सरकारकून व मोठे मोठे लोक सरनोबत बोलावून विचार केला. सर्वांचे मतें कीं, ''सला करावा, भेटावें. युद्ध करितां गांठ न पडे. आपली फौज काय, दिल्लीची फौज काय?'' असा (विचार) जाला. राजियाच्या मतें सला करावा तरि कोणी मातबर रजपूत नाहीं, जे आपणही रजपूत, तेही रजपूत, हिंदूधर्म रक्षून आपले संरक्षण करील. शास्ताखान म्हणजे मुसलमान, पातशाहाचा नातलग, येथें लांचलुचपत चालेना. (अगर आपणास रक्षीना. सल्यानें भेटल्यानें नाश करील.) आपणास अपायच आहे. ऐशी तजवीज केली. तेव्हां निदानीं मारतां जें होईल तें करावें अशी हिम्मत राजियानें धरिली. तों ते दिवशीं रात्रीं श्रीभवानी राजियाचे आंगांत बोलूं लागली कीं, ''लेंकरास म्हणावें कीं, शास्ताखान येतो त्याची फिकीर न करणें. जैसा अफजलखान मारिला तैसा शास्ताखान येऊन उतरल्यावरि त्याचे गोटांत शिरून मारामारी करणें. पराभवातें पाववित्यें.'' असे श्रीनें सांगोन मागती राजे सावध जाहाले. जवळ कारकून होते त्यांनीं श्रीचीं वाक्यें लेहून ठेविलीं होतीं ती राजियास सांगितली. राजियांनीं श्री प्रसन्न जाहाली हें कळोन हिम्मत धरली. आणि आपले लष्करांत व मावळे व हुजुर लोकांत निवड करून, चखोट धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिले. वरकड लष्करामध्ये

हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. शास्ताखान पुणियास आला ही खबर तहकीक आणविली, आणि राजे राजगडावरून सडे होऊन खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुलकर्णी. तर्फ खेड, हे दोघे बहुत शाहाणे व शूर, राजियाचे प्रीतिपात्र. हे दोघे बंधू बरोबरी घेतले. राजियांनीं नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे, यांच्या दोन फौजा केल्या. नेताजी पालकर पागा देखील एक फौज केली. शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज पेशवे (यांची.) अशा दोन फौजा शास्ताखानाच्या गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फा उभ्या केल्या. आणि खासा राजियांनी ढाल तरवार हातीं घेऊन, तयार होऊन, हजार माणूस पायउतारा बरोबर घेतले. आणि नबाबाचे गोटांत चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढें चालिले. त्यांचे पाठीवर कुल लोक व राजे चालिले. तांब्रांचे दळ थोर, जागां जागां लष्करांत राजियासि कोणाचे लोक? कोण? कोठें गेले होते? म्हणून पुसतात. ''कटकांतील लोक, चौकी पहाऱ्यास गेलों होतों,'' असे भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालिले. इतकियांत मध्यान्हरात्र जाहली. नबाबाच्या डेऱ्याजवळ गेले. हजार माणसांच्या फौजा केल्या. डेऱ्यास जाऊन दोन तर्फांनी उभे राहिले. दोनशे माणूस त्यामध्यें निवडून खासा राजियानें आंगेंच चिमणाजी बापूजीस सांगोन बाड कटारीनें चिरून आंत शिरले. तो डेरियांत डेरे, सात बाडांचे फेरे, तितकेही फोडून चिरून आंत गेले. लोक चौकीचे निजले होते. त्यांस कळों दिलें नाहीं. तेव्हां राजा खासा नबाबाचे डेरियासी पावले. डेरियांत डेरे सात व दाया असा समुदाय बायका होत्या, त्यांस कळलें की गनीम डेरियात आला. हें कळोन नबाब शास्ताखान घाबिरा होऊन, मेणबत्या समया विझवून बायकांत लपून राहिला. राजा बायकांवर हात न करी असे दोन घटका होते. इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाचीं बोटें तीन उडालीं, तेव्हां गलबा थोर जाहाला. गनीम आला असें कळून चौतर्फांनीं लष्कर तयार जालें. मग राजे बाहेर निघाले. चौकीचे लोक व लष्करचे लोक गनीम कोठें म्हणून धाऊं लागले. त्यांजबरोबर हेही गनीम कोठें म्हणून धांवत धांवत बाहेर निघाले! आणि आपली फौज सरनोबत व पेशवे होते त्यांत मिळून चालिले. गनिमाची फौज कुल तयार होऊन आपले गोटांतच शोध करूं लागले. यांचा मार्ग लागत नाहीं म्हणून नीट वाटेनें निघोन ठिकाणीं पावली.

१.७ शब्दार्थ व टिपा

पुंडावा – बंडखोरी, **वाडा** – तट बंदीसहीत घर, **हुडा** – गावाच्या सभोवती तटबंदी व तोफा, **शिबंदी** – किल्यावरील संरक्षणाचे सैनिक, **मोकासा** – जहागीर (१ गाव), **तजवीज** – व्यवस्था (तयारी), **खटखट** – भांडण, **महाल** – प्रदेश, **महसूल**– जमिनीचा कर,

- **शिलेदार** – स्वतःचा घोडा, भाला, हत्यार घेऊन सैन्यात सामील होणारा सैनिक.
- **बारगीर** – सरकारी घोडा वापरणारा सैनिक, **तक्षिमा** – भाग
- **चौपन पादशाहीचा धनी** – अनेक राज्यांचा राजा हे सांगण्यासाठी ५४ ही संख्या अनेकअर्थी वापरली आहे.

- **साल्हेरी** – सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील शेवटचा किल्ला (उंची ५२९५ फूट)
- **अहिवंत** – हा किल्ला बागलाणजवळच्या चांदवड डोंगराच्या रांगेत वसला आहे. (उंची ४०१४ फूट), **चंदी** – म्हणजे जिंजी हा किल्ला.

१.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

- **वस्तुनिष्ठ प्रश्न**

१. शिवरायांनी मावळ प्रदेशातील कोणता किल्ला जिंकून स्वतःची पहिली राजधानी स्थापन केली?

अ) पन्हाळा ब) तोरणा

क) विशाळगड ड) प्रतापगड

२. शिवाजी महाराजांच्या घोडदळाचे किती विभाग होते?

अ) चार ब) पाच

क) दोन ड) सहा

३. राजगडावरून शिवाजीराजे दिल्लीस निघाले तेंव्हा त्यांच्याबरोबर कोण होते?

अ) संभाजी ब) राजाराम

क) जिजाऊ ड) कान्होजी आंग्रे

४. कृष्णाजीपंत व त्यांच्या बंधूना कोणता किताब दिला गेला?

अ) शिवभारत ब) विश्वासराव

क) हुकुमतपन्हा ड) चंद्रराव

५. शिवाजी महाराजांनी पन्हाळा मोहिमेवळी उशीरा आल्यामुळे कोणत्या सरदारास सरनोबत पदावरून काढून टाकले?

अ) प्रतापराव गुर्जर ब) नेताजी पालकर

क) हंबीरराव मोहिते ड) दत्ताजीराव मोरे

उत्तरे – १. ब २. क ३. अ ४. ब ५. ब

- **लघुत्तरी प्रश्न**

शिवाजी महाराजांचे व्यक्तिचित्रण सभासद बखरीच्या आधारे करा.

प्रास्ताविक : सभासद बखरीतील शिवाजी महाराजांचे व्यक्तिचित्रण आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येईल. कृष्णाजी सभासदाने ही बखर इ.स. १६९७ मध्ये लिहिली आहे. सभासद हा शिवाजी महाराजांच्या

दरबारी इ.स. १६६८ पासूनच कार्यरत होता. त्यामुळे त्याने लिहिलेले बखरीतील हे शिवचरित्र विश्वसनीय मानावे लागेल.

विवेचन :सभासद बखरीत शिवाजी महाराजांचे व्यक्तिदर्शन अत्यंत नेटके आणि इतिहासाशी जवळीक साधणारे असे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, वाडवडिलांनी स्वीकारलेली परकीयांची चाकरी, अल्पस्वल्प मनुष्यबळ यातून स्वराज्य साधनेच्या विचाराने प्रेरित झालेले, चार पातशाह्यांशी आयुष्यभर उभा दावा लावून स्वराज्य आणि स्वधर्म यांची प्रेरणा देणारे महाराजांचे व्यक्तिमत्त्व सभासदास अलैकिक वाटणे स्वाभाविक होते. अशक्य कोटीतील कार्य, मानवी शक्तीच्या पलीकडचे जिवावर बेतलेले एकेक प्रसंग, त्यातून युक्ती व बुध्दीने सहीसलामत सुटून पार होणाऱ्या व्यक्तिमत्त्वातील धैर्य, चातुर्य, साहस या गुणांचे दर्शन घडविले आहे; पण हे धैर्य, चातुर्य, साहस मानवी न राहता अवतारी गणले गेले.

समारोप : महाराजांच्या भावजीवनाचे व कौटुंबिक जीवनाचे दर्शन अत्यंत साक्षेपाने घडविले आहे. आदर्श राजा, थोर प्रशासक, कुशल सेनानी याबरोबर आदर्श पुत्र, आदर्श बंधू आणि आदर्श पिता अशा विविध पैलूंनी सभासदाने शिवाजी महारांजाचे व्यक्तिदर्शन घडविले आहे.

(सूचना : विवेचनात शिवरायांच्या जीवनातील विविध प्रसंग घेऊन विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना विस्तार करून लिहावे.)

- **दीर्घोत्तरी प्रश्न**

सभासद बखरीच्या आधारे शिवचरित्राचे स्वरूप स्पष्ट करा

प्रास्ताविक : कृष्णाजी अनंत सभासद विरचित 'शिवछत्रपतींचे चरित्र' किंवा 'सभासद बखर' ही शिवचरित्रावरील पहिली बखर. ती राजारामाच्या आज्ञेने जिंजी (चंदी) येथे लिहिली गेली. सभासद बखर ही मराठीतील पहिली चरित्रात्मक बखर होय. या बखरीनेच मराठीतील बखरीचा आदर्श निर्माण केला.

विवेचन : सभासद बखर ही शिवछत्रपतींची चरित्रपर बखर आहे. या बखरीमध्ये शिवाजी महाराजांच्या बालपणापासून ते देहावसानापर्यंतचा भाग चरित्ररूपाने येतो. तसेच शिवाजी महाराजांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व, त्यांचा दूरदृष्टीपणा, राज्यकारभारविषयक धोरण, राजनीती, त्यांनी सर्व सामान्य लोकांमध्ये निर्माण केलेले राष्ट्रप्रेम,शिवाजी महाराजांची युध्दनीती, मुत्सद्दीपणा, शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य, त्यांचा गनिमी कावा, त्यांनी केलेल्या स्वाऱ्या, जलदुर्गविषयक धोरण, शिवचरित्रातील महत्त्वाच्या प्रसंगाची सलग गुंफण करीत एक दीर्घकथात्मक आकृतिबंध आणि तत्कालास अभिप्रेत होती, तेवढी शिवचरित्र कथा सभासदाने अभिव्यक्त केली आहे.

समारोप : थोड्या थोड्या शब्दांतून व वाक्यातून अर्थघनता स्पष्ट होते. प्रसंगवर्णनात चित्रमयता दिसून येते. ओघवती भाषा, संस्कृतप्रचुरता हे सभासदाच्या भाषाशैलीचे गुण म्हणता येतील. भावनोत्कटता, आदर इत्यादी गुणही दिसून येतात.

(सूचना : विवेचनात शिवचरित्रातील विविध प्रसंगाआधारे विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना विस्तार करून लिहावे.)

१.८ सरावासाठी प्रश्न

- **वस्तुनिष्ठ प्रश्न**

योग्य पर्याय निवडा.

१. शिवाजी अफजलखान भेटीवेळी खानाबरोबर कोण वकील होते?

अ) कृष्णाजी पंत ब) सय्यद बंडा

क) जिवा महाल ड) दिलेरखान

२. शिवाजी महाराजांनी मुलूखाची मोजणी करण्यासाठी कोणते साधन वापरले?

अ) एकर ब) शिवशाही काठी

क) हेक्टर ड) किलोमीटर

३. दिलेरखान पुरंदरवर चालून गेला तेव्हा तेथे किल्लेदार कोण होते?

अ) सुभानसिंग ब) सूर्याजी पिसाळ

क) मुरारबाजी ड) तानाजी मालुसरे

४. आग्र्यात शिवरायांच्या हवेलीभोवती कोण सरदार सैन्यानिशी वेढा टाकून बसला होता?

अ) जाफरखान ब) दिलेरखान

क) पोलादखान ड) राजा जयसिंग

- **दीर्घोत्तरी प्रश्न**

१. सभासद बखरीच्या आधारे शिवाजी महारांजाच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू विशद करा.

२. सभासद बखरीच्या आधारे शिवचरित्राची वैशिष्टये स्पष्ट करा.

- **लघुत्तरी प्रश्न**

१. शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका प्रसंग विशद करा.

२. शिवाजी महाराजांचे राज्यकारभारविषयक धोरण स्पष्ट करा.

३. शिवाजी महाराजांचे आरमारविषयक धोरण स्पष्ट करा.

४. सभासद बखरीचे वाङ्मयीन विशेष स्पष्ट करा.

१.९ वाचन

१. मल्हार रामराव चिटणीसकृत 'सप्तप्रकरणात्मक चरित्र' (१८१०)

२. खंडो बल्लाळ चिटणीसकृत 'शिवदिग्विजय'(१८१८)

१.१० उपक्रम

- ऐतिहासिक गडकिल्ल्यांना भेटी देणे.
- मोरोपंत वाचनालय, पन्हाळा येथे भेट देणे.

❑❑❑

सत्र ३ : घटक २

सभासद बखर : प्रसंगचित्रे

२.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- 'सभासद बखर'मधील प्रसंगचित्रे समजून येतील.
- 'सभासद बखर'मधील युद्धवर्णन समजून येईल.
- 'सभासद बखर'मधील प्रसंगचित्रातील नाट्य कळेल.
- 'सभासद बखर'मधील प्रसंगचित्रांचे विशेष समजून येतील.

२.२ प्रास्ताविक

बखर हा मध्ययुगीन गद्य वाङ्मयप्रकार आहे. अरबी 'खबर' या शब्दाचा वर्णविपर्यय म्हणजे 'बखर' हा शब्द होय. खबर म्हणजे वार्ता, माहिती किंवा समाचार. ते एक हकीकतवजा लेखन आहे. मुस्लिम अमलात 'तवारिखा' हा लेखनप्रकार रूढ होता. त्यातही घडलेल्या घटना लिहून ठेवण्याची पद्धत होती. त्यामुळेच मोल्सवर्थच्या शब्दकोशात बखर म्हणजे 'Any history, narration or chronicle in Prakrit Prose' असा अर्थ दिला आहे. मेजर कँडी यांनीही बखर म्हणजे 'A written narative or history in Prakrit Prose.' असे सांगितले आहे. यावरून बखरीचे लेखन हे इतिहासलेखनाला जवळ जाणारे आहे, असे म्हणता येते.

बखरीमध्ये इतिहास आढळत असला तरी, शास्त्रीय दृष्टिकोनातून त्याचे लेखन झालेले नसते. त्यामुळे बखरीचे लेखन हे वाङ्मयाला अधिक जवळचे असते. इतिहासलेखनाला आवश्यक ते पुरावे द्यावे लागतात. बखरीत असे पुरावे दिले जात नाहीत. त्यामुळे बखरकार हा इतिहासलेखक नसतो तर तो वाङ्मयलेखक असतो. किंबहुना इतिहास आणि वाङ्मयाचा मेळ घालून लिहिणारा बखरकार हा नेणिवेच्या पातळीवरील कलावंत किंवा साहित्यिक या पदवीस पात्र ठरतो.

व्यक्तिदर्शन हा मराठी बखरीचा अतिशय महत्त्वाचा गुणविशेष आहे. त्यामुळे लोकोत्तर किंवा असामान्य व्यक्तींच्या कार्यावर बखरीमधून प्रकाश टाकलेला लक्षात येतो. बखरकार ज्या काळात लिहीत होते त्यावेळी त्यांच्यापुढे मुस्लिम काळातील तवारिखा आणि रामायण-महाभारतावरील आख्यायिका होत्या. त्यामुळे आख्यायिका आणि इतिहास या दोन्ही माध्यमांचे दर्शन बखरीत होते. हे लक्षात आल्यामुळे डॉ. बापूजी संकपाळ म्हणतात, ''बखर म्हणजे आख्यायिका आणि तीमधून सत्यार्थाचा मागोवा घेत जाणारी इतिहासकथा यांचा अन्योन्य संबंध शिवचरित्रपर बखरीमधून व्यक्त होतो.'' (बखर वाङ्मय :

उद्‌गम आणि विकास, पृ. २८)

व्यक्तिदर्शन हा बखरीचा गुण असला तरी तत्कालीन राजकीय उलाढाली, धार्मिक व कौटुंबिक जीवन, महाराष्ट्र संस्कृती, भाषा, मानवी स्वभाव, युद्ध अशा विषयांना बखरकार स्पर्श करीत होता. त्यामधून मराठी बखरीचे वर्गीकरण करता येते. चरित्रकथा, युद्धकथा, दौलतीची कथा आणि स्फुटकथा या चार प्रकारात बखरीचे लेखन झालेले आढळून येते. बखरवाङ्‌मय वाचनीय ठरते ते त्यातील प्रसंगवर्णनामुळे. कृष्णाजी अनंत सभासद हे प्रसंगवर्णनात कशा प्रकारे रममाण होतात, कोणकोणत्या प्रसंगचित्रांना ते महत्त्व देतात, याचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येतो.

२.३ विषय विवेचन

'सभासद बखर'मधील प्रसंगचित्रे पाहण्यापूर्वी प्रसंगचित्रे म्हणजे काय, हे समजून घ्यावे लागते. कथात्म वाङ्‌मयप्रकारात प्रसंगचित्रणाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे कथानकास आकार प्राप्त होतो. बखरीमधूनही विविध प्रसंगचित्रे रेखाटल्यामुळे कोणत्या विषयावर बखर लिहिली आहे, हे समजून घेता येते. लेखक विविध प्रसंगांची मांडणी हेतुतः करीत असतो. तो असेच प्रसंग क्रमशः मांडत जातो की, ज्यामुळे व्यक्तिदर्शन किंवा चरित्रकथेला आकार मिळेल.

घटना आणि प्रसंग हे शब्द एकाच अर्थाने वापरले जात असले तरी, त्यामध्ये काही सूक्ष्म फरक लक्षात येतो. घटना या शब्दात घडण्याची किंवा बनण्याची क्रिया समोर येते. घडून गेलेली क्रिया, वास्तव बाब म्हणजे घटना. प्रसंग म्हणजे विशिष्ट असा काळ, स्थिती, वेळ आणि त्या काळात होणाऱ्या विविध क्रिया-प्रतिक्रिया. लेखक साहित्यकृतीत काही तरी घडत आहे, याविषयीचे निवेदन करतो. व्यक्तीच्या जीवनात 'लग्न' ही घटना महत्त्वाची ठरते. तर लग्नात चालणाऱ्या विविध बाबींमधून लग्नातले प्रसंग समोर येतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात 'राज्याभिषेक' ही महत्त्वाची घटना ठरते तर राज्याभिषेकात चाललेल्या घडामोडीतून प्रसंगचित्र समोर येते. त्यामुळे घटना आणि प्रसंग हे परस्परपूरक संकल्पना असल्याचे लक्षात येते.

प्रसंगचित्रांना चलचित्राचे स्वरूप प्राप्त होत असते. प्रत्यक्ष घडत चाललेल्या बाबी लेखक मांडत जातो. प्रसंगचित्रांमुळे जे काही सांगायचे आहे अथवा भाष्य करावयाचे आहे, त्यास आधार मिळतो. प्रसंगचित्रणासाठी काळ आणि अवकाश यांचे संयोजन साधले जाते. भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमानकाळ जोडण्यासाठी प्रसंगचित्रे उपयोगी पडतात. मराठी बखरींमधून अशी विविध प्रसंगचित्रे आढळतात. त्यातून युद्ध, पराक्रम, राजनीती, स्वभावविशेष, मानसिकता, वातावरण आणि स्थिती समजून घेता येते.

बखरीमधील प्रसंगचित्रात केवळ राजकीय इतिहास आढळत नाही. त्या इतिहासाला बखरकार भावनेची जोड देतो. त्यामुळे लेखकाची आत्मनिष्ठा पाहावयास मिळते. तो व्यक्तिदर्शनासाठी सर्वच प्रसंगांची मांडणी करीत नाही. त्यासाठी त्याला महत्त्वाच्या वाटलेल्या प्रसंगांची तो निवड करून स्वतःच्या मनाचे रंग त्याला देतो. त्यातून तो प्रसंग रंजक होत जातो. काही प्रसंगासाठी अद्‌भुतरम्यता, चमत्कारदर्शन,

अवतारकल्पना, स्वप्नदृष्टांत अथवा कौल देणे अशा बाबी तो देतो आणि रंजकता वाढवत नेतो. शिवपूर्वकाळातील केशवाचार्याने 'महिकावतीची बखर'मध्ये यादवकालीन आख्यायिका मांडली आहे. 'राक्षसतागडीची बखर' मध्ये राक्षसतागडीचे युद्धप्रसंग मांडले आहेत. शिवकालीन बखरींमध्ये '९१ कलमी बखर'तून दत्ताजी त्रिमल वाकेनवीस यांनी शिवछत्रपतींच्या जीवनातील ठळक प्रसंग मांडले आहेत. तर 'सभासदाची बखर'मधून कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिवचरित्रातील अतिशय महत्त्वाच्या प्रसंगांचीच गुंफण केली आहे. पेशवेकालीन बखरीत प्रसंगचित्रणाला विशेष महत्त्व दिल्याचे दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या आज्ञेने चंदी येथे कृष्णाजी अनंत सभासद यांनी इ.स. १६९७ मध्ये शिवछत्रपतींचे चरित्र लिहिले. त्यास 'सभासद बखर' असे नाव मिळाले. या बखरीत प्रसंगचित्रांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

१. अफझलखान वधाचा प्रसंग

'अफझलखान वध' हा शिवचरित्रातील अतिशय महत्त्वाचा प्रसंग आहे. कृष्णाजी अनंत सभासद यांनी हा प्रसंग चित्रवेधक स्वरूपात चित्रित केला आहे. तत्कालीन राजकीय इतिहासाला या प्रसंगाने कलाटणी मिळाली. मुख्य प्रसंगाभोवती बखरकार लहान-लहान प्रसंगांचीही मांडणी करतो. त्यामुळे हा प्रसंग इतिहासात अजरामर झाला आहे.

विजापूरच्या आदिलशहाचा दरबार भरलेला असतो. सुलतान महमद यांची पत्नी बडीसाहेब ही शिवाजी राजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणाला पाठवावे? असा प्रश्न करते त्यावेळी कोणीही कबूल होत नाही. अफझलखान मात्र तयार होतो. 'शिवाजी काय? चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो.' असे आश्वासन देतो आणि औरस चौरस फौजेसह रवाना होतो. या प्रसंगातून आदिलशहाची चिंता आणि अफझलखानाने ती स्वतःवर घेतल्याचे लक्षात येते.

अफझलखान तुळजापूरला जातो. भवानीची मूर्ती फोडतो. पंढरपूरला जाऊन तिथे उपद्रव देतो. पुढे वाई येथे जाऊन कृष्णाजी भास्कर यांच्याकरवी शिवाजीराजांना निरोप देतो. निरोप मिळताच प्रमुख सरदारांना बोलावले जाते. माता जिजाऊंचा आशीर्वाद घेतला जातो. प्रतापगडावर सर्व सरदार, सरकारकून यांना बोलावून सल्लामसलत सुरू होते. आपल्याकडील पंताजी गोपीनाथ यांना कृष्णाजी भास्करसमवेत खानाकडे पाठवले जाते. खानाबरोबर चर्चा होते. शिवाजीराजे जावळीला येतील, खानानेही तिथे यावे असे ठरते. खानाच्या मनात शंका आलेली पंताजी दूर करतात. सैन्यातील मुत्सद्दी वजीर याच्याकडून खानाचा डावपेच समजून घेतात. युद्धात शिवाजीराजे सापडणार नाहीत त्यामुळे भेटीच्या वेळी त्यांना पकडावे, असा खानाचा डाव पंताजीकडून राजांना कळतो. आपण घाबरलो आहोत, आपण वडील आहात, वाईला येऊन भेटल्यास भीती वाटते, आपणच जावळीस यावे असा निरोप पंताजीकरवी पाठवला जातो. खान खूश होतो. प्रतापगडाच्या पायथ्याला डेरा टाकून थांबतो. भेटीचे ठिकाण ठरते.

गडाखाली भेटीची तयारी केली जाते. मोत्याच्या झालरीने भेटीचे ठिकाण सजवले जाते. लोड, गाद्या टाकल्या जातात. नेताजी पालकरला डावपेच सांगितले जातात. राजे जरीचा कुडता, डोक्यास मंदिल, त्यात

तोडा, पायात चोळणा, हातात बिचवा, वाघनखे अशी तयारी करतात. सोबत जिवा महाला, संभाजी कावजी यांना घेऊन खानाच्या भेटीसाठी गडाखाली उतरतात. खानही तयारीने लष्करासह येतो. पंताजीपंत खानास म्हणतात, ''इतका जमाव घेऊन गेलियाने राजा धाशत खाईल. माघारा गडावरि जाईल. भेटी होणार नाही. शिवाजी म्हणजे काय? यास इतका सामान काय करावा? राजा दोघां माणसांनिशी तिकडोन येईल. तुम्हीं इकडोन दोघांनिशी चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथे तजवीज करणे ते करा.'' खानास हे पटते. लष्कर दूर केले जाते.

राजे हळूहळू चालत खानाकडे जातात. खानाबरोबर सय्यद बंडा असतो. राजे त्यालाही दूर राहण्यास सांगतात. राजे व खान एकमेकांसमोर येतात. खान उभा राहून राजांना भेटतो. त्यावेळी खान राजांची मान पकडून काखेत धरतो. हातातल्या जमदाडीने राजांवर वार करतो. अंगातल्या जरीच्या कुडत्यावर वार होऊन तो फाटल्याचे राजांना कळते. ते हातातल्या वाघनख्या खानाच्या पोटात खुपसतात. खानाची चरबी बाहेर येते. दुसऱ्या हातातल्या बिचव्याने खानावर ते वार करतात. दोन वार करून निघून जातात. खान ओरडतो, ''मारिले! मारिले ! दगा दिधला ! बेगी धावा !!'' भोई खानास पालखीत घालून जात असतात त्यावेळी संभाजी कावजी भोयांच्या पायावर वार करतो. जिवा महाला त्याचा हात हत्यारासह तोडतो. खानाचे शिर घेऊन राजे गडावर जातात. पुढे परस्पर युद्ध होते. अशा प्रकारे शिवाजी राजांना पकडून नेण्यास आलेल्या अफझलखानाचाच वध होतो.

अफझलखानाच्या वधाचा प्रसंग बखरकाराने अतिशय समरसून लिहिला आहे. खान व राजे यांच्याकडील डावपेच, घाबरण्याचे नाटक, अहंकारामुळे खानाचे डावपेचांमध्ये फसणे आणि शेवटी स्वतःचा मृत्यू ओढावून घेणे हे चित्रित करण्यासाठी कृष्णाजी अनंत सभासद यांनी आपली कलात्मकता पणाला लावली आहे. हा प्रसंग शिवाजी राजांच्या बुद्धीवर, प्रसंगाला सामोरे जाण्याच्या धैर्यावर प्रकाश टाकतो. इतर उपप्रसंगांमुळे अफझलखान वधाचा प्रसंग गडद रूप धारण करतो.

२. शाहिस्तेखान पारिपत्याचा प्रसंग

अफझलखान वधाच्या प्रसंगानंतर 'सभासद बखरी'मध्ये उठून दिसणारा प्रसंग म्हणजे शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाचे केलेले पारिपत्य, हा होय. पारिपत्य म्हणजे बिमोड, दंड किंवा शिक्षा. शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाला का व कोणत्या रूपाने शिक्षा केली, हा या प्रसंगातला महत्त्वाचा भाग आहे. अफझलखान वधाची बातमी औरंगजेब बादशहाला कळते. 'शिवाजी बळावला' हा विचार करून औरंगजेब एक लाख फौजेसह नवाब शाहिस्तेखानाला दक्षिणेकडे पाठविण्याचे ठरवितो. शाहिस्तेखान म्हणतो, ''शिवाजी म्हणजे काय? त्यासि जातांच कैद करतो. गडकोट, मुलूख घेऊन फत्ते करितो.'' हे ऐकून बादशाहाला संतोष होतो. शाहिस्तेखान अमर्याद सैन्य, बत्तीस कोटी द्रव्यासह दिल्लीहून निघतो. तीन महिन्यांनी पुण्याला येतो. राजगडावर शिवाजीराजे सरकारकून व सरनोबत अशांना बोलावून घेतात. सल्लामसलत होते. निवडक लोक व लष्करासह ते पुण्याला पोहोचतात. नेताजी पालकर आणि मोरोपंत पेशवे यांच्या दोन फौजा केल्या जातात. शाहिस्तेखानाच्या गोटाबाहेर अर्धा कोस अंतरावर या फौजा उभ्या केल्या जातात. बाबाजी बापूजी

व चिमणाजी बापूजी या दोघांसह ते नवाबाच्या गोटात जातात. मुख्य प्रसंग वर्णन करण्यापूर्वी बखरकाराने शिवाजी महाराजांची पूर्वतयारी सांगितली आहे.

रात्र होते. शिवाजीराजे नवाबाच्या डेऱ्याजवळ जातात. चिमणाजी बापूंना सांगून डेऱ्याचे बाड कट्यारीने चिरतात. आत गेल्यानंतर चौकीचे लोक झोपल्याचे लक्षात येते. त्यांना कळू न देता राजे नवाबाच्या डेऱ्यात घुसतात. डेऱ्यात खोजे व दाया असा समुदाय असतो. शत्रू आल्याचे त्यांना कळते. शाहिस्तेखानालाही कळते. तो घाबरतो. मेणबत्त्या, समया विझवून बायकांमध्ये लपून बसतो. राजे स्त्रियांवर वार करीत नाहीत. दोन तासांनी नवाब बायकांतून बाजूला होऊन तलवार हातात घ्यायला जातो. तेवढ्यात शिवाजी राजांचे लक्ष त्याच्याकडे जाते. त्याचवेळी ते त्याच्यावर वार करतात. हाताच्या बोटांवर वार बसतो आणि शाहिस्तेखानाची तीन बोटे तुटतात. गोंधळ उडतो. खानाची फौज जागी होते. धावाधाव होते. त्यांच्याबरोबर शिवाजीराजेही धावतात. त्यांच्याप्रमाणे 'गनीम कोठे' असे ओरडतात व बाहेर पडून स्वतःच्या फौजेत मिसळतात. खानाची फौज गोटातच त्यांचा शोध घेते.

सकाळी सर्वांना नवाबाची बोटे तुटून पडल्याचे कळते. शाहिस्तेखान घाबरतो. आज बोटे तुटली, उद्या शीर कापले जाईल, लष्कर मदतीला येणार नाही, त्यामुळे दिल्लीला परत जावे, हा विचार तो करतो. तिसऱ्याच दिवशी तो दिल्लीला माघारी जातो. राजे राजगडावर जातात. शाहिस्तेखानाची तीन बोटे तुटून तो उजव्या हाताने थोटा झाला व तो दिल्लीला गेला, हे वृत्त त्यांना समजते. दिल्लीलाही हे वृत्त समजते. औरंगजेबाला आश्चर्य वाटते. 'शिवाजी आदमी नव्हे. बडा सैतान होय' असे तो बोलून दाखवतो.

'शाहिस्तेखानाचे शिवाजीराजांनी केलेले पारिपत्य' हा प्रसंग बखरकाराने समरसून रेखाटला आहे. वाचकांना तो सोबत घेऊन जातो. प्रत्यक्ष प्रसंगात सहभागी करून घेतो. औरंगजेबाच्या आणि शाहिस्तेखानाच्या मनातली दहशत तो मांडतो. शिवाजी महाराजांची नीती तो मांडतो. धाडसाने शत्रूच्या गोटात जाऊन शत्रूला धडा शिकविणारे शिवाजी महाराज तो उभा करतो. हा प्रसंग सभासद बखरीला वाङ्मयीन विशेष बहाल करतो.

३. औरंगजेबाबरोबरच्या संघर्षाचा प्रसंग

शाहिस्तेखानास शास्त केल्यामुळे दिल्लीपती औरंगजेब हादरून जातो. शिवाजीराजांना बरोबर घेऊन येण्यासाठी मिर्झाराजे जयसिंग यांची नेमणूक करतो. सोबत दिलेरखान पठाण यासही पाठवतो. हे वृत्त राजांना समजते. पुढे पुरंदर व कोंढाणा किल्ल्याच्या दरम्यान जयसिंगांचा मुक्काम होतो. तेथून परस्परांना निरोप पाठवले जातात. दिल्लीचा बादशहा हा खूपच सामर्थ्यवान आहे, त्यांच्याशी शत्रूत्व न बाळगता राजांनी दिल्लीला भेटण्यास जावे, माझा पुत्र रामसिंगप्रमाणे आपण आहात, आपले वाईट होऊ देणार नाही, असे आश्वासन रघुनाथ पंडितांकरवी जयसिंग देतो. राजे व मिर्झाराजे जयसिंग भेटतात. दिलेरखानाचीही भेट होते आणि दिल्लीला राजे भेटण्यासाठी येत आहेत, असा निरोप पाठवला जातो. या पार्श्वभूमीवर शिवाजीराजे आणि दिल्लीपती औरंगजेब यांच्यामधल्या संघर्षाचा प्रसंग बखरकाराने रेखाटला आहे.

शिवाजीराजे दिल्लीला पोहचतात. भेटीच्या दिवशी बादशहा स्वतःजवळ पाच हत्यारे ठेवतो. अंगात जरीचा कुडता घालून तख्तावर बसतो. तख्ताजवळ दोन हजार शूर, मर्द माणसे उभा करतो. अफझलखानास जसे मारले, तसे उडी घेऊन तख्तावर येऊन दगा दिला तर काय करायचे? अशी शंका औरंगजेबाच्या मनात येते. संभाजीराजेंना सोबत घेऊन शिवाजीराजे आत जातात. त्यांना पाहताच बादशहा म्हणतो, ''आवो शिवाजीराजे.'' हे ऐकून शिवाजीराजे तीनदा सलाम करतात. मनात मात्र पहिला सलाम श्रीशंभुमहादेवास, दुसरा श्रीभवानीस तर तिसरा वडील शहाजीराजांना करतात. नवकोट मारवाडचे महाराज जसवंतसिंग यांच्या मागे उभा राहण्यासाठी बादशहा त्यांना हुकूम करतात. याचा त्यांना अपमान वाटतो. 'जसवंतसिंगसारखा उमराव! याच्या पाठी माझ्या लष्करांनी पाहिल्या असतील. त्यांचे खाली आपण उभे राहावे म्हणजे काय?' असे म्हणून जसवंतसिंगास मारण्याच्या हेतूने रामसिंगास शिवाजीराजे कट्यार मागतात. रामसिंग त्यांना धीर धरण्यास सांगतो. हे बादशहाला समजते. संघर्ष वाढेल म्हणून राजांना डेऱ्यात घेऊन जाण्यासाठी रामसिंगला बादशहा सांगतो.

डेऱ्यात आल्यानंतरही शिवाजीराजे शांत झाले नव्हते. बादशहाला वस्तुस्थिती समजत नाही, कोण हा बादशहा, मला जसवंताच्या मागे थांबण्यास सांगतो, असा विचार ते बोलून दाखवतात. रामसिंग त्यांना सांगतात, ''तुम्ही भेटीस येऊ नये. आले तरी रस-रंग राखून निघून जावे.'' बादशहाचा उद्देश राजांना कळाल्यामुळे परत जाण्यापूर्वी बादशहाला ते पत्र पाठवतात. पत्राच्या मागेच 'सबुरी करणे' असे उत्तर बादशहा लिहितो. राजांना बादशहाचा डाव समजून येतो. परस्परांविषयी मनात शंका निर्माण होतात. संघर्षाला आरंभ होतो.

दिल्लीपती औरंगजेब यांच्याबरोबर शिवाजीराजांचा झालेला हा संघर्ष बखरकारांनी सहेतूक निवडून चित्रित केला आहे. त्यातून शिवाजीराजांचा स्वाभिमान आणि औरंगजेबाचा धूर्तपणा लक्षात येतो. दिल्ली दरबारात शिवाजीराजांचा झालेला अपमान, बादशहाने त्यांच्यावर केलेली नजरकैद एका नवीन पेचप्रसंगाला जन्माला घालते.

४. शिवरायांची आग्ऱ्याहून सुटका

'आग्ऱ्याहून सुटका' हा 'सभासद बखरी'मधील अतिशय वेगळा प्रसंग आहे. दिल्ली दरबारात शिवाजीराजांचा अपमान होतो. त्यामुळे बादशहा खबरदारी घेतो. राजांच्या डेऱ्याभोवती पाच हजार सैनिकांसह चौकी देण्याचा आदेश पोलादखान कोतवाल यास देतो. सोबत संभाजीराजे असल्यामुळे राजे घाबरतात, कष्टी होतात. संभाजीराजांना पोटाशी धरून खेद व्यक्त करतात. यातून बाहेर पडण्यासाठी तयारी करतात. निराजीपंत, दत्ताजीपंत आणि त्रिंबकपंत राजांचे समाधान करतात. शिवाजीराजांच्या कुशाग्र बुद्धीचा नमुना म्हणजे संकटातून स्वतःची सुटका करून घेणे हा होय. बखरकार रोमहर्षकपणे हा प्रसंग चित्रित करतो.

दुसरे दिवशी वेळूचे दहा पेटारे मागवून त्यात मेवा भरतात. त्यातील चार पेटारे उघडून पाहिले असता त्यांना मेवा दिसतो. मजुरांना पेटारे बाहेर घेऊन जाण्यास परवानगी मिळते. पेटारे पाठवणे व आणणे असा राबता सुरू होतो. एक दिवस राजे व राजपुत्र एकाच पेटाऱ्यात बसतात. पुढे एक व मागे एक पेटारा ठेवतात.

राजांच्या ठिकाणी हिरोजी फरचंदाला झोपवले जाते. हात उघडा ठेवून त्यावर शेला पांघरविला जातो. एक मुलगा अंग रगडण्यासाठी ठेवला जातो. जवळच्या कारकुनांना यापूर्वीच दिल्लीपलीकडे तीन कोसावरच्या गावात पाठवलेले असते. चौकीचे लोक एक-दोन पेटारे उघडून पाहतात, बाकी न तपासता जाऊ देतात. शहराबाहेर आल्यानंतर दोघेही उतरून कारकून थांबलेल्या गावी जातात. तिथून वाराणसीकडे जातात. कोणी ओळखू नये, म्हणून अंगास राख लावून फकिराचे सोंग घेऊन मथुरेकडे जातात.

राजांच्या जागी हिरोजी फरचंद चार प्रहर रात्री व तीन प्रहर दिवस झोपलेला असतो. चौकीचे लोक येऊन बघून जातात. राजे शेला पांघरून झोपले आहेत व मुलगा पाय रगडत आहे, असे त्यांना दिसते. डोके दुखत असल्यामुळे राजे जास्त वेळ झोपल्याचे सांगितले जाते. एक दिवस हिरोजी उठतो व पाय रगडणाऱ्या मुलाला सोबत घेऊन बाहेर पडतो. जाताना चौकीदारास सांगतो, ''शीर दुखते. कोणी कोठडीत जाऊ लागेल त्यांना मनाई करणे. आपण औषध घेऊन येतो.'' तो रामसिंगाच्या गोटात जाऊन वर्तमान सांगतो व निघून जातो.

कोठडीत माणसांचा राबता दिसत नाही, हे लक्षात येताच चौकीदार आत जाऊन पाहतो त्यावेळी पलंगावर कोणीही दिसत नव्हते. राजा पळाल्याचे वृत्त पोलादखान बादशहास सांगतो. तो म्हणतो, ''राजा कोठडीत होता. वरचेवर जाऊन पाहात असतां एकाएकी गइब जाहला. पळाला किंवा जमिनीमध्ये घुसला की अस्मानमध्ये गेला, हे न कळे. आम्ही जवळच आहो. देखत देखत नाहीसा झाला.'' हे समजताच बादशहा चौतर्फा फौजा रवाना करतो. राजांना शोधून कैद करून आणण्यास सांगतो. शहरात लपून बसलेला राजा रात्री येऊन दगा करील, अशी भीती औरंगजेबाला वाटते. स्वतःजवळ चौकी पहारा ठेवून तो तयारीने पलंगावरच बसून राहतो. शिवाजीराजे मथुरेत संभाजीराजांना ठेवून स्वतः दक्षिणेकडे जातात.

दिल्लीपती औरंगजेबाच्या नजरकैदेतून शिवाजीराजे सहीसलामत बाहेर पडतात. त्यावेळी पेटाऱ्याचा उपयोग करून चौकीदाराच्या डोळ्यात धूळ फेकतात. मेवा-मिठाईचा तो पेटारा उघडला असता तर वेगळाच प्रसंग उद्‌भवला असता. तो उद्‌भवू नये यासाठी काही दिवस पेटाऱ्याचे जा ये ठेवणे, ही अतिशय धीरोदात्त बाब आहे. या धाडसातून राजांचे लोकोत्तर दर्शन बखरकार घडवतो. त्यामुळे 'राजांनी स्वतःची करवून घेतलेली सुटका' हा प्रसंग रोमहर्षक ठरतो.

५. सभासद बखरीमधील युद्धप्रसंग

'सभासद बखरी'मध्ये युद्धाचे अनेक प्रसंग बखरकाराने चित्रित केले आहेत. माणूस टोळी करून राहू लागला आणि युद्धाचा आरंभ झाला. दुसऱ्या सत्ता प्रस्थापित करणे अथवा हितसंबंधाला धक्का बसणे या कारणांमुळे युद्धप्रवृत्ती वाढीस लागते. सामोपचारापेक्षा लढाईच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक केली जाते. शिवाजीराजांच्या उभ्या आयुष्यात युद्धाचे अनेक प्रसंग आले. पैकी कृष्णाजी अनंत सभासद यांनी काही निवडक युद्धांचे वर्णन बखरीत केले आहे.

अफझलखान वधानंतर दोन्ही सैन्यांमध्ये झालेली लढाई बखरकार सर्वप्रथम मांडतो. खानाचे बारा हजार लष्कर अगोदरच भयभीत झाले होते. राजांच्या फौजेने त्यावर चौतर्फा मारा केला. दोन प्रहर युद्ध

चालले. खानाकडची अनेक माणसे ठार होतात. 'हत्ती तोडिले, ते जागा ठार झाले. कित्येक हत्तीची पुच्छे तोडिली. कित्येक हत्तींचे दांत तोडिले, कित्येक हत्तीचे पाय तोडिले. तसेच घोडे एकच वाराने जिवे मारिले. तसेच खानाचे लष्करी कित्येक ठार मारिले. कित्येकांचे पाय तोडून पाडिले. कित्येकांचे दात उडविले. कित्येकांची डोचकीं फोडिली. कित्येक मेले... तसेच उंटे मारिली... रक्ताच्या नद्या चालल्या. रणकंदन जाले.' या वर्णनातून युद्धाचे स्वरूप समजून येते. बखरकार स्वतः युद्धात सहभागी होऊन पाहतो आहे, असे वाटते. अतिशयोक्त वर्णनामुळे युद्धप्रसंगाला गडद रूप मिळाले आहे. या युद्धानंतरचा प्रसंगही बखरीत येतो. शरण आलेल्यांना सोडून दिले जाते. अफझलखानाचा मुलगा फाजल पायाला चिरगुटे बांधून झाडीत पळून जातो. त्याला पकडून आणले जाते. त्याला व वजिरास वस्त्रे, भूषणे देऊन सोडून दिले जाते.

या बखरीत पुरंदर किल्ल्यावरच्या युद्धाचा प्रसंग आला आहे. शाहिस्तेखानाच्या पारिपत्यानंतर मिर्झाराजे जयसिंग व दिलेरखानास शिवाजीराजांवर पाठवले जाते. कोंढाणा-पुरंदर दरम्यान राहिल्यानंतर दिलेरखान जयसिंगास कोंढाणा घेण्यास सांगतो व स्वतः पुरंदर घेण्यासाठी तयार होतो. युद्धाला आरंभ होतो. पुरंदरवर मुरारबाजी होता. तो सैन्यासह गडाखाली येतो आणि दिलेरखानावर आक्रमण करतो. पाचशे पठाण ठार होतात. मुरारबाजी मारत सुटतो. दिलेरखानही मारा करतो. मराठा मृत्युमुखी पडतात. दिलेरखान मुरारबाजीस स्वतःकडे वळवण्याचा प्रयत्न करतो. ''मी शिवाजीराजाचा शिपाई. तुझा कौल घेतो की काय?'' असे मुरारबाजी म्हणतो आणि दिलेरखानवर तलवारीचा वार करण्यास पुढे जातो. खान कमान-तीराने त्याला खाली पाडतो. मुरारबाजी पडला तरी राजाचे सैनिक लढत राहतात. दिलेरखान पुरंदर घेतो. या युद्धप्रसंगात मुरारबाजी कामी येतो.

'कोंडाणा' किल्ल्यावरच्या लढाईचा प्रसंग या बखरीत आला आहे. सत्तावीस गड मोगलांना दिलेले असतात. ते परत मिळविण्याची तयारी होते. तानाजी मालुसरे कोंडाणा घेण्यासाठी पाचशे माणसांसह गडाखाली येतो. सर्वजण रात्री वानराप्रमाणे गडावर चढून जातात. गडावर उदयभानू असतो. त्याला कळताच तो हल्ला करतो. मावळे रजपुतांवर वार करतात. पाचशे रजपूत तर चाळीस-पन्नास मावळे ठार होतात. उदयभानू व तानाजी यांच्यात युद्ध होते. तानाजीची ढाल तुटते. हाताची ढाल करून तो लढतो व किल्ला काबीज करतो. पुढे सुरतेवर छापा टाकला. पण तिथल्या संघर्षाला युद्धप्रसंगाचे रूप आलेले दिसत नाही. याशिवाय घरात उंदराप्रमाणे शत्रू असलेल्या शिद्दीबरोबर लढाई झाली. समुद्रातही शिद्दीच्या जहाजाबरोबर युद्ध झाले. त्याच्या जहाजाचा पाडाव केला. कोकणातील कुडाळ येथे आदिलशहाच्या फौजेबरोबर युद्ध झाले.

सालेरीच्या वेढ्याचे युद्धवर्णन हे वाङ्मयीनदृष्ट्या उल्लेखनीय आहे. इखलासखान नबाब हा सालेरीस वेढा घालतो. हे शिवाजीराजांना समजताच ते प्रतापराव सरनोबत यांना पाठवतात. मोरोपंत कोकणातून येतात. सालेरी येथे चार प्रहर दिवस युद्ध होते. इखलासखान आणि बेलोलखान यांच्याबरोबर झालेल्या युद्धाचे वर्णन करताना बखरकाराची लेखणी लालित्यमयता रेखाटते. 'मोगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटे, आराबा घालून युद्ध झाले. युद्ध होताच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की, तीन कोश औरसचौरस, आपले व परके लोक माणूस दिसत नव्हते. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा

जाहाले. घोडी, उंट, हत्ती गणना नाही. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहले. त्यामध्ये रूतो लागले, असा कर्दम जाहला... खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव झाले.' हे युद्ध साक्षात घडते आहे, असा भास बखरकार निर्माण करतो. युद्धात केलेला पाडाव ऐकून सालेरीपासून चार मैलावर असलेला दिलेरखान माघारी पळून जातो. इतर युद्धप्रसंगांपेक्षा सालेरीच्या युद्धप्रसंगाचे चित्रण बखरकाराने अतिशय समरसून केले आहे.

या बखरीत आणखी काही युद्धप्रसंग चित्रित झाले आहेत. विजापूरहून अब्दुल करीम बेलोलखान चाल करून येतो. त्याच्यावर प्रतापरावांना पाठवले जाते. उंबराणी येथे नवाबाला गाठतात. त्याची चौतर्फा कोंडी करतात. पाणीही मिळणार नाही, अशी अवस्था करतात. तो माघार घेतल्याचे कळवतो. प्रतापराव त्याला सोडून देतात. तो काही दिवसांनी पुन्हा येतो. पुन्हा युद्ध होते. प्रतापराव ठार होतात. काही दिवसांनी विजापूरचा सरदार हुसेनखान मायाणा पठाण येतो. त्यांची हंबीरराव यांच्याबरोबर झुंज होते. हुसेनखानास पकडले जाते. पुढे कर्नाटकात चंदी येथे विजापूरकर वजिराचे पुत्र रूपलखान व नासीरखान यांना आपल्या बाजूने राजे वळवतात. त्रिमल महाल येथील शेरखान मात्र राजांवर चालून येतो. त्यालाही पकडले जाते.

एकंदरीत 'सभासद बखरीत' बखरकाराने वर्णन केलेली काही महत्त्वाची युद्धे या बखरीला कलात्मक उंची देतात. युद्धवर्णनात झालेल्या लहान-सहान बाबींची माहिती मिळते. जीवित व वित्त हानी समजून येते. युद्धातले शौर्य, धाडस, निष्ठा आणि समर्पण लक्षात येते. प्रत्येक युद्धावेळी शिवाजीराजांना झालेला हर्ष आणि कष्टी वृत्ती बखरकार वर्णन करतो. त्यातून वीर, आनंद आणि शोकरसाचे दर्शन होते.

६. शहाजीराजांच्या मृत्यूचा प्रसंग

'सभासद बखरी'मधील एक छोटासा पण हृदयद्रावक असा प्रसंग म्हणजे, शहाजीराजे यांचा मृत्यू. शहाजीराजे बेंगलोर येथे होते. ते विजापूरकडे येताना अचानक चित्रदुर्ग येथे बोगदरी या गावी घोड्यावरून पडतात आणि त्यांचा मृत्यू होतो. हे शिवाजीराजांना समजते. त्यांना खूप दुःख होते. सर्व विधी झाल्यानंतर ते दानधर्म करतात. दुःखी होऊन म्हणतात, ''आपण आपला पुरुषार्थ कोणास दाखवावा? मागे अफझलखान मारिला व शास्ताखानास शास्ती केली. पराभवाते पावविला आणि मिरजा राजियाची भेट घेऊन दिल्लीस गेलो. पादशहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरे मारिली आणि पागा, शिलेदार लष्कर चाळीस हजार केले... समाधान-पत्रे आपणांस वरचेवर येत होती. तैशीच अलंकार-वस्त्रे पाठवीत होते या उपरी त्या मार्गे आपणांस कोणी आता वडील नाही.'' त्यानंतर जिजाऊ मातोश्री पतीनिधनानंतर सती जाण्यासाठी अग्निप्रवेश करीत असताना, ते तिच्या गळ्याला मिठी मारून म्हणतात, ''आपला पुरुषार्थ पाहावयास कोणी नाही. तू जाऊं नको.'' शिवाजीराजे व इतर लोकांच्या प्रयत्नामुळे जिजाऊचा अग्निप्रवेश रद्द होतो. युद्धवर्णनात झालेले वीररसाचे दर्शन शहाजीराजांच्या मृत्यूप्रसंगी शोकरसात कसे रूपांतरित होते याची प्रचिती यावेळी येते.

७. राज्याभिषेकाचा प्रसंग

शिवाजी महाराज आणि मराठी राज्य यांच्यासाठी शिवाजीराजांचा राज्याभिषेक ही अतिशय महत्त्वाची

घटना ठरली आहे. इतिहासात हा प्रसंग अजरामर ठरला आहे. या प्रसंगवर्णनात बखरकार अतिशय उत्कटपणे सर्व चित्रे रेखाटतो. राजाची कीर्ती ऐकून वाराणशीहून वेदमूर्ती गागाभट राजांच्या दर्शनासाठी येतात. राजे व सरकारकून त्यांना सन्मानाने घेऊन येतात. त्यांची अलंकार, पालखी, घोडे, हत्ती, द्रव्य देऊन पूजा करतात. ते संतुष्ट होतात. त्यांना वाटते शिवाजीराजांनी चारही मुसलमानी शाह्या दबवून पाऊण लाख घोडा, लष्कर, गडकोट मिळविले. असे असूनही त्यांना राजसिंहासन नाही. त्याकरिता मराठा राजा छत्रपती झाला पाहिजे. गागाभटाचे हे मत राजांना पटते.

छत्रपती होण्यासाठी शिवाजीराजांच्या क्षत्रिय घराण्याचा शोध घेतला जातो. उत्तरेकडील शिसोदिया घराण्यातील एक क्षत्रिय घराणे दक्षिणेकडे आले; ते राजांचे होते. त्यामुळे राज्याभिषेकासाठी कोणतीही आडकाठी आली नाही. देश-परदेशातून लोक येतात. सर्वांना मिष्टान्न भोजन दिले जाते. बत्तीस मणाचे सुवर्ण सिंहासन बनवले जाते. जेवढी अमोल नवरत्ने होती, ती त्याला जडवली. अशा प्रकारे रत्नजडित सिंहासन सिद्ध होते. रायरीचे नाव 'रायगड' ठेवले जाते. गडावर सिंहासन बसवले जाते. सात महानद्यांचे, इतरही मोठमोठ्या नद्यांचे, व समुद्राचे पाणी तीर्थ म्हणून आणले जाते. सोन्याचा कलश व सोन्याचा तांब्या तयार ठेवला जातो. आठ कलश व आठ तांब्यानी अष्ट प्रधानांनी राजांना अभिषेक करण्याचे निश्चित होते. शालिवाहन शके १५९६ मध्ये, ज्येष्ठ महिन्यास, शुद्ध १३ रोजी मुहूर्त पाहून राजांना मंगलस्नान घातले जाते. शिवाजीराजांना सिंहासनावर बसवून विधिवत अभिषेक पूर्ण केला जातो.

राज्याभिषेक झाल्यानंतर मोत्याच्या झालरीचे छत्र मस्तकावर धरले जाते. छत्रपती शिवाजी महाराज असे नाव मिळते. शकाची सुरुवात केली जाते. याकामी ज्यांनी पुढाकार घेऊन राज्याभिषेक केला त्या गागाभटास खूप द्रव्य दिले जाते. या प्रसंगाचा शेवट करताना बखरकार लिहितो, ''या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंछ बादशहा. मऱ्हाटा पादशहा येवढा छत्रपती झाला. ही गोष्ट कांही सामान्य झाली नाही.'' याचाच अर्थ इतर सर्व प्रसंगांपेक्षा छत्रपती शिवाजीराजांच्या राज्याभिषेकाचा प्रसंग हा असामान्य स्वरूपाचा होता, असे खुद्द सभासदांना वाटते.

८. सभासद बखरीतील अद्‌भुत प्रसंग

बखरकारांवर पुराणातील आख्यायिकांचा प्रभाव असल्यामुळे अनेक प्रसंग चित्रणावेळी काही अद्‌भुत प्रसंगांची जोडही ते देतात. सभासद बखरीतही काही अद्‌भुत प्रसंग चित्रित झाले आहेत. शिवाजीराजे यांचा जन्म होताच जिजाऊंच्या स्वप्नात श्रीशंभुमहादेव जागृत होऊन येतात व मी अवतार घेतल्याचे सांगतात. पुढे विजापूरहून शिवाजीराजांना कैद करण्यासाठी अफझलखान येतो. त्या रात्री तुळजापूरची श्रीभवानी स्वप्नात येऊन म्हणते, ''आपण प्रसन्न जाहालो. सर्वस्वे साह्य तुला आहे. तुझे हाते अफझलखान मारवितो. तुजला यश देतो. तूं काही चिंता करू नको.'' अफझलखान वधानंतर पुन्हा तुळजाभवानी स्वप्नात येते. अफझलखानाने भवानीची मूर्ती फोडलेली असते. त्या मूर्तीची स्थापना होऊन तिची पूजा चालू व्हावी, असे ती सांगते. शाहिस्तेखान राजांवर चालून येतो, त्यावेळीही श्रीभवानी राजांच्या अंगात येऊन बोलते. जवळचा कारकून ती वाक्ये लिहून ठेवतो व नंतर राजास सांगतो- 'लेकरास म्हणावे की, शास्तखान येतो त्याची फिकीर न

करणे. ... शास्ताखान येऊन उतरल्यावरि त्याचे गोटांत शिरून मारामारी करणे. पराभवाते पावविल्ये' पुढे मिर्झाराजे जयसिंग व दिलेरखान येतो तेव्हा श्रीभवानी बोलते, ''अरे मुला यावेळेचा प्रसंग कठीण आहे. जयसिंगास मारवत नाही. तो सला करीत नाही, भेटावे लागते. भेटून दिल्लीस जावे लागेल. तेथें कठीण प्रसंग होईल. परंतु आपण बराबर येईन. लेंकरास नाना यत्नें करून रक्षून घेऊन येईन. यशस्वी करीन. चिंता न करणे. म्हणोंन लेकरास सांगणे. ... राज्याची चिंता मला आहे. पूर्ण समजणे.'' दिल्लीला शिवाजीराजावर चौकीदार ठेवून कैद केली जाते त्यावेळी राजांना साक्षात्कार होतो– 'कांहीं चिंता न करणे. येथून तुजला सर्व शत्रूंस भूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें.'

शिवाजीराजांचा राज्याभिषेक होऊन ते छत्रपती होतात. ते श्रीशैल्य येथे जाऊन नीलगंगेत स्नान करून श्रीचे दर्शन घेतात. राजांना ते स्थळ कैलासासारखे वाटते. तेथेच देह अर्पण करावा, शिरकमल वाहावे असे त्यांना वाटते. त्यावेळी श्रीभवानी अंगात येऊन बोलते, ''तुज ये गोष्टी मोक्ष नाही. हें कर्म करूं नको. पुढे कर्तव्यही उदंड तुझें हातें करणे आहे.'' शिवाजीराजांचे निधन होते त्यावेळी शिवदूत विमान घेऊन येतात आणि राजे विमानात बसून कैलासास जातात. जड शरीराचा मृत्यूलोकी त्याग करतात, असे वर्णन येते. अशा सर्वच अद्‌भुत प्रसंगांमध्ये बखरकाराची श्रद्धादृष्टी दिसून येते. असामान्य कर्तृत्व करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अवतारस्वरूप पाहण्याची भारतीयांची दृष्टी येथे चित्रित झाली आहे. वस्तुतः छत्रपती शिवाजीराजांचा पराक्रम अतुलनीय होता. शत्रूही आश्चर्यचकित व्हावा, अशी युद्धनीती त्यांची होती. रामायण, महाभारतामध्ये चित्रित झालेले अद्‌भुत प्रसंग बखरकारांच्या समोर असल्यामुळे छत्रपती शिवाजीमहाराजांना साह्य करणारी अमानवी शक्ती चित्रित करावी, असे कृष्णाजी अनंत सभासदांना वाटणे साहजिक आहे. त्यामुळे तर आख्यायिका आणि इतिहास यांच्या माध्यमातून बखर वाङ्‌मय निर्माण झाले आहे, असे म्हणता येते.

याशिवाय 'सभासद बखरी'मध्ये शिवाजीराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजे यांचाही प्रसंग येतो. राजाराम महाराजांचा जन्म हा पायाकडून होतो. त्याला बखरकार पालथा जन्मला असे म्हणतो. त्यावरून तो दिल्ली पादशाही पालथा घालील, असे राजे म्हणतात. संभाजीराजे मोंगलास जाऊन मिळतात, त्यामुळे शिवाजीराजे हताश होतात, हा प्रसंगही या बखरीत येतो. पुढे पिता–पुत्राची भेटही होते. शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूचा प्रसंग बखरकार रेखाटतो. आपले आयुष्य संपणार हे कळताच राजे मातबर लोकांना बोलावून घेतात. सर्वांना समजावून सांगतात. निरोपाची भाषा बोलताना सर्वांचे कंठ दाटून येतात. हा मृत्यूलोक आहे, जन्मलेले कित्येकजण गेले आहेत. तुम्ही सर्व जण निर्मळ सुखरूप बुद्धीने वागावे, सर्व जण बाहेर बसावे, आपण श्रीचे स्मरण करतो, असे म्हणून शके १६०२, चैत्र शुद्ध १५, रविवारी रायगड येथे ते प्राण सोडतात.

एकूणच सभासद बखरीमध्ये 'बारा मावळे काबीज करणे, कल्याण–भिवंडी मोहीम, अफझलखान वध, शाहिस्तेखानाचे पारिपत्य, दिल्लीपतीशी संघर्ष, नजरकैदेतून सुटका, राज्याभिषेक, शहाजीराजांचा मृत्यू, व्यंकोजी प्रकरण, राजारामांचा जन्म, युद्धप्रसंग, अद्‌भुतप्रसंग आणि शिवाजीराजांचे निधन' असे निवडक प्रसंग आले आहेत. त्यातून शिवाजी महाराजांचे चरित्र आकारास आले आहे.

२.४ समारोप

कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजाराम महाराज यांच्या आज्ञेवरून लिहिलेली बखर ही 'सभासद बखर' म्हणून नावारूपास आली आहे. शिवाजी महाराजांचे बखररूपात आलेले हे पहिले चरित्र आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनातील निवडक प्रसंग बखरकाराने येथे मांडले आहेत. प्रत्येक प्रसंगचित्रणात नाट्य निर्माण झालेले आढळते. बखरकार प्रसंगवर्णनात समरास झाल्याचे लक्षात येते. प्रमुख प्रसंगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी लहान-लहान प्रसंगांची मांडणी केलेली आहे. इतिहासातील प्रसंगांचे निवेदन करताना बखरकार आख्यायिकांचे साह्य घेतो. त्यामुळे चित्रित झालेले प्रसंग हे मराठमोळे वाटतात. बखरकार हा किती श्रद्धाशील आहे, हे पाहण्यासाठी या बखरीतील अद्‌भुतप्रसंग लक्षात घेता येतात. ही बखर वाङ्मयीनदृष्ट्या सरस ठरण्याचे कारण म्हणजे बखरीतील प्रसंगचित्रण हे होय. अतिशय तन्मयतेने प्रसंगचित्रांची मांडणी झाली आहे. युद्धवर्णनावेळी निर्माण झालेला वीररस, मातब्बर माणसे मृत्यूमुखी पडल्यानंतर निर्माण झालेला शोकरस, विजयावेळी निर्माण झालेला हास्यरस आणि श्रीभवानी स्वप्नात येऊन अथवा अंगात येऊन बोलते त्यावेळी निर्माण झालेला अद्‌भुतरस यामुळे बखरीची रसोत्कटता वाढत जाते. चित्रमयता हा या बखरीतील प्रसंगचित्रणाचा एक विशेष आहे. अफझलखानाचा वध आणि शाहिस्तेखानाचे पारिपत्य अशा प्रसंगांना अवीट चित्रमयता प्राप्त झाली आहे. त्यामुळे सभासद बखरीला वाङ्मयीन आदर्श मानण्यात आले आहे. एकूणच 'सभासद बखर' म्हणजे छत्रपती शिवरायांची प्रसंगचित्रांच्या माध्यमातून लिहिलेली मनमोहक चरित्रकथा आहे.

२.५ वाचन उतारे

- **वाचन उतारा क्रमांक १**

शिवाजी म्हणजे काय?

गोटांतून भेटीस यावयास खानही सिद्ध होऊन चालले. बराबरि लष्कर हजार दीड हजार बंदुखी मुस्तेद होऊन चालिले. मोठे मोठे धारकरी लोक समागमें निघाले, चालिले. इतक्यात पंताजीपंत पुढें होऊन अर्ज केला कीं, ''इतका जमाव घेऊन गेलियाने राजा धाशत खाईल. माघारा गडावरि जाईल. भेटी होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय? यास इतका सामान काय करावा? राजा दोघां माणसांनिशी तिकडोन येईल. तुम्हीं इकडोन दोघांनिशीं चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथें तजवीज करणें ते करा.'' असें सांगितल्यावरि अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरि उभे राहून खासा खान, एक पालखी, दोघे हुद्देकरी व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें चालिले. सैदबंडा म्हणोन पटाईत एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतही बराबरि आहेत. असे सदरेंत गेले. सदर देखोन खान मनांत जळाला कीं, ''शिवाजी म्हणजे काय? शाहाजीचा लेंक. वजीर यास असा जरी बिछाना नाहीं ! अशी मोतीलग सदर म्हणजे काय? पातशाहास असा सामान नाहीं, येणे जातीचा त्यानें सामान मेळविला.'' असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे, ''पादशाही माल पादशाहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तजवीज काय?'' असें बोलून सदरेस बैसले. राजियास सिताब आणवणें म्हणून जासूद हरकारे रवाना केले.

अफजलखानाचा वध

राजे गडाचे पायीं उभे होते, तेथून हळू हळू चालिले. समाचार घेता खानाबरोबर सैदबंडा मोठा धारकरी आहे हे ऐकून उभे राहिले आणि पंताजीपंतास बोलावू पाठविलें. ते आले. त्यास म्हणूं लागले जे, ''जैसे महाराज तैसे खान. आपण खानाचा भतीजा होय. ते वडील सैदबंडा खानाजवळ आहे त्याकरिता शंका वाटते. हा सैदबंडा इतका यातून दूर पाठवणें,'' म्हणोन पंताजीपंतास सांगितलें. त्यावरून पंताजीपंत (यानें) जाऊन कृष्णाजीपंताकडून खानास सांगोन सैदबंडाही दूर पाठविला. खान व दोघे हुद्देकरी राहिले. तेव्हां राजेही हिकडून जिऊ महाला व संभाजी कावजी दोघे हुद्देकरी (यां) सहित गेले. खानही उभा राहून, पुढें सामोरा येऊन राजियास भेटला. राजियानें भेटी देतां खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांके खालें धरिली आणि हातींची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविलीं. तों आंगांत जरीची कुडती होती त्यावरि खरखरली. आंगास लागली नाहीं. हें देखोन राजियांनीं डावे हाताचें वाघनख होतें, तो हात पोटात चालवला. खानानें आंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करिताच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिचवियाचा मारा चालविला ऐसे दोन वार करून मुंडी आसडून, चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले. खानानें गलबला केला कीं, ''मारिलें! मारिलें! दगा दिधला! बेगी धावा!!'' असें बोलताच भोयांनीं पालखी आणिली आणि पालखींत घालून, उचलून चालविला. इतकियात संभाजी कावजी महालदार यानें भोयांचे पाय मारिले आणि पालखीवालें भोयांस पाडिलें. खानाचें डोचकें कापिलें. हातीं घेऊन राजियाजवळ आला. इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला. त्यानें राजे जवळ केले. पट्याचे वार राजियावरि चालविले. तों राजियानें जिऊ महालियाजवळ आपला हुद्दियाचा पट्टा (होता तो) घेऊन, पट्टा व बिचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढले. पांचवे हातानें राजियास मारावें तों इतकियांत जिऊ महाला याणें फिरंगेनें खांद्यावरि सैदबंडियासि वार केला. तो पट्टियाचा हात हत्यारा समेत तोडिला. आणि खानाचें शीर घेऊन राजे सिताब गडावरि जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.

खानाच्या लष्कराचा पाडाव

गडावरि जातांच एक भांड्याचा आवाज केला. तेच गडाखालील लोक व घाटावरील लोक व लष्कर व कोंकणांतून मोरोपंत व मावळे असे चौतर्फी चोहोंकडून चालोन खानाचे गोटावरि आले. आणि खान मारून, शीर कापून राजे गडावरि गेले, ही खबर कळोन कुल खानाचे बारा हजार लष्कर धास्त घेऊन अवसान खस्त जाहालें. इतकियांत राजियाच्या फौजा चौतर्फा मारीत चालले. मोठें घोरांदर युद्ध जाहालें. दोन प्रहर घोरांदर युद्ध जाहालें. खानाकडील मोठमोठे वजीर व लष्करी महदीन व उजदीन पठाण, रोहिले, सुरनीस (?) व आरबी वगैरे मुसलमान आणि जातिवंत मराठे, धनगर व ब्राह्मण तसेच तोफाची, बैले व कर्नाटकी प्यादे बंदुखी, आड-हत्यारी रोचेवार (?) व लोकवार (?) येलंगेवार (?) बाजे जातचे इटेकरी हतुलवे (?) तिरंदाज व छडीवाले व पटाईत व बंकाईत व बाणाईत व तोफखाना ऐसे एकंदर जम निदान करून भांडण दिधलें. मोठें क्षेत्र जाहालें. राजियाचें लष्करी लोकांनी व मावळे लोकांनी पायउतारा होऊन

मारामारी केल्या. हत्ती तोडिले, ते जागां ठार जाले. कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं, कित्येक हत्तींचें दांत तोडिले. कित्येक हत्तींचे पाय तोडिले. तसेच घोडे एकच वारानें जिवें मारिले. तसेच खानाचे लष्करी कित्येक ठार मारिले. कित्येकांचे पाय तोडून पाडिले. कित्येकांचे दात उडविले. कित्येकांची डोचकीं फोडिलीं. कित्येक मेले. युद्धास आले ते मारून भुईस रगडिले तसेंच उंटें मारिलीं. मारीत असतां रण अपार पडलें. संख्या न करवे. रक्ताच्या नद्या चालल्या. रणकंदन जालें. ऐसे मारामारी करून हत्ती, घोडे, उंट व मालमत्ता व पालख्या वजीर पाडाव करून आणिले : बितपशील ६५ हत्ती व हत्तिणी सुमार, ३००००० जड जवाहीर, २००० कापड वोझीं, भांडी तोफखाना सर्वही घेतलें. ४००० घोडे सुमार, १२०० उंटें सुमार, ७००००० नगद व मोहोरा व होन सोने रुपये. कलम १ – वजीर पाडाव जाहाले बितपशील – १ सरदार व वजीर मातबर. १ लां (कं?) बाजी भोसले. १ अफजलखानाचे पुत्र. १. नाटकशाळेचे पुत्र, १ राजेश्री झुंजारराव घाडगे. यांखेरीज लोक. कलम १ येणेंप्रमाणें पाडाव केले. याखेरीजही जिन्नस मालमत्ता, गुरें–ढोरें, बैल, मबलग मत्ता पाडाव केलें. भांडते लोकांनीं तोंडी तृण धरून शरण आले त्यांसि व बायकामुलें, भट–ब्राह्मण, गोरगरीब असे अनाथ करून सोडिले. राजा पुण्यश्लोक, शरणागतास मारीत नाहीं. याजकरिता त्याचे लोकांनींही कित्येक अनाथ सोडिले. अफजलखानाचा लेक फजल हा पायीं चिरगुटें बांधून झाडींत पळोन गेला. तसेच कित्येक भले लोक पळोन गेले. संख्या न करवे.

- **वाचन उतारा क्रमांक २**

सालेरीचा वेढा

त्याजवर इखलासखान नबाब यांणीं येऊन सालेरीस वेढा घातला आणि गडाखाले उतरला. हे वर्तमान राजियांस कळोन राजियांनीं प्रतापराव सरनोबत लष्कर देऊन मोंगलाईत पाठविले होते, त्यांस पत्रें व जासूद पाठविले कीं, ''तुम्हीं लष्कर घेऊन, सिताबीनें वरघाटें सालेरीस जाऊन, बेलोलखानावरि छापा घालून, बेंलोलखान मारून चालवणें; आणि कोंकणांतून मोरोपंत पेशवे यांस हशमांनिशी रवाना केलें; हे इकडून येतील आणि तुम्हीं वरघाटे येणे; असें दुतर्फा चालून घेऊन गनीमास मारून गर्दीस मेळविणें.'' अशीं पत्रें पाठविलीं. त्यावरून प्रतापराव लष्कर घेऊन वरघाटे आले. मोरोपंत पेशवे कोंकणांतून आले. उभयतां सालेरीस पावले. एक तर्फेनें लष्करांनीं घोडीं घातलीं. एक तर्फेनें मावळे लोक शिरले. आणि मारामारी केली. मोठें युद्ध जाहलें. चार प्रहर दिवस युद्ध जाहालें. मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटें, आराबा घालून युद्ध जाहलें. युद्ध होतांच पृथ्वीचा धुराळा असा उडाला कीं, तीन कोश औरसचौरस, आपले व परके लोक माणूस दिसत नव्हतें. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहाले. घोडीं, उंट, हत्ती (यांस) गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहाले. त्यामध्ये रुतों लागले; असा कर्दम जाहला. मारतां मारतां घोडे जिवंत उरले नाहीं. जे जिवंत सांपडले ते साहा हजार घोडे राजियाकडे गणतीस लागले. सवाशें हत्ती सांपडले. साहा हजार उंटें सांपडलीं. मालमत्ता खजीना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत हातास लागली. बेवीस वजीर नामांकित धरले. खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव झाले. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडे सडे पळाले. असें युद्ध झालें. त्या युद्धांत

प्रतापराव सरनोबत व आनंदराव व व्यंकाजी दत्तो व रूपाजी भोसले व सूर्यराव कांकडे, शिदोजी निंबाळकर व खंडोजी जगताप व गोंदजी जगताप व संताजी जगताप व मानाजी मोरे व विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ व मुकंद बल्लाळ, वरकड बाजे वजीर, उमराव असे यांणीं कस्त केलीं. तसेंच मावळे लोक यांणीं व सरदारांनीं कस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनोबत या उभयतांनीं आंगींजणीं केली. आणि युद्ध करितां सूर्यराव काकडे पंचहजारी मोठा लष्करी धारकरी, याणें युद्ध थोर केलें. ते समयीं जंबूरियाचा गोळा लागून पडला. सूर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारतीं जैसा कर्ण योद्धा, त्याच प्रतिमेचा, असा शूर पडला. वरकडही नामांकित शूर पडले असें युद्ध होऊन फत्ते जाहली.

- **वाचन उतारा क्रमां ३**

राजे सिंहासनारूढ

पुढें वेदमूर्ति राजेश्री गागाभट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ती ऐकून दर्शनास आले. भट गोसांवी, थोर पंडित, चार वेद साहा शास्त्रे योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव, असे पंडित-त्यांस राजे व सरकारकून सामोरे जाऊन, भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन द्रव्यही उदंड देऊन पुजिलें. गागाभट बहूत संतुष्ट जाले. भट गोसांवी यांचे मतें, मुसलमान बादशाहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यांनींही चार पादशाही दबाविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असें (मिळविलें) असतां त्यांस तक्त नाहीं, याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा असें चित्तांत आणिलें. आणि (तें) राजियासही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करितां सर्वांचे मनास आलें, तेव्हा भट गोसांवी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्री शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियाचे घराणें असें शोधिले. उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात त्याप्रमाणे व्रतबंध करावा. हा विचार आधीं करून भट गोसावी यांनीं राजियाचा क्षेत्रीं व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला. अपार द्रव्य धर्म केला. कुल आपले देशांतून पन्नास सहस्त्र वैदिक ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वही समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें (म्हणून) तक्त सुवर्णाचें, बत्तीस मणाचें, सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिद्ध केलें, रायरीचें नांव 'रायगड' म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्तमहानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्रांचीं उदकें, तीर्थ क्षेत्र नामांकित तेथील तीर्थोंदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून, सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासीं शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्री महादेव व श्रीभवानी कुलस्वामी, उपाध्ये प्रभाकर भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरू व भट गोसांवी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची सर्वांची पूजा यथाविधी अलंकार वस्त्रें देऊन (केली.) सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकीवर

बसलें. अष्ट प्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळचीं उदकें करून सुवर्ण-कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन, सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण-कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडष महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या स्थानीं अष्ट प्रधानांनीं उभें राहावें. पूर्वी कृतायुगीं, त्रेतायुगीं, द्वापारीं, कलयुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले, त्या पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वही साहित्य सिद्ध केलें. अष्ट खांबीं अष्टप्रधान उभे राहिले. त्यांचीं नावें बितपशील:-

मोरोपंत, त्रिंबकपंताचे पुत्र, पेशवे, मुख्य प्रधान
नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ मुजुमदार, यांचे नांव अमात्य
अण्णाजीपंत सुरनीस, यांचे नांव सचिव
दत्ताजी त्रिंबक वाकनीस, यांचे नांव मंत्री
हंबीरराव मोहिते, सेनापती
त्रिंबकजी सोनदेव डबीर, यांचे पुत्र रामचंद्रपंत, सुमंत
रावजी पण्डितराव होते त्यांचे पुत्रास रायजीराज
निराजी रावजी यास न्यायाधिशी

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेविलीं. अष्ट प्रधानांचीं नांवें ठेविलीं. ते स्थळें नेमून उभे केले. आपापले स्थळीं उभे राहिले. बाळ प्रभू चिटनीस व नीळ प्रभू पारसनीस वरकड अष्ट प्रधानांचे मुतालीक व हुजरे, प्रतिष्ठित सर्वही यथाक्रमें पद्धतीप्रमाणें सर्वही उभे राहिले. छत्र जडावाचे मोतीलग झालरीचे करून मस्तकावर धरिलें. छत्रपती असें नांव चालविलें. कागदीं पत्रीं स्वस्तिश्री (राज्याभिषेक) शक, सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत चालविला. पन्नास सहस्त्र ब्राह्मण वैदिक मिळाले. या वेगळे तपोनिधी व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नानाजाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न उलफे चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट मुख्य अध्वर्यू, त्यांस अपरमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेचाळीस लक्ष होन जाले. अष्ट प्रधानांस लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्याखेरीज एक हत्ती, घोडा, वस्त्रें, अलंकार असें देणें दिलें. येणेप्रमाणें राजे सिंहासनारूढ जाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. हा मऱ्हाटा पातशाहा येवढा छत्रपती जाला. ही गोष्ट कांहीं सामान्य जाली नाहीं.

२.६ शब्दार्थ व टिपा

तवारिखा - मुस्लिम राजवटीतील इतिहासलेखन प्रकार

आख्यायिका - दंतकथा

अन्योन्य - परस्पर

संयोजन - सांधणे, जोडणे, मिलाफ

आत्मनिष्ठा - व्यक्तिनिष्ठ जाणीव

औरसचौरस फौज - खूप मोठे सैन्य

कुडता - अंगात घालण्याचा सदरा

मंदिल - जरीचे पागोटे, मुकुट

चोळणा - आखूड विजार किंवा पायजमा

बिचवा - शस्त्राचा प्रकार

जमदाड - शस्त्राचा प्रकार

पारिपत्य - दंड किंवा शिक्षा

डेरा - राहुटी

गनीम – शत्रू

कट्यार – शस्त्राचा प्रकार

पेटारा – मोठ्या आकाराची पेटी

कोस – सुमारे दोन मैल

सती जाणे – पतीच्या चितेवर जिवंत जळणे

मण – एक वजन किंवा माप

शास्त – शिक्षा, शासन

तख्त – सिंहासन

सबुरी – धीर

मैल – अर्धा कोस

प्रहर – तीन तासाचा एक प्रहर

मिष्टान्न – गोडधोड, पक्वान्न

अभिषेक – स्नान, मंत्रयुक्त पाणी शिंपडणे

२.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

योग्य पर्याय निवडा.

१. कोणाच्या पत्नीने शिवाजीराजांना कैद करून आणण्याचे आवाहन केले?

अ) सुलतान महमद ब) अफझलखान क) दिलेरखान ड) बेलोलखान

२. तुळजापूरच्या भवानीची मूर्ती कोण फोडतो?

अ) शाहिस्तेखान ब) दिलेरखान क) अफझलखान ड) फजलखान

३. सय्यद बंडाचा हात हत्यारासह कोण तोडतो?

अ) शिवाजी महाराज ब) नेताजी पालकर क) जिवा महाला ड) संभाजी कावजी

४. आपल्यावर हल्ला झाला आहे, हे पाहून शाहिस्तेखान कोठे लपतो?

अ) डेऱ्यात ब) बायकांत क) मंचकाखाली ड) फौजेत

५. मिरजाराजे जयसिंगाबरोबर शिवाजीराजांना घेऊन जाण्यासाठी कोण येते?

अ) इखलासखान ब) बेलोलखान क) हुसेनखान ड) दिलेरखान पठाण

उत्तरे : १) अ २) क ३) क ४) ब ५) ड

दीर्घोत्तरी प्रश्न

'सभासद बखरी'तील शिवाजीमहाराजांचा दिल्लीपतीबरोबरचा संघर्ष आणि नजरकैदेतून झालेली सुटका, या प्रसंगांतील शिवाजीराजांची मुत्सद्दीगिरी स्पष्ट करा.

प्रास्ताविक : मध्ययुगीन मराठी वाङ्मयात बखरवाङ्मयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. इतिहास आणि आख्यायिका यांचा मेळ साधून बखरीचे लेखन झाले आहे. 'बखर' या शब्दाची बखेर, बखैर अशी अन्य रूपेही आढळतात. हकीकत कथन करणे, हा बखरीचा मुख्य हेतू आहे. चरित्रकथात्मक, युद्धकथात्मक, दौलत कथात्मक आणि स्फुट कथात्मक असे मराठी बखरींचे वर्गीकरण करता येते. 'सभासद बखर' ही

कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून लिहिलेली बखर आहे. बखरलेखनाचा वाङ्मयीन आदर्श म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. ही बखर प्रसंगचित्रणाच्या दृष्टीने संपन्न झाली आहे. या बखरीतील शिवाजीमहाराजांचा औरंगजेबाबरोबर झालेला संघर्ष आणि तिथल्या कैदेतून त्यांनी स्वतःची करवून घेतलेली सुटका पुढीलप्रमाणे पाहता येते.

विवेचन : शाहिस्तेखानाचे पारिपत्य केल्यामुळे औरंगजेब चिडतो व मिर्झाराजे जयसिंग यास शिवाजीराजांच्या मोहिमेवर पाठवतो. सोबत दिलेरखान पठाण यासही पाठवतो. शिवाजीराजांना दिल्लीला घेऊन जाण्याची जबाबदारी जयसिंग घेतो. दिल्ली बादशहाबरोबर शत्रूत्व न वाढवता राज्य करावे, अशी इच्छा जयसिंग बोलून दाखवतो. त्यामुळे शिवाजीराजे संभाजीराजांबरोबर औरंगजेबाच्या भेटीस जातात. दिल्ली दरबारात त्यांना अपमानास्पद वागणूक मिळते. दुय्यम दर्जाच्या जसवंतसिंगाच्या मागे त्यांनी उभे राहावे असे बादशहा सांगतो. हा अपमान सहन न झाल्याने ते बाहेर पडतात. पुढे त्यांना नजरकैदेत ठेवले जाते.

शिवाजीराजे आपल्यावर हल्ला करतील या भीतीने औरंगजेब त्यांच्यावर चौकीदार नेमतो. स्वपुत्रासह कोठडीत अडकून पडल्यामुळे शिवाजीराजे दुःखी होतात. मेवा-मिठाईसाठी वेळूचे दहा पेटारे बनवून घेतात. त्याचे चार पेटारे वजिराकडे पाठवतात. पेटाऱ्यांची ये-जा चालू ठेवतात. एक दिवस एका पेटाऱ्यात बसून ते बाहेर पडतात. त्यांच्या जागी हिरोजी फरचंद झोपतो. संभाजीराजांना वाराणसीला ठेवून ते संन्याशी बनून महाराष्ट्रात येतात.

समारोप : वरील दोन्ही प्रसंगातून शिवाजीमहाराजांच्या स्वभावगुणांवर प्रकाश पडतो. स्वाभिमानाने जगणारे राजे औरंगजेबापुढे वाकत नाहीत. त्यांच्याकडे पाहून सलाम करताना श्रीशंभुमहादेव, श्रीभवानी आणि वडील शहाजीराजे यांना मनात गृहीत धरतात. अतिशय शिताफीने नजरकैदेतून सुटका करून घेतात. संकटकाळात बुद्धिचातुर्याने ते धोरण आखतात, याची प्रचिती या प्रसंगातून येते.

लघुत्तरी प्रश्न

अफझलखानाच्या वधाचा प्रसंग स्पष्ट करा.

प्रास्ताविक : कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजाराम महाराजांच्या आज्ञेने 'सभासद बखर' लिहिली. या बखरीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील निवडक प्रसंग चित्रित केले आहेत. या बखरीतील अफझलखानाचा वध हा महत्त्वाचा प्रसंग आहे.

विवेचन : विजापूरकर आदिलशहाच्या दरबारात शिवाजीराजांना कैद करून आणण्यासाठी बडीसाहेब सांगते त्यावेळी कोणीही पुढे येत नाही. अफझलखान तयारी दर्शवितो. शिवाजीराजांची भेट घेण्यासाठी वाईला येतो. प्रतपगडाच्या पायथ्याला भेट ठरते. भेटीदरम्यान अफझलखान शिवाजीराजांवर वार करतो. त्यावेळी हातातल्या वाघनख्या ते अफझलखानाच्या पोटात खुपसतात. त्यामुळे तो जमिनीवर कोसळतो. सय्यद बंडाच्या वाराला ते तोंड देतात. जिवा महाला बंडाला मारून टाकतो. खानाचे डोके कापले जाते.

समारोप : शिवाजी महाराजांच्या जीवनातील हा महत्त्वाचा प्रसंग आहे. शिवरायांची युद्धनीती यावरून कळून येते. शक्तीपेक्षा युक्ती किती महत्त्वाची ठरते, याचे प्रत्यंतर या प्रसंगातून होते.

२.८ सरावासाठी प्रश्न

योग्य पर्याय निवडा

१. दिल्लीपतीपुढे शिवाजीराजे तिसरा सलाम कोणास करतात?

अ) जिजाऊ ब) शहाजीराजे क) श्रीभवानी ड) श्रीशंभुमहादेव

२. बादशहा शिवाजीराजेंना कोणाच्या मागे उभा राहण्यास सांगतो?

अ) रामसिंग ब) जयसिंग क) जसवंतसिंग ड) दिलेरखान

३. मेवा-मिठाईसाठी शिवाजीराजे वेळूचे किती पेटारे बनवून घेतात?

अ) सात ब) नऊ क) अकरा ड) दहा

४. शिवाजीराजे चौकीतून गेल्याचे वृत्त बादशहास कोण सांगतो?

अ) पोलादखान ब) रहिमतखान क) दिलेरखान ड) हुसेनखान

५. शहाजीराजांचा मृत्यू कोठे होतो?

अ) सालेरी ब) विजयदुर्ग क) चित्रदुर्ग ड) चंदी

दीर्घोत्तरी प्रश्न

१. सभासद बखरीतील युद्धप्रसंगांचे चित्रण तुमच्या शब्दात लिहा.

२. सभासद बखरीतील प्रसंगचित्रे शिवाजीराजांची चरित्रकथा उभी करतात, स्पष्ट करा.

लघुत्तरी प्रश्न

१. सभासद बखरीतील अद्‌भुतप्रसंग स्पष्ट करा.

२. सभासद बखरीतील राज्याभिषेकाचा प्रसंग स्पष्ट करा.

२.९ अधिक वाचन

१. 'सभासद बखर' : संपा. डॉ. यू. म. पठाण, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०००.

२. बखर वाङ्मयः उद्‌गम आणि विकास : डॉ. बापूजी संकपाळ, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८२.

३. मराठी बखरवाङ्मयाचा पुनर्विचार : डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८६.

❑❑❑

सत्र ३ : घटक ३

सभासद बखर : भाषाविशेष

३.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- शिवकालीन मराठी भाषेचे विशेष समजून घेता येतील.
- बखर वाङ्मयातील भाषेचा अभ्यास करता येईल.
- सभासद बखरीच्या भाषेचे विशेष समजून घेता येतील.

३.२ प्रास्ताविक

मराठी बखर वाङ्मयात शिवचरित्रपर बखरींची संख्या अधिक आहे. त्यामध्ये शिवचरित्राचे विश्वसनीय साधन म्हणून सभासद बखरीला महत्त्वाचे स्थान आहे. बखरलेखन हे इतिहास लेखनाच्या भूमिकेतूनच झाले आहे. तथापि कोणताही लेखक आपले लेखन नकळत रंजक करण्याचा प्रयत्न करीत असतो. बखरकारांची भूमिका साहित्यलेखनाची नसतानाही बखरींमध्ये वाङ्मयीन गुण प्रकट होतात हे त्यामुळेच होय. आपल्यास या घटकामध्ये सभासद बखरीमधील भाषेचे विशेष अभ्यासता येतील. तसेच बखरकाराच्या लेखन सामर्थ्याचेही स्वरूप समजावून घेता येईल.

३.३ विषय विवेचन

'सभासद बखर' ही ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. कारण शिवाजी महाराजांचे ते पहिले चरित्र आहे. यातील शिवाजींच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग, महत्त्वाच्या घटनांची विस्तृत वर्णने, चरित्रातील महत्त्वाच्या व्यक्तींची वर्णने, वस्तूंची वर्णने वाचताना बखरकाराने बखरलेखन सजविण्याकडे कसे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे, ते दिसून येते. लेखन ऐतिहासिक असो किंवा वाङ्मयीन, ते वाचकांपर्यंत पोहचते ते भाषेच्या माध्यमातूनच होय. सभासद बखरीतून आलेले शिवचरित्र कृष्णाजी अनंत सभासद यांच्या भाषाशैलीमुळेच वाचनीय झाले आहे.

उदात्तता, अद्‌भूतता, संयम, आवेश, अलंकार, निवेदनकौशल्य, बखरकाराची सौंदर्यदृष्टी, वर्ण्यविषयाशी एकरूपता इत्यादी विशेष दिसून येतात. त्यांचा योग्य वापर केला आहे. शिवाय वाक्‌प्रचारांचे विविध प्रकार व सुभाषिते यामुळे माधुर्यगुण निर्माण झाला आहे. याचबरोबर काही व्याकरणिक विशेषांमुळे या बखरीतील भाषेला एक वेगळा बाज प्राप्त झाला आहे. सभासद बखरीतील उपरोक्त वैशिष्ट्यांपैकी काही ठळक वैशिष्ट्यांचा अभ्यास करू.

३.४ भाषेचे विशेष

१. व्यक्तिवर्णने

सभासद बखरीमध्ये दोन प्रकारची व्यक्तिवर्णने दिसून येतात. त्यातील पहिला प्रकार म्हणजे साक्षात पद्धतीचे व्यक्तिवर्णन होय. या प्रकारात लेखक वस्तुनिष्ठ म्हणजेच सरळपणे व्यक्तिचित्रण करीत असतो. अशा प्रकारच्या वर्णनातून ती व्यक्ती तिच्या स्वभाववैशिष्ट्यांसह डोळ्यांपुढे उभी राहते.

उदाहरणार्थ, अफजलखानाचे वर्णन करताना, 'अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीने होता. अंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुद्धीने तैसाच' अशा समर्पक शब्दांचा वापर केला आहे. शाहिस्तेखानाच्या बादशाही वैभव आणि दराऱ्याची सूचकतेने यथार्थ कल्पना आणून देताना, 'नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशी दक्षिणेस राजियावर चाल करून आला.' दिलेरखानाच्या सामर्थ्याचे वर्णन करताना, 'दिलेरखान म्हणजे मोठा बळकट. एका हत्तीचे बळ किंवा जास्तीच होईल आणि हत्ती बराबरी खाणे. दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजने खाणे. शरीर तर दुसरा हेडंब राक्षसच! ऐसा थोर' अशा नेमक्या शब्दांचा वापर केलेला असल्यामुळे ते वाचनीय ठरते. 'भट गोसावी, थोर पंडित, चार वेद, साहा शास्त्रे, योगाभ्यास संपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येने निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव, असे पंडित' या शब्दात गागाभट्टाचे वर्णन केले आहे. त्यातून त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून दिला असून तो नमुनेदार आहे.

व्यक्तिवर्णनाचा आणखी एक प्रकार असून त्याला प्रतिबिंबात्मक व्यक्तिचित्रण असे म्हणतात. व्यक्तींच्या उद्‌गारातून व संवादातून ते सूचित होत असते. उदा. शिवाजीवर चालून जाण्यास कोण तयार आहे, असे बडी साहेबिणीने विचारताच कोणीच कबूल होत नाही. मात्र अफजलखान तयार होतो आणि ''शिवाजी काय? चढे घोड्यानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो.'' अशी तो प्रतिज्ञा करतो. त्याच्या या उद्‌गारात आत्मविश्वास आणि उद्दामपणा दिसून येतो. शत्रूच्या अभयपत्राबद्दल वाटणारी तुच्छता, शिवाजीबद्दल वाटणारी उत्कट स्वामीनिष्ठा व अभयपत्र न घेण्याचा पक्का निश्चय व्यक्त करताना मुरारबाजी दिलेरखानास म्हणतो, 'तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजीराजाचा शिपाई, तुझा कौल घेतो की काय?'

अशा प्रकारे या बखरीतील व्यक्तिचित्रणे वेधक असून, लेखकाने समर्पक, नेमक्या शब्दांचा वापर केल्यामुळे त्यांना वेधकपणा प्राप्त झाला आहे. साहजिकच लेखकाच्या भाषाशैलीचे ते वैशिष्ट्य आहे.

२. समर्पक वस्तुवर्णने

कृष्णाजी अनंत सभासद यांनी या बखरीत वस्तूंची वर्णने समर्पक शब्दात केली आहेत. पतकांच्या (पथक) साजाचे वर्णन साधे असून कलादृष्ट्या त्यात एक विशिष्ट क्रम आहे. त्यामुळेच या वर्णनाला एकजिनसीपणा प्राप्त होऊन ते मोहक झाले आहे. उदाहरणार्थ, 'डोईस मंदील, आंगास सखलादी फतू, दोहो हाती दोन सोन्याची कडी, कोणास रुप्याची कडी, तरवारास अबनाळ तैनाळ सोनेरुप्याचे, बंदुकीस कट रुप्याचे व विटियासि कट तैसेच, कानास जोडी कुडक्यांची, येणेप्रमाणे अवघे लोकांस साज.' रायगडाचे

वर्णनही पाहण्यासारखे आहे. बखरकार लिहितो, 'राजा खासा जाऊन पाहातां गड बहुत चखोट, चौतर्फी गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गांव उंच, पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही, आणि धोंडा तासीव एकच आहे. (असा चखोट) 'चखोट' हे विशेषण, 'कडे तासिल्याप्रमाणे', 'उंच', 'गवत उगवत नाही' व धोंडा तासीव एकच या शब्दयोजनेमुळे वर्णन साभिप्राय झाले आहे. याचप्रमाणे 'तक्त सुवर्णाचे, बत्तीस मणाचे नवरत्ने जडित सिंहासन सिद्ध केले', 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही..... दोन गाडिया जोडून जावे ऐशी मजबुती' आणि 'पडकोट तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट' या शब्दात अनुक्रमे शिवाजींचे सिंहासन आणि येळूरकोटचे वर्णन अतिशय नेमकेपणाने केलेले आहे. हा रेखीवपणा लेखकाच्या भाषेचा विशेष गुणधर्म आहे.

३. आटोपशीर निवेदन

बखरकाराने निवेदन करताना पाल्हाळाला आवर घालून व्यापक विषय आटोपशीर केलेला पाहायला मिळतो. त्याने साधी पण परिणामकारक लघुवाक्ये वापरून आपले लेखन चटकदार केले आहे. १. 'इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियाने धरून वार केला. खानाची बोटे तीन उडाली. तेव्हा गलबा थोर जाहाला.' २. 'त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती. तिचे मांडीवर बसून, गळा मिठी घालून, आण घालून राहाविली.' ३.'पातशहांनी कुल नगर श्रृंगारिले, चौफेरी बिदीस कुंकुमकेशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणे, पताका, निशाणे नगरांत लाविली. नगर-नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनी मंगलआर्त्या अगणित उजळून राजियास वंदिले. सोने रुपियाची फुले राजियावरि उधळली.' इत्यादी. अनुक्रमे शाहिस्तेखानावरील हल्ल्याचा प्रसंग, शहाजींच्या मृत्यूनंतर जिजाबाईंचा सहगमनाचा प्रसंग व शिवाजी भागानगरास आल्यावेळचा प्रसंग हे आटोपशीर निवेदनशैलीमुळे डौलदार झाले आहेत.

हे जरी खरे असले तरी, संयम व अल्पाक्षरत्वामुळे शिवचरित्रात अनेक उत्कट प्रसंग असूनही आणि लेखकाची भाषा मोहक असूनही रसनिर्मिती झालेली नाही, हेही तितकेच खरे आहे.

बखरकार समकालीन असल्यामुळे शिवाजींच्या जीवनातील अनेक घटनांची त्याला माहिती आहे. साहजिकच तो चरित्रनायकाशी एकरूप झालेला आहे. परिणामी या घटनांचे वर्णन करताना तो आवेशाने करतो. उदा. शिवाजीच्या पुंडपणाबद्दल बडी साहेबिण शहाजीकडे तक्रार करते व त्यावर शहाजीने दिलेले उत्तर, शिवाजीच्या क्रोधयुक्त वागणुकीबद्दल औरंगजेबाने चौकशी केली तेव्हा, ''जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जाहाला. काही करीणा जाहाला.'' असे रामसिंगाने काढलेले उद्‌गार आवेशपूर्ण आहेत. या आवेशपूर्ण उद्‌गारांनी निवेदनाला धार येऊन ते आकर्षक झाले आहे.

४. पारंपरिक/पौराणिक संदर्भ

कोणत्याही लेखकावर त्याच्या समाजातील पौराणिक/पारंपरिक संस्कार झालेले असतात. लेखक आपले लेखन डौलदार, आलंकारिक करण्यासाठी पारंपरिक दाखल्यांचा, सुभाषितांचा कलात्मकतेने वापर करीत असतो. तसेच उपमा, रूपक, अनुप्रास या अलंकाराचाही वापर केलेला असतो.

उपमा

१. 'मागे कौरवांचा क्षय पांडवी केला, (तेव्हां) असा वीरावीरांस झगडा जाहाला.' (पौराणिक)

२. 'एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडले.' (लोकव्यवहारात्मक)

उत्प्रेक्षा

१. 'अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दर्योधनच जातीने होता. अंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुद्धीने तैसाच.

२. 'शिवाजी राजाही भीमच त्यानीच अफजल मारिला'.

रूपक

१. बहादूरखान 'पेंडीचे गुरू आहे'

२. बादशहाने 'बहुत खेद, दुःखाचे पर्वत मानिले'

अनुप्रास

१. 'श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियात घालून, भरडून पीठ केले'

२. 'त्याउपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून, गळा मिठी घालून, आण घालून राहाविली.'

३. मावळे देशमुख बांधून, दस्त करून, पुंड होते त्यास मारिले.'

वरील वाक्यात ध्वन्यनुकारी अनुप्रास आहे.

५. वाक्प्रचार

वाक्प्रचारालाच वाक्संप्रदाय असे म्हणतात. त्याचा शब्दशः अर्थ न घेता त्यापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थ रूढ झालेला असतो, तो घेतला जातो. परिणामकारक लेखनासाठी व थोडक्यात, संक्षिप्त, अचूक वर्णनासाठी वाक्प्रचाराचा वापर केला जातो. त्यामुळे भाषेचे माधुर्यही वाढत असते. शिवछत्रपतींचे चरित्र अर्थात सभासद बखरीमध्ये अनेक वाक्प्रचार आले असून त्यात विविधता आहे. सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे त्यांचे वर्गीकरण करता येते.

उत्साह निर्माण करणारे वाक्प्रचार

१. गर्दीस मिळविणे

२. धुंद उठविणे

शोक निर्माण करणारे वाक्प्रचार

१. रणास येणे

२. रण पडणे

भय जागृत करणारे वाक्प्रचार

१. उभा करणे (धरणे)

२. पोटात भय घालणे

संकीर्ण वाक्प्रचार

१. दाती तृण धरणे (**अवयवाशी** संबंधित वाक्प्रचार आहे.)

२. तोंडात अंगुली घालणे (**अवयवाशी** संबंधित वाक्प्रचार आहे.)

३. मनगटे चावणे (**अवयवाशी** संबंधित वाक्प्रचार आहे.)

४. कौल देणे-घेणे (व्यवहार-अभयवचन देणे)

व्याकरणिक विशेष : वरील भाषिक वैशिष्ट्यांबरोबरच कांही व्याकरणिक वैशिष्ट्येही दिसून येतात. ती पुढीलप्रमाणे;

प्रथमान्त कर्त्याचा कर्मणी प्रयोग करून वापर करणे.

१. 'आपण प्रसन्न जाहालो.'

२. इतक्यात पंताजीपंत पुढे होऊन अर्ज केला.

३. त्याजवरून राजे बहूत संतोष होऊन हिंमत धरली.

४. तोच खांसा राजा चालोन जाऊन जावली सर केली.

५. आज राजा येऊन आपली बोटे तोडिली.

६. आपले कारकून हुजूर आणून विचार केला.

विशेष्यानंतर विशेषणाचा वापर केला आहे.

१. लोक **श्रमी बहूत** होतात.

२. राजश्री मालोजी राजे यांनी तेथे जागा पाहून तळे **एक थोर** बांधिले.

३. दानधर्म **बहूत** केला.

४. ते समयी राजियास वर्षे **बारा** होती.

५. बडी साहेबीण सुलतान महमंद याची बायको ही कारभार **कुल** करीत असता त्यास हे वर्तमान कळून बहूत कष्टी जाहली.

संमिश्र शब्दप्रयोग

१. **संस्कृत** नामधातूस मराठी प्रत्यय लावणे
उदा. श्रीभवानी अंगात **आविर्भवली**

२. **संस्कृत** शब्दास फारसी प्रत्यय लावणे
उदा. तोल(संस्कृत) दार(फारसी) तोलदार – प्रतिष्ठित

३. **फारसी** शब्दास मराठी प्रत्यय लावणे
उदा. दघा(फारसी) खोर(मराठी) दगेखोर – विश्वास घातकी

४. **अरबी** शब्दास फारसी प्रत्यय लावणे
उदा. माहीयत (अरबी) गार (फारसी) माहितगार – ज्ञानी

५. **मराठी** शब्दास गुजराती प्रत्यय लावणे
उदा. घर (मराठी) ओबा(गुजराती) घरोबा – स्नेहभाव

६. **अरबी** उपसर्ग फारसी शब्दास लावणे
उदा. घैर (अरबी) हुश्यार (फारसी) गैरहुशार – असावध

परकीय भाषांमधून मराठीत रूढ झालेले शब्द.

१. **फारसीतून** जसेच्या तसे रूढ झालेले शब्द
खर्च, पेशवा, दस्त, शहर, लष्कर, खावंद, वार, गर्दी, चाकर, सबुरी

२. **फारसीतून** बदल होऊन रूढ झालेले शब्द
तळे, मेह (हे) रबानी, पातशाही, कारभारी, परगणा, बरोबर, मजुमदार, डबीर, सबनीस, रवाना

३. **अरबीतून** जसेच्या तसे रूढ झालेले शब्द
फौज, कैद, हशम, खबर, जवाहीर इत्यादी

४. **अरबीतून** बदल होऊन रूढ झालेले शब्द
किताब, साहेब, दावा, महाल, किल्ला, वजीर, मत्ता, जिन्नस, हेजीब, काबीज, मलुख, कुक

सुभाषिताचा वापर

कठीण प्रसंगी युद्धातून पळ न काढता युद्ध करावे, ही खरी युद्धनीती आहे. विजय मिळाल्यास उत्तमच पण अपयश आल्यास लढता लढता बलिदान केले म्हणून कीर्ती मिळते. याविषयीचा हा श्लोक पाहण्यासारखा

आहे.

जितेन (जयन?) लभते लक्ष्मी मृत्युनापि सुरांगणाः।

क्षण-विध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ।।१।।।

याबरोबरच कानडी, तेलगू हिंदी भाषेतील शब्दांचाही वापर केला आहे.

३.५ समारोप

अशा प्रकारे कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिवछत्रपतींचे चरित्र लिहीत असताना त्यातील प्रसंग, व्यक्तिचित्रणे, वस्तुचित्रणे अधिक रेखीव, चित्रस्पर्शी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी परकीय भाषेतील शब्द, संमिश्र शब्दरचना, वाक्प्रचार, वेगवेगळ्या प्रकारचे व्याकरणिक विशेष आणि सुभाषितांचा वापर केलेला आहे. त्यामुळे हे चरित्र वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी सजलेले दिसून येते.

३.६ शब्दार्थ व टिपा

मेहेरबानी (फारसी) - कृपा

सबूरी (फारसी) - शांतपणा

माहीतगार (अरबी + फारसी) - ज्ञानी

परगणा (फारसी) - प्रांत

मजलस (अरबी) - मूळ अर्थ सभा; येथे धोरण

मुतालीक (अरबी) - उपमंत्री

कारभारी (फारसी) - दिवाण

कौल (अरबी) - अभयवचन

हशमखोरी (फारसी) - स्वामीद्रोह, अप्रामाणिकपणा

आविर्भवली - संचारली

मत्ता (अरबी) - मिळकत

द्वाही - दवंडी, जाहीरनामा

३.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

योग्य पर्याय निवडा.

१. अफझलखानाचे वर्णन कोणत्या समर्पक शब्दात केले आहे?

अ) दुर्योधन ब) युधिष्ठीर क) अर्जुन ड) भीम

२. रायगडाचे वर्णन कोणत्या शब्दात केले आहे?

अ) चखोट ब) उंच क) भक्कम ड) ऐसपैस

३. 'बहादूरखान पेंडीचे गुरू आहे' हे वाक्य कोणत्या अलंकाराचे उदाहरण आहे?

अ) उपमा ब) उत्प्रेक्षा क) रूपक ड) अनुप्रास

४. 'कौल देणे – घेणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे?

अ) संमत्ती देणे ब) संमती देऊन घेणे क) कौले देणे ड) अभयवचन देणे

उत्तरे – १) अ २) अ ३) क ४) ड

दीर्घोत्तरी प्रश्न

सभासद बखरीच्या भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

प्रास्ताविक : कोणत्याही कलाकृतीचा अभ्यास करताना किंवा त्यातील आशय समजून घेताना भाषेचा विचार अपरिहार्य ठरतो. लेखकाने आशयाची अभिव्यक्ती करताना भाषेचे उपयोजन कसे केले आहे, ते पाहावे लागते. सभासदाच्या बखरीची काही भाषिक वैशिष्ट्ये सांगता येतील.

विवेचन : मराठी बखरींमध्ये सभासद बखरीला अनन्यसाधारण महत्व आहे. ही बखर म्हणजे शिवाजी महाराजांचे पाहिले चरित्र होय. शिवाजी महाराजांच्या जीवनातील अत्यंत महत्वाचे प्रसंग, युद्धवर्णन, व्यक्तिवर्णने, वस्तूंची वर्णने करताना लेखकाने स्वतः समरस होऊन, त्यात रंगून जाऊन ते लेखन केले असल्याचे दिसून येते. लेखकाच्या मनात चरित्रनायकाबद्दल प्रचंड आत्मियता असल्यामुळे ते घडले आहे. शिवाजीचे व्यक्तिमत्त्वच एवढे उत्तुंग आहे की, ज्यामुळे प्रसंग आणि व्यक्तिचित्रणात उदात्तता आणि अद्‌भूतता प्रतिबिंबीत होते.

सभासद बखरीचा भाषाशैलीच्या दृष्टीने विचार करायचा झाला तर निवेदन कौशल्य, प्रसंग, व्यक्ती आणि वस्तूंची वर्णने करताना वापरलेली चित्रमयशैली, संयम, आवेश, अलंकारांचा अचूक वापर आणि लेखकाची सौंदर्यदृष्टी इत्यादी विशेषांकडे लक्ष द्यावे लागते. ते विशेष या चरित्रात कसे अभिव्यक्त झाले आहेत, हे पाहावे लागते. या बखरीत हे सर्व भाषिक गुण दिसून येतातच शिवाय प्रयोगासारख्या व्याकरणिक विशेषांचा, म्हणी आणि सुभाषितांचाही योग्य ठिकाणी वापर करून बखर भाषिक दृष्टीने संपन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नामुळे तिची वाचनीयता निश्चितच वाढली आहे.

(विद्यार्थ्यांनी उत्तराचा विस्तार करण्यासाठी प्रकरणात दिलेल्या भाषाविशेषांचा उपयोग करावा.)

समारोप : अशा प्रकारे घटनांचे विस्तृत वर्णन, अद्‌भूत प्रसंगाचे वर्णन, यथार्थ व्यक्तिदर्शन, काही घटनांचे चित्रवेधक वर्णन, आकर्षक वस्तुवर्णन ही बखरकाराची भाषिक वैशिष्ट्येच आहेत. तो काही प्रसंगाचे संयमाने तर काही ठिकाणी आवेशाने वर्णन करतो. संक्षेप किंवा अल्पाक्षरत्व हा एक गुण असून घटनांचे वर्णन करताना विशेष वातावरण निर्मिती केल्यामुळे ते प्रसंग वाचकाच्या हृदयाला भिडतात. थोडक्यात चरित्रकाराची भाषाशैली साधी असूनही प्रसन्न आहे.

३.८ सरावासाठी प्रश्न

योग्य पर्याय निवडा

१. 'जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जाहाला. काही करीणा जाहाला' हे रामसिंगाने काढलेले उद्‌गार कोणाबद्दल आहेत?

अ) शहाजी ब) शिवाजी क) व्यंकोजी ड) संभाजी

२. 'किताब' हा शब्द कोणत्या भाषेतून बदल होऊन आला आहे?

अ) अरबी ब) फारसी क) कानडी ड) संस्कृत

३. 'दगेखोर' या शब्दातील 'खोर' हा प्रत्यय कोणत्या भाषेतील आहे?

अ) हिंदी ब) संस्कृत क) मराठी ड) पोर्तुगीज

दीर्घोत्तरी प्रश्न

१. सभासद बखरीच्या आधारे शिवकालीन भाषेचे विशेष स्पष्ट करा.

२. कृष्णाजी अनंत सभासद यांच्या भाषाशैलीचे विशेष सांगा.

लघुत्तरी प्रश्न

१. सभासद बखरीतील भाषेचे व्याकरणिक विशेष सांगा.

२. सभासद बखरीची निवेदनशैली विशद करा.

३.८ अधिक वाचन

१. मराठी बखर : र.वि. हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे, एप्रिल १९७५

२. सभासद बखर : संपा. वि.स. बाकसकर, व्हीनस प्रकाशन, पुणे, एप्रिल १९७५

३.९ उपक्रम

सभासद बखरीमधील लेखनात आढळणारे इतर भाषेतील शब्द शोधून लिहून काढा व त्यांचा उपसर्ग व प्रत्ययांच्या दृष्टीने अभ्यास करा.

❑❑❑

सत्र ३ : घटक ४
अनुवादप्रक्रिया
(१. अनुवाद, भाषांतर आणि रुपांतर २. अनुवादकाचे गुण व पूर्वतयारी)

४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, जीवनातील सर्वच क्षेत्रांमध्ये अत्यावश्यक गोष्ट म्हणून अनुवादाला दिवसेंदिवस महत्त्व प्राप्त होत आहे. त्या अनुषंगाने अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या 'अनुवादप्रक्रिया' या घटकाचा येथे विचार करणार आहोत. हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला,

- अनुवाद म्हणजे काय ते समजेल.
- अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर या तिन्ही प्रक्रिया समजून घेता येतील.
- विविध क्षेत्रातील अनुवादाचे महत्त्व समजून घेता येईल.
- अनुवादकाकडे असावे लागणारे गुण समजून घेता येतील.
- अनुवादकाकडे कोणती पूर्व तयारी असावी लागते ते समजेल.

४.२ प्रास्ताविक

मानव हा समाजशील प्राणी असून भाषा ही मानवी समाजजीवनाचे वैशिष्ट्य आहे. म्हणून 'बोलतो तो माणूस' अशी माणसाची एक व्याख्या प्रचलित आहे. समाजात राहणे, संपर्क साधणे या मानवी गरजा आहेत. या गरजेतून मानवी भाषा अस्तित्वात आलेल्या आहेत. तथापि पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवाची भाषा एकच एक नाही. भाषेची विविधता हेही मानवी समाजजीवनाचे एक विशेष सांगता येईल. जगभरात आज सात हजाराहून अधिक भाषा-बोली बोलल्या जातात. त्यापैकी जवळपास दोन हजार भाषा एकट्या भारतात बोलल्या जातात. त्यामुळे भारतात भिन्नभाषिक संस्कृती दिसून येते. प्रदेशानुसार भाषा बदलत असल्यामुळे परस्पर संस्कृतीपरिचयासाठी अनुवादाला लक्षणीय महत्त्व प्राप्त झालेले आहे. अनुवादप्रक्रिया ही सर्जकतेला वाव असणारी बौद्धिक कसरतीची गोष्ट आहे. अनुवादक्षेत्र ज्ञानक्षेत्राच्या विस्तारासाठी अत्यावश्यक बनले असून, हे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत चालले आहे. त्यातूनच या क्षेत्राची व्याप्ती वाढते आहे. त्या अनुषंगाने येथे या क्षेत्रातील कामाची आणि पद्धतीची आपण विस्ताराने ओळख करून घेणार आहोत.

अलीकडे काळाची गरज म्हणून अनुवाद, भाषांतर व रूपांतर हे मिळून अभ्यास-संशोधनाचे एक व्यापक क्षेत्र म्हणून विकसित झाले आहे. आपल्या देशापुरता अनुवादप्रक्रियेचा विचार केला, तर येथील भाषिक विविधता ही अनुवाद क्षेत्रातील मोठी संधी आहे. कारण अनेकांच्यासाठी येथील भाषिक विविधता ही एक अडचण ठरलेली दिसते. त्यामुळे दुसऱ्यांना निर्माण झालेली अडचण दूर करण्याच्या माध्यमातून

एक मोठी संधी उपलब्ध झालेली आहे. ई. टी. व्ही. सारखी दूरप्रक्षेपण क्षेत्रातील नामवंत कंपनी एकाच वेळी भारतातील अनेक भाषांमध्ये प्रक्षेपण करीत आहे. अशा माध्यम समूहांमध्ये अनुवादकांची नित्य गरज भासत असते. त्याचबरोबर वरती उल्लेख केलेल्या अनुवाद क्षेत्रातील शासकीय संस्था, विविध प्रकाशन संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या, सर्व प्रकारची प्रसारण माध्यमे चांगल्या अनुवादकांच्या शोधात असतात. त्यामुळे अनुवादाचे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारले आहे. या क्षेत्राला सर्वच क्षेत्रात महत्त्व प्राप्त होत आहे. त्याअनुषंगाने येथे आपण अनुवादप्रक्रियेचा विस्ताराने विचार करणार आहोत.

४.३ विषय विवेचन

बदलत्या समाजव्यवस्थेमध्ये अलीकडील काही वर्षांत शैक्षणिक, शासकीय, औद्योगिक, व्यावसायिक अशा विविध क्षेत्रामध्ये अनुवादाचे काम झपाट्याने सुरू आहे; पण सर्वत्र अनुवादाचे काम व्यवस्थित सुरू आहे, असे मात्र नाही. अनुवाद ही केवळ भाषिक आणि तांत्रिक ज्ञानावर साधता येणारी गोष्ट नाही. या क्षेत्रात सर्जकतेला विशेष महत्त्व आहे. भिन्न भाषांवर प्रभुत्व मिळविलेले लोक अतिशय यांत्रिकपणे अनुवादाचे काम करताना दिसतात. प्रचंड मागणी असलेल्या दूरदर्शनवरील मालिका, चित्रपट, जाहिराती, व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित आणि लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर जोराने सुरू आहे. 'मागणी तसा पुरवठा' हे तत्त्व समोर ठेऊन हे काम चाललेले दिसते. येथे भाषिकसामर्थ्यांचा, भाषेच्या विविध अंगांचा विचार फारसा गांभीर्याने होताना दिसत नाही. ही गरज ध्यानात घेऊन इंटरनेटवर ऑनलाईन अनुवाद करून देणारी टूल्स् विकसित करण्यात आलेली दिसतात. यासाठी Google Translet ने सुरू केलेल्या तंत्रात अतिशय यांत्रिकपणे अनुवादाचे काम होते. या अनुवादामध्ये भाषेतील जिवंतपणा नसतो. त्याचबरोबर शब्दश: भाषांतरामुळे आशयाचीही हानी होते. यांत्रिक पद्धतीने केलेले अनुवाद अवाचनीय असतात. तसेच भाषेच्या विकासाला पोषक नसतात. यासंदर्भातील एक छोटे उदाहरण पाहाता येईल. सुधा मूर्ती यांच्या *'वाइज अँड अदरवाइज'* या पुस्तकाची अर्पणपत्रिका "For the 'shirtless people of India' who have taught me so much about my country' अशी आहे. या पुस्तकाच्या अनुवादामध्ये अनुवादकाने या अर्पणपत्रिकेचा अनुवाद 'अंगात सदरा नसलेल्या ज्या माझ्या देशबांधवांनी मला शिकवलं... की माझा देश काय आहे...त्यांना अर्पण' असा केलेला आहे. वास्तविक 'अंगावर पुरेसा कपडाही नसलेल्या ज्या गोरगरीब लोकांनी मला माझा देश कसा आहे ते शिकवलं; त्यांना..' असा केला असता; तर तो अधिक समर्पक झाला असता. अनुवादांमध्ये येणारी कृत्रिम भाषा, केलेले शब्दश: भाषांतर आणि भाषेला असलेल्या सामाजिक संदर्भांची न राखलेली बूज ही सर्रास पाहायला मिळणारी बाब आहे. याचे कारण अनुवादाचे महत्त्व न समजणे आणि त्यासाठी कष्ट करण्यासंदर्भातील विचार आपल्याकडे रुजलेला नसणे हे आहे. ज्या समाजामध्ये ज्ञानपिपासूवृत्ती, उदारमतवादी दृष्टिकोण, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये समृद्ध असतील तर अनुवाद, भाषांतराचा विचार गतीने रुजतो. भारतापेक्षा पाश्चात्त्य देशांना अनुवादाचे महत्त्व खूप अगोदर समजलेले आहे. पंचतंत्रातील गोष्टी सहाव्या शतकातच हिंदूस्थानातून युरोपभर पसरल्याचे मॅक्सम्युलर यांनी शोधून काढले आहे. भाषांतराची अशी प्राचीन उदाहरणे पाहिल्यास भाषांतराचे सांस्कृतिक महत्त्व

युरोपियन राष्ट्रांनी खूप पूर्वीच ओळखले होते, हे ध्यानात येते. त्यामुळे आजही ते जगातील कोणत्याही महत्त्वपूर्ण पुस्तकाचा अनुवाद पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर दोन-तीन महिन्यांमध्येच करताना दिसतात.

१. भारताची बहुभाषिकता

मानवी समाज हा भिन्नभाषिक आणि परस्परभिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमीत जगणारा आहे. सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विविध समाजगट अस्तित्वात आल्यामुळेच जगभरात अनेक भाषा व बोलींचा उदय झालेला आहे. एकूण मानवी समाजजीवनाचा विचार करता, अस्तित्वात आलेल्या विविध भाषा व बोलीच परस्परसंवाद प्रस्थापनेसाठी बऱ्याच वेळा एक अडथळा बनतात असे दिसते. भारतात हा अनुभव सतत येत राहतो. भारत हा विविध भाषा व बोलींनी समृद्ध असलेला देश आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत येथे सर्वाधिक भाषिक विविधता दिसून येते. त्यामुळे येथील अनेक प्रश्नांच्या मुळाशी ही भाषिक विविधताच आहे.

भारतातील भाषिक विविधता शिक्षण, समाजकारण, राजकारण अशा अनेक क्षेत्रांमध्ये अडचणीची ठरते. भारताच्या बहुभाषिकतेसंदर्भातील आपले निरीक्षण नोंदविताना मॅक्सीन बर्नसन लिहितात, 'आपल्याकडे जशी सामाजिक उतरंड दिसते तशी भाषांच्या बाबतीतही दिसते. या उतरंडीमध्ये सगळ्याखाली आदिवासी भाषा. त्यांच्यावर वेगवेगळ्या राज्यभाषा. उत्तरेकडे त्यावर हिंदी भाषा व सगळीकडे एकदम वर इंग्रजी दिसते. जसजसे आपण वर जातो तसतसे त्या भाषेला जास्त प्रतिष्ठा असते. आदिवासी भाषेला सगळ्यात कमी प्रतिष्ठा, मग राज्यभाषा, त्यावर हिंदी व सर्वात वर इंग्रजी. (भाषा व जीवन २८ : ३/ पावसाळा, २०१० पृष्ठक्रमांक २६) भाषा ही अस्मितेशी आणि भूमीशी बांधून ठेवणारी गोष्ट असल्याने दक्षिणेतील अनेक राज्यांमध्ये हिंदी भाषेला विरोध झालेला आहे. त्यामुळे उत्तरेकडील राज्यातील लोकांना दक्षिणेतील लोकांशी संपर्क साधताना येणारा अडथळा हा भाषिक पातळीवरचा असतो. हा अडथळा दूर करण्यासाठीच अनुवाद-भाषांतरांची मदत घ्यावी लागते. संवाद-संपर्क हा केवळ एक उद्देश झाला. याव्यतिरिक्त अनेक क्षेत्रांमध्ये अनुवाद-भाषांतराची मदत घ्यावी लागते. शिक्षण, साहित्य, राजकारण, प्रशासन, उद्योग-व्यापार अशी अनेक क्षेत्रे भाषांतर-अनुवाद प्रक्रियेमुळे विस्तारत आहेत. या आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये अनुवादाची गरज वाढत चाललेली आहे. जागतिकीकरणानंतर इंग्रजीसारख्या भाषेचे वाढलेले महत्त्व आणि उद्योग व्यवसायाच्या वृद्धीसाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना स्थानिक भाषा-बोलींची धरावी लागलेली कास अनुवादप्रक्रियेला गती देणारी आहे. भाषा ही भूमीशी जोडून ठेवणारी गोष्ट असते. याचे भान उद्योगव्यवसायिकांना आलेले आहे. परकीय कंपन्यांनी जाहिरात माध्यमात घेतलेल्या स्थानिक भाषांच्या आधारावरून ही गोष्ट लक्षात येते. या जाहिरातींवरून असे लक्षात येते की, येथे केवळ वस्तू विकली जात नाही; तर त्या वस्तुविषयी एक भाव ग्राहकाच्या मनामध्ये तयार केला जातो. कारण व्यवसायात वस्तू एकदा विकून चालत नाही, तर त्या वस्तूचा ग्राहक तयार व्हावा लागतो. यासंदर्भातील एक उदाहरण गोवासारख्या पर्यटनक्षेत्रामध्ये असलेल्या हॉटेल व्यवसायाचे पाहाता येईल. या हॉटेलची मेनूकार्ड बनवण्याच्या कामापासूनच विविध भाषेतील अनुवादकांची मदत लागते. अशा ठिकाणी येणाऱ्या जगभरातील पर्यटकांच्या सोयीसाठी

म्हणून विविध भाषांमधील मेनूकार्ड येथील हॉटेल व्यावसायिकांनी बनवून घेतलेली दिसतात. यामध्ये पर्यटकांची एक सोय दिसत असली तरी, व्यवसायवृद्धी हे मुख्य कारण अशा अनुवादांमागे असते. परकीय देशात येऊन आपल्या भाषेतील मेनूकार्ड वाचायला मिळाल्यामुळे पर्यटकांना एक आधार व धीर मिळतो. हॉटेलविषयी एक जिव्हाळा व आपलेपणा वाटतो. त्यामुळे त्यांचा मुक्काम पक्का होतो. पर्यायाने परदेशी ग्राहकांच्या माध्यमातून येथील हॉटेल व्यावसायिकांना मोठा व्यवसाय मिळतो.

२. अनुवादाचे सांस्कृतिक महत्त्व

भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात अनेक भाषा-बोलींचे प्राबल्य दिसते. येथील वैविध्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती, विविध धर्म, जाती, पोटजाती, समाजगटांनुसार रुजलेले उद्योग व्यवसाय, विविध स्तरांनुसार झालेली समाजाची विभागणी अशी अनेक कारणे येथील भाषा-बोलींच्या निर्मितीमागे आहेत. भारतात सर्वच प्रादेशिक भाषांमधून ज्ञानार्जनाची प्रक्रिया चालते. अनेक राज्यांमध्ये त्या त्या राज्याची भाषा प्रथम भाषा म्हणून शिकविली जाते. त्यामुळे देशातील बहुतांश भाषा-बोलींमधून आज वाङ्मयनिर्मिती होते. प्रत्येक भाषेला विशिष्ट अशी परंपरा आणि ज्ञानभांडाराचे संचित असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतातच अनुवाद-भाषांतर कामासाठीची मोठी संधी उपलब्ध आहे. भारतात हे काम गतीने सुरू झाले तर सर्वांनाच निरनिराळे सांस्कृतिक-भौगोलिक पार्श्वभूमी असलेले अनुभवविश्व, आपल्या भाषेत उपलब्ध नसणारे ज्ञानभांडार उपलब्ध होईल. या प्रक्रिमेमुळे अनुभवाच्या कक्षा विस्तारण्याबरोबरच परस्परांविषयीची समज वाढेल, अनेक गैरसमज दूर होतील आणि आपलेपणाची भावना वाढीस लागेल. देशांतर्गत ऐक्य वाढेल आणि सांस्कृतिक आदान-प्रदानामुळे दोन भिन्न समाजगटांमधील अंतरही कमी होईल. अशा उद्देशानेच साने गुरूजी यांनी भारताचे ऐक्य सांगणारी 'आंतरभारती'ही संस्था स्थापन करून अनुवादाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. वि. का. राजवाडे यांनी जानेवारी, १८९४ ला याच हेतूने 'भाषांतर' हे मासिक सुरू केले होते. त्याच्या उपोद्घातामध्ये हे मासिक सुरू करण्यामागे आपला उद्देश स्वभाषेची सेवा आणि त्यायोगे होणारी देशसेवा असा सांगितला आहे. ते लिहितात, 'भिन्न देशांत, भिन्न काळीं, ज्या भिन्न ग्रंथांच्या वाचनानें समाजावर महत्कार्ये घडलेलीं असतात, ते ग्रंथ जसेच्या तसे भाषांतर केले असतां स्वदेशातील समाजावर तशीं किंवा त्यासारखी कार्यें घडून येण्याचा साक्षात किंवा परंपरा संभव असतो. तसेंच उत्तमोत्तम ग्रंथ स्वभाषेंत आयतेच तयार होतात व स्वभाषची सुसंपन्नता पाहून देशांतील लोकांस उत्तरोत्तर अभिमान वाटूं लागतो. परकीय लोकांनाही आपल्या भाषेसंबंधी धि:कारपूर्वक बोलण्याची पंचाईत पडते व आपल्या देशाची व आपल्या भाषेची निंदा जसजशी कमी होत जाते तसतसा आपल्यालाही आपल्या सामर्थ्याचा कैवार घ्यावासा वाटतो.'(राजवाडे, वि. का. : २००६ : एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (संपा. भा. ल. भोळे, नवी दिल्ली, साहित्य अकादमी) हे राजवाडे यांचे सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वीचे हे विचार आजही आपल्या बहुभाषिक देशातील लोकांना लागू होतील इतके महत्त्वाचे आहेत व आज अनुवादाचे कार्य करणाऱ्या म्हैसूर येथील राष्ट्रीय अनुवाद मिशन आणि साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट यांसारख्या शासकीय संस्था अनुवाद कार्यासाठीच कार्यरत आहेत. त्याचबरोबर अनेक खाजगी प्रकाशन संस्था अनुवादाच्या क्षेत्रात लक्षणीय काम करताना दिसतात.

३. शिक्षण आणि वाङ्मय

शिक्षण आणि साहित्याच्या सर्वदूर झालेल्या प्रसारामध्ये भारतातील सर्वच भाषा-बोलींमध्ये वाङ्मयनिर्मिती होत असलेली दिसते. सर्व स्तरातील लेखक आज प्रादेशिक भाषा-बोली वाङ्मयनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात वापरू लागले आहेत. मराठीतील ग्रामीण, दलित, आदिवासी या साहित्य प्रवाहांमध्ये भाषिक विविधता यासंदर्भात पाहता येईल. प्रादेशिक बोलींमधून अनेक दर्जेदार वाङ्मयीन कलाकृती निर्माण होत आहेत, यापूर्वीही झालेल्या आहेत. अशा कलाकृतींचा अनुवाद हे एक मोठे आव्हानच असते. त्याचबरोबर एखादी इंग्रजी कादंबरी मराठीमध्ये अनुवादित करीत असताना मूळ कलाकृतीतील बोली, संभाषणे यामध्ये असणारी व्यक्तीविशिष्टता, समाजविशिष्टता अनुवादित करताना मराठीतील कोणती बोली स्वीकारावी, हा एक प्रश्नच असतो. भारतातील भाषिक विविधता अनुवाद-रूपांतरकारांसमोरील मोठी अडचण असली तरी, या भाषा-बोलींचा अनुवाद अशक्य मात्र नाही. खरे तर जगातील कोणत्याही भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत अभिव्यक्त करण्याची क्षमता असते. अभिव्यक्तीच्याबाबतीत प्रत्येक भाषा स्वयंपूर्ण असते. त्यामुळे हा प्रवास खडतर असला तरी अशक्य नाही. मुळात भाषिक विविधतेवर मात करण्याच्या उद्देशानेच अनुवाद-रूपांतर प्रक्रियेचा शोध लागलेला आहे. त्यामुळे अडचणींवर मात करत अनेक प्रकारच्या भाषातरांचे काम मोठ्या प्रमाणावर होताना दिसते.

४.३.४ विविध क्षेत्रे

आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर जगभरातील लोक परस्परांच्या खूप जवळ आलेले आहेत. त्यामुळे जीवनातील सर्वच क्षेत्रांमध्ये अनुवादकांची गरज वाढलेली आहे. याचे कारण सर्वच क्षेत्रातील ज्ञानभांडाराच्या अनुवादाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. मुळात अनुवाद-रूपांतर ही या काळाची गरज बनली आहे. विविध नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट यांसारख्या प्रसारमाध्यमांचा वाढता प्रसार-प्रभाव आणि त्या माध्यमातून विस्तारणारे अनुवादाचे क्षेत्र अनुवादकांसाठी एक मोठी संधी आहे. मुलांसाठीचे 'टॉम ॲण्ड जेरी', 'ऑगी ॲण्ड कॉकरोज', 'चार्ली चॅपलिन' हे जगभर लोकप्रिय असलेले कार्यक्रम आणि Discovery, National Geography, History या आंतरराष्ट्रीय स्तरावरील दूरप्रक्षेपण करणाऱ्या वाहिन्या आपले कार्यक्रम विविध प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करण्यास उत्सुक आहेत. त्यांना अडचण आहे ती प्रादेशिक भाषांमध्ये हे कार्यक्रम नेऊ शकणाऱ्या अनुवादकांची. त्यांनी यावर एक मार्ग म्हणून भारतामध्ये हिंदी भाषेत आपले प्रसारण सुरू केले आहे. इतर प्रादेशिक भाषांमध्ये शक्य नाही झाले; तरी ते येथील राष्ट्रीय भाषेत कार्यक्रम प्रसारणाचे काम करू लागले आहेत. जाहिरात क्षेत्र, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी ही क्षेत्रे, ज्ञानक्षेत्रातील विविध शाखा आणि एकूणच शिक्षण क्षेत्रामध्ये अनुवादाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. जगभरातील विविध भाषांमध्ये निर्माण होणारे नवनवे ज्ञान-तंत्रज्ञान आज तात्काळ इंग्रजी भाषेत अनुवादित होते. असे इंग्रजी भाषेत अनुवादित होणारे ज्ञान पुन्हा भारतातील विविध प्रादेशिक भाषांमधून अनुवादित व्हायला हवे. परंतु तशी प्रक्रिया किंवा व्यवस्था असलेली दिसत नाही. आज आभियांत्रिकी, वैद्यकीय, विज्ञान यासारख्या मुलभूत विद्याशाखांमधील ज्ञान भारतातील प्रादेशिक

भाषांमध्ये उपलब्ध नाही, याचे कारण हेच आहे. त्यामुळे अनुवाद-भाषांतर-रूपांतर प्रक्रियेला गती देण्याची निकड निर्माण झालेली आहे.

अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या विस्तारासाठी आपले जाळे जगभरातील विविध देशांमध्ये पसरवित आहेत. आपली उत्पादने विकण्यासाठी त्यांना जगातील विविध भाषांची मदत घ्यावी लागत आहे. या संदर्भातील सर्वपरिचित उदाहरण म्हणून अलीकडच्या काळात मोबाईल क्रांतीनंतर भारतात आलेल्या अनेक परदेशी कंपन्यांच्या दूरचित्रवाणीवील जाहिराती पाहता येतील. 'आयडिया' या भारतीय मोबाईल कंपनीने तर भारतातील भाषिक प्रश्नांवरतीच स्वत:च्या जाहिराती विकसित केल्या आहेत. त्यामुळे जागतिकीकरणानंतर विकासातील भागीदार म्हणून अनुवादकाकडे पाहिले जात आहे.

५. भाषांतरयुगाचे फलित

प्रत्येक भाषा-बोली ही त्या भाषिक समाजाची सांस्कृतिक संचित असते. त्या समाजाची परंपरा, श्रद्धा, रूढी आणि एकूण संस्कृती यांचा वारसा त्या समाजाची भाषा जोपासत असते. कोणत्याही भाषेतील म्हणी, वाक्प्रचार पाहिल्यास याची प्रचिती येते. त्यामुळे परस्परभिन्न समाजाच्या भाषा-बोलींच्या अनुवादप्रक्रियेमुळे संस्कृती परिचय वाढतो. सांस्कृतिक आदान-प्रदानाची प्रक्रिया सुरू होते. परस्परांचा परिचय वाढतो, नवे अनुभवविश्व प्राप्त होते. भारतीय समाजाच्या वाटचालीमध्ये अनुवाद-भाषांतराचे एक फलित म्हणून १८५० ते १८८५ या कालखंडाकडे पाहता येते. या कालखंडाला मराठी साहित्यात 'भाषांतरयुग' म्हणून संबोधले जाते. या काळात भाषांतरित साहित्याच्या माध्यमातून जगाकडे पाहाण्याची एक नवी खिडकी येथील नवशिक्षितांना प्राप्त झाली. मुंबई येथील हैंदशाळा पुस्तक मंडळी या संस्थेच्या कार्यवाहक पदावर असणाऱ्या जार्विस जॉर्ज यांनी १८२५ साली एक परिपत्रक प्रसिद्ध केले. या परिपत्रकामध्ये त्यांना नव्या भांषातरित ग्रंथासाठी भरघोस बक्षीस जाहीर केले. याचा परिणाम म्हणून कोश, व्याकरण, शिक्षणशास्त्र, गणित, शिल्पविद्या, ज्योतिष, सिद्ध पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, शरीरवैद्य, इतिहास, भूगोल, असे साहित्य भाषांतरित झाले. या कालखंडामध्ये असे मराठीतील लेखक अनेक नव्या वाङ्मयप्रकारांमध्ये लिहू लागले. परंपरेला छेद देणारा विचार करू लागले. मराठी साहित्याच्या आजच्या वाटचालीलाही एक प्रकारे या कालखंडात इंग्रजी साहित्याशी येथील लोकांचा झालेला परिचय आणि त्यातून मोठ्या प्रमाणात झालेले अनुवादाचे काम हे आहे. अनेक प्रचलित वाङ्मयप्रकांच्या मुळाशी या कालखंडात झालेले भाषांतराचे काम आहे. बायबलसह पाश्चिमात्त्य साहित्याची भारतीय भाषांमधून झालेली भाषांतरे आणि प्राचीन भारतीय आर्ष महाकाव्यांबरोबरच अनेक ग्रंथांचे इंग्रजी भाषेमध्ये झालेल्या अनुवादांमुळे दोन भिन्न धर्म, समाज, संस्कृतीचा झालेला परिचय, त्यातून झालेले आदान-प्रदान आपण अनुभवतो आहोतच. भिन्न सांस्कृतिक-भाषिक पर्यावरणातील समाज जेव्हा परस्परांशी संबंध प्रस्थापित करू पाहातात, तेव्हा अनुवादांशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नसतो आणि परस्परसंवादाची प्रकर्षाने निकड भासते तेव्हा अनुवादाच्या प्रक्रियेला चालना मिळते. दोन परस्परभिन्न संस्कृती आणि भाषिक समाजांमध्ये संवाद प्रस्थापित होण्यासाठी अनुवाद किंवा भाषांतर पुलासारखे (bridge) काम करते. म्हणूनच आज अनुवादप्रक्रिया काळाची गरज बनली आहे.

६. अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर

अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर हे शब्द खूपच सैलसर अर्थाने वापरले जातात. वास्तविक या तिन्ही प्रक्रियांचे कार्य आणि उद्दिष्ट एकच प्रकारचे असते. परंतु कार्यपद्धती आणि उद्दिष्टपूर्तीची सिद्धता मात्र भिन्न असते. बऱ्याच वेळा हे शब्द परस्परांचे पर्याय अथवा समानार्थी शब्द म्हणून वापरले जाताना दिसतात. याचे कारण या तिन्ही संकल्पना परिचित नसणे व विशेषत्वाने रुजलेल्या नसणे, हे आहे. हे क्षेत्र अत्यावश्यक बनले असले, तरी या अभ्यासक्षेत्राची पुरेशी सैद्धांतिक चर्चा मराठीमध्ये होताना दिसत नाही. भाषांतराची आपल्याकडे सैद्धांतिक चर्चा झाली नाही; याचे कारण भालचंद्र नेमाडे यांच्यासारखे अभ्यासक आपल्या मानसिकतेमध्ये शोधतात. ते म्हणतात, 'भाषांतरासारखे किचकट, वैताकजन्य आणि मेहनतीचे व या सर्वांच्या प्रमाणात अत्यंत कमी फायद्याचे काम आधीच बाजारी वाङ्मयीन जगात फारसे प्रतिष्ठेचे नाही. चांगले भाषांतर करण्यापेक्षा भिकार निर्मिती करणेच सर्वत्र महत्त्वाचे ठरते. भाषांतराची ही दशा तर भाषांतरावरील चर्चेचे जुजबी स्थान का-हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे' (नेमाडे, भालचंद्र : २०११, अनुवादमीमांसा (संपा. केशव तुपे) औरंगाबाद, साक्षात प्रकाशन) अर्थात भालचंद्र नेमाडे यांचे हे मत वाङ्मयीन कलाकृतींच्या अनुवादासंदर्भात आणि अनुवादाच्या सैद्धांतिक मांडणीसंदर्भात आहे. भालचंद्र नेमाडे म्हणतात त्यानुसार या विषयाची पुरेशी सैद्धांतिक मांडणी झालेली नाही.

भाषा ही समाजाची शेकडो वर्षांची परंपरा स्वत:मध्ये मुरवून घेऊन वाहत्या नदीप्रमाणे पुढे पुढे सरकत आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेली असते. मराठी भाषेच्या संदर्भात उदाहरण द्यायचे झाल्यास; हातावर तुरी देणे, शेंडीला गाठ मारणे, एका माळेचे मणी असणे, सटवाईची अक्षरे, हळद लागणे, हळद काढणे, इंगा फिरवणे, उदक सोडणे इत्यादी वाक्प्रयोगांचे भाषांतर कसे करायचे हा मोठाच प्रश्न असतो. 'कपिलाषष्ठीचा योग' या वाक्प्रयोगाचा "A very rare apportunity" किंवा 'पगडी फिरवणे' चा "To turn apon angrily" असा केला जाणारा अनुवाद मराठी भाषिकाला अपेक्षित अर्थ देईलच असे नाही. त्यामुळे भाषाभ्यासकाला, भाषांतरकाराला लक्ष्य आणि मूळ भाषांना असलेली सामाजिक संदर्भाची सूक्ष्म जाण महत्त्वपूर्ण आहे. या तिन्ही प्रक्रियेमध्ये व्यक्तिनिष्ठता महत्त्वपूर्ण ठरते. या प्रक्रियांमध्ये अनुवादकाला करावी लागणारी पूर्वतयारी, त्याचा व्यासंग, वैयक्तिक दृष्टिकोण, भूमिका, मूळ आणि लक्ष्य भाषेवरील त्याचे प्रभुत्व शिवाय या दोन्ही भाषा ज्या समाजगटाच्या आहेत त्या समाजाच्या संस्कृतीची, परंपरांची सूक्ष्म जाण, या भाषा बोलणाऱ्या लोकांची, त्यांच्या राहाणीमानाची, विचारसरणीची किमान ओळख करून घेण्याची त्याची तयारी इत्यादी बाबी या प्रक्रिया नैसर्गिक-स्वाभाविक व्हायच्या असतील तर अत्यावश्यक आहेत.

या तिन्ही प्रक्रियांचा विचार करताना सदा कऱ्हाडे यांनी या कामाचे दोन प्रकार पाडले आहेत. ते लिहितात, 'भाषांतर, अनुवाद आणि रूपांतर या प्रक्रियेत स्रोतभाषा आणि लक्ष्यभाषा यांचा परस्परव्यवहार असतो. मूळ उताऱ्याची भाषा आणि अनुवाद रूपांतराची भाषा; म्हणून भाषांतराचे दोन प्रकार मानले जातात. मूलनिष्ठ भाषांतर आणि लक्ष्यनिष्ठ भाषांतर. ज्या भाषांतरात स्रोत भाषेतील शब्दयोजना, वाक्यरचना शैली यावर लक्ष ठेवून त्याप्रमाणेच भाषांतर केले जाते ते मूलनिष्ठ भाषांतर आणि ज्यात स्रोत भाषेतील

संरचनेकडे लक्ष न देता कथ्य, अर्थ व आशय यावर लक्ष केंद्रित करून लक्ष्य भाषेच्याच संरचनेकडे लक्ष दिले जाते ते लक्ष्यनिष्ठ भाषांतर'(कऱ्हाडे सदा : २०११, पृष्ठक्रमांक ५२) या दोन्ही प्रकारातून होणाऱ्या भाषांतराने भाषांचा विकास साधला जातो. भाषांतर, रूपांतर आणि अनुवाद या तिन्ही प्रक्रियांमध्ये लक्ष्यभाषा आणि मूळ भाषा या दोन्ही भाषांचा विकास अंतर्भूत होतो. मूळ भाषेतील बौद्धिक अनुभव, भाषिक संचित लक्ष्यभाषेत गेल्याने मूळ भाषेच्या प्रतिष्ठेत भर पडते विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, सतिश आळेकर यांची नाटके, वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या, दलित आत्मकथने, तुकारामांचे अभंग या संदर्भातील उदाहरण म्हणून पाहता येते. कवितेच्या बाबतीत तुकाराम; आणि नाटक या वाङ्मयप्रकाराच्या बाबतीत विजय तेंडुलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार यांच्या रूपाने जागतिक स्तरावर मराठी साहित्याची चर्चा होताना मराठी भाषेच्या प्रतिष्ठेत भर पडते.

एस. एल. भैरप्पा यांच्या 'पर्व' या कादंबरीच्या उमा कुलकर्णी यांनी केलेल्या मराठी अनुवादामुळे महाभारताकडे पाहाण्याची सामाजिक दृष्टी रुजली. नव्या दृष्टीने महाभारताकडे पाहिल्यानंतर नवे अनुभवविश्व मराठी वाचकांसमोर आले. भैरप्पा यांच्या इतर कादंबऱ्या, शिवराम कारंथ, यू. आर. अनंतमूर्ती इत्यादींच्या कादंबऱ्या आणि गिरीश कार्नाड यांची नाटके मराठीमध्ये आल्यांनतर नवे अनुभवविश्व मराठीमध्ये आले. या प्रक्रियेतून अनेक नवनवीन शब्दांची भर लक्ष्य भाषेत पडते. नवे शब्दबंध, वाक्यबंध तयार होतात. भाषांतर युगातील मराठी गद्याची दत्तो वामन पोतदार यांनी *'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार'* या ग्रंथात केलेली चिकित्सा पाहता ही गोष्ट ध्यानात येते. शब्द, वाक्य, व्याकरणिक संरचनेबरोबरच नव्या संज्ञा-संकल्पनांची भर लक्ष्य भाषेत पडते. नवे विचार, तत्त्वज्ञान भाषेला मिळते.

अनुवाद, रूपांतर आणि भाषांतर या तिन्ही प्रक्रिया एकसारखेच काम करीत असल्या तरी; या प्रक्रियांची कार्यपद्धती व उद्दिष्टपूर्ती भिन्न असल्याने या प्रक्रियांचा विचार येथे स्वतंत्रपणे करणार आहोत. या तिन्ही प्रक्रिया वेगवेगळ्या असल्या तरी बऱ्याच वेळा त्या परस्परांमध्ये गुंतलेल्या, परस्परांच्या पोटात अंतर्भूत असलेल्या दिसतात. अनुवादकांचे उद्देश विविध असतात. *'बायबल'* च्या अनुवादाचा हेतू ख्रिस्ती धर्मविचाराचा प्रसार हा आहे. लेनर्ड ब्लूमफिल्डच्या *'लँग्वेज'* या ग्रंथाच्या अनुवादाचा हेतू भाषाविज्ञानातील संकल्पना समजून सांगण्यासाठीचा आहे, तर तंत्रज्ञानातील पुस्तकांच्या अनुवादामागे ज्ञान प्रसाराचा हेतू आहे. या तिन्ही प्रक्रियांच्या मुळाशी संवाद-संप्रेषणाची, समोरच्या व्यक्तीला समजून सांगण्याची वृती आहे. तथापि, या तिन्ही प्रक्रियांमध्ये असणारा मूलभूत फरक पाहून या संकल्पना समजून घेऊ.

- **अनुवाद**

'अनुवाद म्हणजे मौखिक किंवा लिखित भाषेच्या माध्ममातून एकदा व्यक्त झालेल्या आशयाची, त्याच भाषेच्या किंवा दुसऱ्या एखाद्या भाषेच्या माध्यमातून पुन्हा केलेली मौखिक किंवा लिखित अभिव्यक्ती.'' (प्र. न. परांजपे, मराठी वाङ्मयकोश (समीक्षा-संज्ञा) : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पृष्ठ ९) डॉ. सदा कऱ्हाडे यांनी भाषांतराचे प्रकार आणि वर्गीकरण करताना भाषेतील प्रतीक/चिन्ह तत्त्वानुसार १. अंत:भाषिक अनुवाद २. आंतर-भाषिक अनुवाद आणि ३. आंतर-प्रतीक अनुवाद असे प्रकार सांगितले

आहेत. भाषा या तत्त्वानुसार उत्पादन सापेक्ष अनुवाद आणि रूपसापेक्ष अनुवाद असे दोन प्रकार तर, लेखन या तत्त्वानुसार लिप्यंकन आणि लिप्यंतर असे दोन प्रकार सांगितले आहेत. या सर्व प्रकारांची चर्चा करताना कऱ्हाडे यांच्या विवेचनात भाषांतर आणि अनुवाद हा शब्द बऱ्याचवेळा परस्परांसाठी पर्यायी म्हणून येताना दिसतो. तथापि, सदा कऱ्हाडे यांनी अनुवादाचे भाषांतरापेक्षा असलेले वेगळेपण या विवेचनातून अधोरेखित केलेले आहे. या संदर्भातील त्यांनी दिलेल्या उदाहरणामुळे अनुवादाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते. या उदाहरणांची चर्चा करण्यापूर्वी डॉ. कल्याण काळे यांनी संपादित *'भाषांतरमीमांसा'* या ग्रंथामध्ये 'अनुवाद' या शब्दाचा स्पष्ट केलेला अर्थ प्रथम समजून घेऊ. अनुवाद या शब्दाचा मौखिक अर्थ 'एखाद्याच्या मागून बोलणे' असा आहे. हे बोलणे दोन्ही प्रकारचे असू शकते. 'एखाद्याचे बोलून झाल्यावर प्रत्युत्तरादाखल बोलणे' आणि 'एखाद्याच्या किंवा स्वत:च्या बोलण्याची पुनरावृत्ती करणे' याही शब्दाला स्वतंत्र पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आहे. वैदिक वाङ्मयामध्ये धार्मिक कृत्यातील निरनिराळ्या कृती करण्याचे आदेश ज्यातून दिलेले असतात अशा मजकुराला विधिवाक्य असे म्हणतात. विधिवाक्यात एकदम नवा मजकूर असतो त्याला विशेष महत्त्व असते. अनुवादामध्ये विधिवाक्यातील मजकुराची पुनरावृत्तीच असल्याने त्याला गौणत्व देण्यात येत असे. या विवेचनावरून ते म्हणतात की, ''पूर्वसिद्ध मजकुराचे स्पष्टीकरण, विवरण अथवा विस्तार म्हणजे अनुवाद होय.'(काळे, कल्याण व सोमण, अंजली (संपा), १९९८, 'भाषांतर मीमांसा', पुणे, प्रतिभा प्रकाशन, पृष्ठ ७) भाषांतर, रूपांतर यापेक्षा अनुवाद ही संकल्पना खूप व्यापक आहे. अनुवाद हे जसे एकभाषिक असतात, तसे ते भिन्नभाषिकही असतात. यासंदर्भात डॉ. सदा कऱ्हाडे यांनी दिलेले उदाहरण पाहता येईल. एक भाषिक अनुवादाचे उदाहरण देताना ते लिहितात,''महानुभाव पंथीय मराठी साहित्य तेराव्या शतकातील मराठी भाषेत लिहिलेले आहे. त्याकाळी आजच्याप्रमाणे मराठीतील शब्दचिन्हांपेक्षा वेगळी शब्दचिन्हे वापरली जात. सतराव्या शतकातील मराठी भाषा फारशी व संस्कृत मिश्रित होती. प्रतीकव्यवस्थेतून निर्माण होणारी भाषेची संरचना आजच्या भाषेतील संरचनेपेक्षा वेगळी होती. म्हणून महानुभावीय गद्यग्रंथांचा प्रचलित विद्यमान मराठीत अन्वय लावताना प्रतीकव्यवस्था बदलावी लागते. त्याचप्रमाणे मोरोपंतांच्या आर्येचा, वामन पंडितांच्या सुश्लोकांचा अन्वय लावताना मूळ पद्यपंक्तीची रचना आणि शब्दचिन्ह यात बदल होतो. शब्दाचा समानार्थी शब्द योजून रचना होत नसली, तरी रचनेत बदल करून व्याकरणदृष्ट्या ती रचना करून घ्यावी लागते. म्हणजे सरळ रचना करून घ्यावी लागते. ही रचना गद्यसदृश असते; पण ती गद्य नसते. ज्ञानेश्वरीतील ओवींचा अर्थ ग्रहण करतानासुद्धा अन्वय लावावा लागतो. मूळ पंक्ती–अन्वय–अर्थ अशी ती प्रक्रिया असते. त्या प्रक्रियेतील 'अन्वय' ही अवस्था अंत:भाषिक अनुवादाची असते. अन्वय म्हणजे संबंध. म्हणून ह्याला अन्वयांतर म्हणतात. भिन्नभाषिक अनुवादाचे उदाहरण देण्यासाठी ते लिहितात,'या प्रकारात एका भाषेतील शब्दचिन्ह/प्रतीक व्यवस्थेतून व्यक्त होणारा अर्थ दुसऱ्या भाषेतील प्रतीक व्यवस्थेतून व्यक्त होतो. विनोबा भावे यांची 'गीताई' हे उदाहरण घेता येईल. भर्तृहरीच्या 'नीतिशतका'तील श्लोकांचे वामन पंडितांनी मराठी भाषांतर केले. कालिदासाच्या 'मेघदूता' चे भाषांतर, महादेवशास्त्री कोल्हटकरांनी शेक्सपियरच्या 'ऑथेल्लोचे' भाषांतर केले. कालिदासाच्या संस्कृत नाटकांची अन्य युरोपीय भाषेत भाषांतरे झाली आहेत. समर्थ रामदासांच्या 'दासबोधा'चे गुजराथी भाषेत

भाषांतर झाले आहे. मराठीतील 'विद्रोही कविता'तील (संपादक प्रा. केशव मेश्राम) निवडक कवितांचे फ्रेंच भाषेत भाषांतर करण्याचा प्रकल्प आहे. दिलीप चित्रे यांनी मराठी कवितांच्या इंग्रजी अनुवादांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. वि. स. खांडेकरांच्या मराठी कादंबऱ्या गुजराथी भाषेत खूप लोकप्रिय आहेत. हा भाषांतराचा प्रकारच वास्तविक अर्थाने म्हणजे 'अन्य भाषा भाषांतर' या अर्थाने अन्वर्थक आहे. ही द्विभाषी प्रक्रिया आहे. एका भाषेतील संरचना लक्षात घेऊन समतुल्य अशी दुसऱ्या भाषेतील संरचना मोजावी लागते. एका भाषेतील अर्थाचे अथवा आशयाचे संश्लिष्ट रूप दुसऱ्या भाषेतून प्रकट होते.''(कऱ्हाडे, सदा : १९९८, भाषांतर, मुंबई, लोकवाङ्मय गृह, पृष्ठ २५ व २७)

भिन्न भाषिक अनुवादाचा विचार, भाषांतरविचार वाटत असला; तरी यामध्ये असणारा अंशत: भेद पाहाणे महत्त्वाचे आहे. एक भाषिक अनुवादप्रक्रियेमध्ये भावार्थ, गोषवारा सांगण्याचा प्रयत्न असतो. मूळ जुनी, भाषा बोजड असलेली कलाकृती समकालीन भाषा-बोलीत समजून सांगण्याची प्रवृत्ती या प्रकारात दिसते. मूळ अभिव्यक्तीतील कालबाह्य भाषिक घटक बदलून त्या ठिकाणी चालू काळाची भाषा वापरून त्या कलाकृतीचे 'अर्वाचीनीकरण' केले जाते.

२. भाषांतर

आज अनेक क्षेत्रांमध्ये भाषांतराची प्रक्रिया उपयोजिली जाते. जागतिकीकरणानंतर महत्त्व प्राप्त झालेली क्षेत्रे, उद्योग-व्यवसाय, सरकारी-निमसरकारी संस्था, प्रसारमाध्यमे, परदेशी कंपन्यांचे विस्तारलेले जाळे, शाखा यामधून भाषांतरकारांना स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे. भारतासारख्या देशांमध्ये पर्यटन, फिरते विक्रेते, जाहिरात, प्रसारण इत्यादी क्षेत्रांमध्ये दुभाषी व्यक्तींची मदत घेतली जाते. भाषांतराची गरज भासणारी अनेक क्षेत्रे आहेत. यापैकी काही महत्त्वपूर्ण क्षेत्रांची येथे चर्चा करू.

'पत्रव्यवहार' हा एक वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिवाय अनेक कंपन्या, सरकारी, खासगी कार्यालयांमधून पत्रव्यवहाराचा व्याप पाहता हे एक मोठे क्षेत्र म्हणून विकसित झालेले आहे. या क्षेत्रामध्येही भाषांतर प्रक्रियेला विशेष स्थान आहे. भारतातील अनेक राज्ये आपला पत्रव्यवहार स्वत:च्या राजभाषेमध्ये करतात. उदाहरणार्थ, कर्नाटक राज्यातील शासकीय पत्रव्यवहार कन्नड भाषेतून चालतो. सीमावर्ती मराठी आणि इतर भाषिकांना हा पत्रव्यवहार समजून घेण्यासाठी भाषांतरावर विसंबून राहावे लागते. त्याचबरोबर न्यायालयासारख्या महत्त्वपूर्ण व्यवस्थेचा कारभार इंग्रजीमधून चालताना दिसतो. अशा संस्थांमधून इंग्रजी न समजणाऱ्यांना भाषांतरावरच अवलंबून राहावे लागते.

प्राचीन भारतीय साहित्य, रामायण, महाभारतादि आर्ष महाकाव्य, विविध धर्मांचे धर्मग्रंथ यांच्या भाषांतराचे स्थान सर्वज्ञात आहे. जीवनासाठी आवश्यक मूलभूत तत्त्वज्ञान, विचारधारा, आचारसंहिता विविध धर्मग्रंथातून मिळते. काहीवेळा प्राचीन, जुन्या मृत भाषांमध्ये असे ज्ञानभांडार असते. उदाहरणार्थ, हिंदू धर्मतत्त्वज्ञान संस्कृत भाषेत आहे. बौद्ध धर्मतत्त्वज्ञान पाली भाषेत, ख्रिस्ती धर्माचा आचार-विचार लॅटिन, हिब्रू भाषेमध्ये आहे. तर मुस्लीम धर्मविचार अरबी भाषेत आढळतो. या सर्वच साहित्याचे जगातील जवळ जवळ सर्वच भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे.

न्यायालय, परराष्ट्र मंत्रालय, ग्रंथ प्रकाशन व्यवसाय इत्यादीबरोबरच आज सर्वात मोठे आणि महत्त्वपूर्ण असलेले शिक्षणक्षेत्रही भाषांतर कार्याने व्यापले आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये सतत अद्ययावत ज्ञानाची आवश्यकता असते. कोणत्याही भाषेतील अद्ययावत ज्ञान या क्षेत्रामध्ये तात्काळ भाषांतरित करून घ्यावे लागते. आज इंग्रजी भाषेमध्ये ही प्रक्रिया खूप गतीने चालते. म्हणूनच इंग्रजी ही ज्ञानभाषा म्हणून जगासमोर आलेली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यक, संगणक या अत्यावश्यक आणि सतत नवीन संशोधन सुरू असलेल्या क्षेत्रांमध्ये भाषांतराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्रांमधील संशोधन तात्काळ सर्वदूर पोहोचवणे महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे येथे भाषांतराला विशेष स्थान आहे.

भाषांतरप्रक्रियेसंदर्भात मराठी विश्वकोशाच्या बाराव्या खंडातील डॉ. अशोक केळकर यांचे टिपण भाषांतरप्रक्रियेसंदर्भात समजून घ्यायला हवे. ते लिहितात, ''भाषांतराबद्दल सामान्य माणसाची धारणा असते की, भाषांतर म्हणजे मजकूर तोच ठेवून फक्त एका भाषेचा पोषाख उतरवून ठेवायचा आणि दुसऱ्या भाषेचा पोषाख चढवायचा. जणू काही रूप १→ रूप २→ रूप ३ पण भाषांतर कार्यातील अडचणी आणि धोके दिसून भाषांतरकर्ता हा नुसता भारवाही नूसन अवघड आणि जबाबदारीचे काम करणारा कलाकार आहे, हे जेव्हा ध्यानात येते; तेव्हा दुसऱ्या टोकाला जाऊन खरे भाषांतर अशक्य आहे, असे म्हणण्याची वृत्ती आहे. इटॅलियन भाषेत तर म्हणच आहे की, 'त्रादुत्तोरे दितोंर' (भाषांतरकर्ते तेवढे घातकर्ते). वास्तविक पाहता भाषांतराचे स्वरूप; रूप १→ अर्थ १→ अर्थ २→ रूप २ असे आहे. हा प्रवास करताना पुढील अडचणी संभवतात : (१) एका भाषेतील विविध अर्थ दुसऱ्या भाषेत विलीन होतात : बंगाली लोक सिगारेट, जल, संदेश 'खा'तात; मात्र मराठीत अनुक्रमे ओढतात, पितात, खातात. (२) एका भाषेतील अर्थाची दुसरीत फेरमांडणी होते : त्याला चार बहिणी आहेत. (म.) उसकी चार बहनें है. (हिं), He has four sisters (इं), ह्या वाक्यांची तुलना करा. (३) जो अर्थ एका भाषेत सुटसुटीतपणे किंवा संक्षेपाने व्यक्त होईल, तो दुसऱ्या भाषेत विस्ताराने किंवा दुरान्वयाने व्यक्त करावा लागेल. उदा. 'त्या रांगेतले कितवे घर?' याचे इंग्लिश भाषांतर; किंवा 'The road was not motorable but only jeepable' याचे मराठी भाषांतर करून पहा. (४) इतके करून जिथे दोन भाषांची सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगळी आहे, तिथे तो अर्थ सहज व्यक्त करता येणारही नाही : 'पदर', 'माहेर', 'उष्टा' ह्या मराठी शब्दांना इतर भारतीय भाषात जसे सहज पर्याय मिळतील, तसे इतर भाषांतून मिळतीलच, असे नाही. गाय आणि cow, मोर आणि peacock, संध्याकाळ आणि evening ह्यासारख्या जोड्या समानार्थी वाटल्या, तरी जोडीतल्या शब्दांचे सांस्कृतिक संदर्भ वेगवेगळे आहेत. (५) जी गत सांस्कृतिक संदर्भाची, तीच गत भाषिक संदर्भाची. उदाहरणार्थ वर दिलेल्या इटॅलियन म्हणीला यमकामुळे आणि अल्पाक्षरामुळे जो चटकदारपणा आला आहे, तो त्या म्हणीचे भाषांतर 'भाषांतरकर्ता हा विश्वासघातकी असतो' असे धोपटपणे केले तर नाहीसा होईल, भाषांतर 'यथार्थ' होईल, पण 'यथारूप' होणार नाही. मराठी 'मृत्यूपत्र' ला हिंदीत 'इच्छापत्र' म्हटले तर कायदेशीर अर्थ येईल, पण 'मृत्यू' चा संदर्भ तेवढा स्पष्ट होणार नाही. ह्या अडचणींचे निराकरण करताना काही गोष्टी ध्यानात येतात : (१) एकाच मुळाची अनेक भाषांतरे संभवतात (२) भाषांतरात साधायच्या निरनिराळ्या गोष्टी एकदम क्वचितच साधतात. एक साधली तर दुसरी हुकते. 'मामा' ला maternal uncle किंवा

mother's brother म्हटले तर अर्थ बरोबर येतो, पण 'मामा, मला तुझ्याबरोबर ने' चे भाषांतर करताना थोडीशी अर्थहानी पत्करून uncle हा शब्द वापरावा लागतो. अर्थहानी अशासाठी की, uncle मध्ये मामाबरोबर काका, मावसा, आत्याचा नवरा हे सर्वच येतात. (३) त्यामुळे भाषांतराची मुक्तामुक्तता ठरवताना त्याचे कार्य कोणते? हे अगोदर निश्चित करावे. ते कार्य ठरवल्यावर भाषांतर शब्दश: किंवा वाक्यश: करावयाचे, काटेकोर अथवा स्वैर करावयाचे, अर्थसाय्याबरोबर रूपसाय्यही साधण्यासाठी धडपडायचे का, हे ठरवता येते. भाषांतर किंवा अन्य भाषिक अनुवाद याचे कार्यानुसार दोन मुख्य प्रकार ठरतात : छायानुवाद : mother's brother, भावानुवाद : uncle; (२) इंग्लिश : I don't have a penny, मराठी छायानुवाद : 'माझ्याजवळ पेनीसुद्धा नाही', भावानुवाद : 'माझ्याजवळ छदाम नही'. मूळ 'रूप १→ अर्थ १' या जोडीला उद्देशून आपल्याला दोन प्रश्न विचारता येतात : (२) रूप १ मुळे कोणता अर्थ १ व्यक्त होत आहे, हे भाषा २ मधून सांगा. ह्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे भावानुवाद. उदाहरणार्थ, प्रवाशाच्या मार्गदर्शिकेत रस्ता कसा विचारायचा किंवा द लॉर्डस प्रेमर ही ख्रिस्ती प्रार्थना मराठीत कशी करायची, हे सांगायचे तर भावानुवादाची अपेक्षा असते. भावानुदवाचे टोकाचे उदाहरण म्हणजे एखाद्या कवितेची दुसऱ्या भाषेत पुनर्निर्मिती, किंवा एखाद्या नाटकाचे दुसऱ्या भाषेत आणि दुसऱ्या वेषात रूपांतर. छायानुवाद करताना तो ज्या भाषेत करावयाचा त्या भाषेची प्रकृती सांभाळण्याचे बंधन एवढे नसते. अर्थ १ व्यक्त झाला ना; मग रूप २ मधील सुघड नसले तरी चालेल; अशी भूमिका असते. 'हे भाषांतर आहे असे वाटतच नाही', असे स्तुतीदाखल म्हणायचे ते भावानुवादाबद्दल; छायानुवाद हा बोलून चालून छायेसारखा असायला हवा. भावानुवाद करताना अर्थ १ शी इमान व त्याचवेळी भाषा २ शी इमान अशी तारेवरची कसरत असते. 'भाषांतरे आणि बायका एक आकर्षक तरी असतात, किंवा एकनिष्ठ तरी असतात-दोन्ही असणे कठीण!' ह्या फ्रेंच भाषेतील उक्तीमध्ये बरेच तथ्य आहे, असे भाषांतराच्या संबंधात तरी म्हणावे लागते. (अशोक केळकर, मराठी विश्वकोश, खंड बारा : ४७९-४८०)

- **रूपांतर**

रूपांतराच्या प्रक्रियेमध्ये पुनराभिव्यक्ती होत असते. एखाद्या कलाकृतीतील आशयाची दुसऱ्या रूपामध्ये पुनराभिव्यक्ती होण्याच्या प्रक्रियेलाच रूपांतर म्हणतात. या संदर्भातील पुष्कळ उदाहरणे सांगता येतील. श्री. ना. पेंडसे यांनी आपल्या हद्दपार, गारंबीचा बापू, रथचक्र या कादंबऱ्यांची नाटकात रूपांतरे केली. अनिल बर्वेच्या थँक्यू मिस्टर ग्लाड या कादंबरीचेही असेच नाट्यरूपांतर केले गेले आहे. धग (उद्धव शेळके), गोतावळा (आनंद यादव), गावठाण (कृष्णात खोत) या कादंबऱ्या मूळच्या कथांच्या आवाक्याच्या होत्या. नंतर त्यांना कादंबरीचे रूप प्राप्त झाले. बनगरवाडी (व्यंकटेश माडगूळकर), रीटा वेलिनकर (शांता गोखले), जैत रे जैत (गो.नी.दांडेकर), श्यामची आई (साने गुरुजी) या कादंबऱ्यांचे चित्रपटांमध्ये रूपांतर झाले. कवी ना. धों. महानोर, शांता शेळके, इंदिरा संत, कुसुमाग्रज, ग्रेस यांच्या अनेक कवितांचे गीतामध्ये केले गेलेले रूपांतर अशी अनेक उदाहरणे रूपांतराच्या संदर्भात सांगता येतील. प्र. ना. परांजपे यांनी रूपांतराच्यावेळी करण्यात येणाऱ्या बदलाच्या चार मिती सांगितल्या आहेत.

१. भाषा तीच, पण साहित्यरूपातील बदल.

२. भाषा व साहित्यरूप या दोन्हींमध्ये बदल.

३. भाषा व साहित्यरूपाप्रमाणेच मूळ कलाकृतीचा आशय ज्या जीवनघटकांमधून व्यक्त झाला होता, त्या जीवन घटकांमधील बदल (जीवनरूपातील बदल)

४. मूळ कलाकृतीच्या चिन्ह व्यवस्थेतील बदल (कला रूपातील बदल) रूपांतर या संकल्पनेसंदर्भात रूपांतराची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी मराठी विश्वकोशातील डॉ. रमेश धोंगडे यांनी लिहिलेल्या टिपणातील विवेचन पाहू. ते लिहितात,'परभाषेतील साहित्यकृतीचा आकृतिबंध साधारणपणे तसाच ठेवून बाकीचे अर्थाचे आणि रूपाचे बारकावे वगळणे, बदलणे, नव्याने आणणे म्हणजे रूपांतर. उदाहरणार्थ, मर्फीच्या 'ऑल इन द रॉंग' (अठरावे शतक, इंग्लंड) या नाटकाचे 'संशयकल्लोळ' (१९१६) हे देवलांनी केलेले मराठी रूपांतर होते. हे रूपांतर इतके बेमालूमपणे केलेले आहे, आणि मूळचे इतके पूर्णत्वाने मराठीकरण झालेले आहे की, ते रूपांतर आहे हे ओळखताही येणार नाही. मुख्य म्हणजे मूळ नाटकापेक्षा ते सरस वठले आहे. उलट गॉल्झवर्दीच्या 'स्टाईफ' (१९०९) या नाटकाचे भा. वि. वरेरकर यांनी केलेले 'सोन्याचा कळस' रूपांतर, इब्सेनच्या 'ए डॉल्स हाऊस' (१८७९) या नाटकाचे यो. ग. रांगणेकर यांनी केलेले 'कुलवधू' (१९४२) हे रूपांतर, बर्नार्ड शॉच्या पिग्मॅलीनचे (१९१२) पु. ल. देशपांडे यांनी केलेले 'ती फुलराणी' रूपांतर ही सर्व मराठी वळणाची असली, तरी त्या त्या मूळ नाटकांशी तुलना करता फारच बेताची रूपांतरे ठरली आहेत. कधी कधी मूळ साहित्यकृतीचा विषय घेऊन त्या विषयाचेच रूप बदलून दुसरी साहित्यकृती रचण्यात येते. अशा रूपांतरात लेखक अनेकदा 'अमुक अमुक साहित्यकृतीवर आधारित' असा मूळ साहित्यकृतीचा प्रामाणिकपणे उल्लेखही करतो. मात्र, असे काहीही न करता मूळ साहित्यकृती लपविणे किंवा रूपांतरात मूळ साहित्यकृतीचा मुळीच उल्लेख न करणे याला वाङमयचौर्य म्हणतात. रूपांतरात रूपांतरकाराला भरपूर स्वातंत्र्य असल्याने भाषांतरापेक्षा त्यात कलानिर्मितीला अधिक वाव असतो.

दुसरा प्रकार म्हणजे एका भाषेतील साहित्यप्रकाराचे त्याच भाषेतील दुसऱ्या साहित्यप्रकारात रूपांतर करणे, हा होय. उदाहरणार्थ, श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' या मूळ कादंबरीचे नाटकात केलेले रूपांतर किंवा जयवंत दळवी यांच्या 'महानंदा' या कादंबरीचे 'गुंतता हृदय' हे या नाटकात केलेले रूपांतर. या पद्धतीचे रूपांतर एका दृष्टीने अधिक अवघड असते. कारण प्रत्येक साहित्य प्रकाराची स्वत:ची खास बलस्थाने असतात; स्वत:च्या खास प्रस्तुतीकरणाच्या पद्धती असतात. त्या दुसऱ्या साहित्य प्रकारात तशाच स्वरूपात सापडत नाहीत किंवा वापरता येत नाहीत. उदाहरणार्थ, कादंबरीतले वर्णन व नाटकातले वर्णन यात भिन्नता असते. नाटकात संवाद अपरिहार्य असतात, तर कथा-कादंबरीमध्ये ते पूर्णपणे टाळता येतात. काही साहित्यप्रकारांचे दुसऱ्या साहित्य प्रकारांत रूपांतर होऊ शकणार नाही. उदाहरणार्थ, प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे नाटक होऊ शकत नाही. पाश्चात्त्य समीक्षेत कादंबरी हा सुरुवातीला महाकाव्याचा गद्य उपप्रकार मानला जाई. पुढे तो स्वतंत्र साहित्यप्रकार ठरला. त्यामुळे महाकाव्याची कादंबरी हे रूपांतर होते; पण कवितेचे रूपांतर कादंबरीत होत नाही. कथा-कादंबरीचे नाटकात रूपांतर होते; पण नाटकाचे कादंबरीत

रूपांतर होताना क्वचितच दिसते. इंग्रजीत चार्ल्स लँबने शेक्सपिअरच्या नाटकांचे कथा रूपांत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला; पण तो बालवाङ्मयातच जमा होता. एखादा लेखक स्वत:च आपल्या एका साहित्य प्रकारातील साहित्यकृतीचे दुसऱ्या साहित्यप्रकारात रूपांतर करू शकतो. पण त्यामुळे रूपांतराच्या गुणवत्तेत निश्चितपणे फरक पडतो, असे दिसत नाही. एका भाषेतील एका साहित्यप्रकाराचे दुसऱ्या भाषेत दुसऱ्याच साहित्य प्रकारात रूपांतर करण्यासाठी अधिक निर्मितीक्षमतेची गरज असते. कधी कधी त्यांना रूपांतर असे म्हटलेही जात नाही. शेक्सपिअरची नाटके, कालिदासाची काही नाटके तसेच रामायण, महाभारत यावर आधारलेल्या भारतीय भाषांतील असंख्य कृती इत्यादी उदाहरणे या संदर्भात देता येतील.

रूपांतराचा तिसराही एक प्रकार संभवतो, तो म्हणजे एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात होणारे रूपांतर. कथेचे नाटकात रूपांतर होताना साहित्यप्रकाराप्रमाणे माध्यमही बदलते. कारण कथा-कादंबरी हा श्राव्य प्रकार आहे, तर नाटक हा दृकश्राव्य माध्यमाचा प्रकार आहे. कथेचे नाटक आणि कथेचा चित्रपट करणे, ही माध्यमांवर आधारित रूपांतरे ठरतात. चित्रपट-माध्यमाच्या वेगळेपणाने रूपांतर कमी-अधिक सरस ठरते. उदाहरणार्थ, रामायण, महाभारत यासारखी महाकाव्ये वाचून श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या विशिष्ट प्रतिमा मनात निर्माण होतात. चित्रपटात त्यांच्या प्रत्यक्ष प्रतिमा दिसतात. त्या भिन्न, हीणकस असल्यास परिणामाला बाध येतो. काव्यातील वर्णनाचे चित्रपटमाध्यमातून दृश्यीकरण करण्यात येते. कवितेचे चित्रपटगीत होणे किंवा करणे हेही काहीअंशी माध्यमाच्या संदर्भातील रूपांतरच होय. संगीताच्या आधारे चित्रनिर्मिती किंवा मूर्तिशिल्प निर्माण करणे किंवा चित्राच्या आधारे मूर्तिशिल्पाची निर्मिती करणे, ही भाषेतर माध्यम असलेल्या कलावस्तूंची रूपांतरे होत. एखाद्या रूपांतरात भाषा, साहित्यप्रकार आणि माध्यम या तीनही बाबींत बदल होतो.

याप्रमाणे भाषा, साहित्यप्रकार आणि माध्यम यांच्या बदलातून रूपांतराचे तीन प्रकार संभवतात. मात्र, या तीनही प्रकारात मूळ कृती नव्या रसिकाजवळ आणणे, हा समान हेतू आहे आणि ते करताना बरेच स्वातंत्र्य घेणे, ही समान प्रवृत्ती दिसून येते.'' (डॉ. रमेश धोंगडे, मराठी विश्वकोश, खंड चौदा : ११४३-११४४)

४.५ अनुवादकाचे गुण व पूर्वतयारी

जीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये अनुवादाचे महत्त्व अधोरेखित झालेला हा काळ आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा झालेला विकास, दळणवळणाच्या साधनांची सहज उपलब्धता. सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेल्या अनेक गोष्टी, शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, ज्ञानशाखाविस्तार, नवे सिद्धांत-शोध, मानवाचा वाढता संपर्क, नोकरी व्यवसायासाठी विस्तारलेली नवी क्षेत्रे, अशा अनेक कारणांमुळे अनुवादप्रक्रियेला गती मिळते आहे. छापील माध्यमे, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, नाना प्रकारची उत्पादने करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, जाहिरात क्षेत्र, प्रकाशन क्षेत्र अनुवादकार्यासाठी नवनव्या संधी उपलब्ध करून देत आहे. त्यासाठी आपण अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर या तिन्ही संकल्पनांचे स्वरूप आणि तिन्ही संकल्पनांमध्ये असलेला फरक विस्ताराने पाहिला. या संकल्पना अंशत: समान वाटाव्यात अशी एक प्रक्रिया तिन्ही संकल्पनांमध्ये

चालताना दिसते, परंतु सूक्ष्म अभ्यासाअंती आपल्याला या प्रत्येक संकल्पनेच्या कार्यपद्धती भिन्न आहेत असे दिसते. अनुवादक, भाषांतरकार आणि रूपांतरकार या तिघांजवळ काही समान गुण असावे लागतात, त्याची चर्चा करू. येथे विवेचनाची सोय म्हणून अनुवादक हा शब्द आपण वापरत असलो तरी हे गुण या प्रक्रियेत सर्वांजवळच असावे लागतात.

१. भाषाज्ञान

अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर या तिन्ही प्रक्रिया भाषेशी संबंधित आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील भाषाज्ञान ही प्राथमिक गरज आहे. येथे एकापेक्षा अधिक भाषांचे सूक्ष्म ज्ञान आवश्यक आहे. भाषा ही संदेशनाचे काम करणारी व्यवस्था असली तरी; प्रत्येक समाजात भाषेचे एक स्थान असते. त्यामुळे भाषा वापरणाऱ्या समाजाच्या संदर्भाने भाषेतील संदर्भांचे ज्ञान अनुवादकाला असायला हवे. भाषेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक संदर्भाच्या अनुषंगाने वरती चर्चा आलेली आहेच. तर हे संदर्भ जाणीवपूर्वक अभ्यासने ही अनुवादकाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर मूळ आणि लक्ष्य भाषेचे व्याकरण व्यवस्थाही माहिती असणे महत्त्वाचे आहे.

२. निवड

अनुवादकासमोर अनुवाद करताना अनेक अडचणी उभ्या राहतात. या अडचणींमधून मार्ग काढत अनुवादकार्य पूर्ण करायचे असते. यासाठी अनुवादकाला काही पूर्वतयारी करावी लागते. एवढेच नव्हे तर अशा प्रकारच्या अडचणी निर्माण करणाऱ्या, गुंतागुंतीच्या कामासाठी अनुवादकाकडे काही विशेष गुण असावे लागतात. अनुवाद किंवा भाषांतर करताना अनुवादकर्त्यासमोर सर्वात प्रथम प्रश्न असतो तो अनुवाद कशाचा करायचा? सरसकट पुस्तकाचे अनुवाद होत नाहीत. तसे करणे हे व्यवहार्य आणि प्रयोजनशून्य काम ठरेल. अनुवादकासमोर काही एक उद्दिष्ट असते. त्यामुळे अनुवादासाठी निवड खूप महत्त्वाची आहे. कोणत्याही भाषेतील सर्वसामान्य कलाकृती अनुवादक अनुवादासाठी निवडत नाहीत. अशा वेळी 'उत्कृष्टता' हा निकष लावावा लागतो. निवडीपासून अनुवाद पूर्ण होईपर्यंत अनुवादकावर आपोआपच काही जबाबदारी येऊन पडते. अनुवादही एक सांस्कृतिक जबाबदारी असते. अनुवादासाठी निवडलेली कलाकृती जेवढी लोकप्रिय, उत्कृष्ट तेवढी जबाबदारी वाढते. कारण मूळ कलाकृतीचा बाज आणि तिचे गुणविशेष अनुवादामध्येही टिकले पाहिजेत. मराठीतील काही लेखकांचे इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद झालेले आहेत. उदाहरणासाठी वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यांचा विचार करता येईल. वि. स. खांडेकर हे लोकप्रिय लेखक आहेत. मराठीमध्ये त्यांना खास वाचकवर्ग लाभला आहे. यांच्या कादंबऱ्यांचे त्यामुळेच इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले. या अनुवादांपैकी काही अनुवाद इतके दर्जेदार झालेले आहेत की, गुजराथी वाचकांना खांडेकर गुजराथी वाटतात. एस. एल. भैरप्पा यांच्या कन्नड कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद इतके उत्कृष्ट झाले आहेत की, त्यामुळेच हा लेखक मराठी भाषेमध्ये असायला हवा होता अशी चर्चा होताना दिसते. कारण त्या लेखकाची योग्यता, श्रेष्ठत्व अनुवादकांनी अनुवादांमधूनही टिकवून ठेवली आहे. अशा उत्कृष्ट अनुवादांसाठी अनुवादकाजवळ कठोर परिश्रमाची तयारी असावी लागते. अनुवाद ही खरे तर कठोर साधना आहे.

३. शास्त्र व कला

अनुवादकाला केवळ दोन-तीन भाषा येतात त्यामुळे अनुवाद उत्तम जमेल असे नाही. अनुवाद हा शास्त्र आणि कला यांचा एक संगम असतो. अनुवादकला परिश्रमसाध्य असल्यामुळे अनुवादकाला प्रचंड परिश्रमांची तयारी ठेवावी लागते. त्याला मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा अशा दोन्ही भाषांचे अद्ययावत शास्त्रीय आणि सखोल ज्ञान असावे लागते. भाषा म्हणजे प्रत्यक्ष बोलली जाते, ऐकू येते ती केवळ ध्वनींची संरचना नसते; तर भाषेच्या व्यवहारात अंतर्भूत असणाऱ्या इतर अनेक गोष्टींचा विचार महत्त्वाचा असतो. प्रत्येक भाषेला असलेला सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ विचारात घ्यावा लागतो. भाषेत अस्तित्वात असलेल्या वैविध्यपूर्ण रूपांची जाण असावी लागते. या विविध रूपांमागे भौगोलिक, सामाजिक, राजकीय अणि सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते. त्यामुळे अनुवादकाला या परिस्थितीचा अभ्यास असावा लागतो. शब्दानुवादामध्ये हा संदर्भशोध, परिस्थितीसंदर्भ विचारात घ्यावा लागतो. यादवी, गोंधळ, लगीनघाई, रामबाण औषध, कपिलाषष्ठीचा योग, पानिपत, ध चा मा इत्यादी अनेक शब्दांना असलेला हा संदर्भ ध्यानात घेतला म्हणजे याची प्रचिती येते. कुंभकर्ण, कंसमामा, जमदग्नी, कळीचा नारद, कुबेर, शकुनीमामा ही व्यक्तिनामे असली तरी; आज मराठी भाषेत हे सारे शब्द प्रवृत्तिसूचक शब्द झाले आहेत. तसेच ते वापरले जातात. अशा शब्दांचे अनुवाद थेट इंग्रजी भाषेत करताना हा संदर्भ त्या भाषिकांना कळण्याचा काही संबंध नसतो. त्यामुळे स्पष्टीकरण देणारा दुसरा शब्द येथे वापरावा लागतो.

४. संदर्भविश्व

विश्वातील अद्ययावत गोष्टी भाषेतून व्यक्त करता येतात. सर्वच भाषांमध्ये ही क्षमता असते. जगात सर्व भाषांमध्ये आढळणारा हा समान गुण आहे. वरीलप्रमाणे विशिष्ट संदर्भाधिष्ठित शब्द अनुवादित करताना पर्यायांचा विचार करावा लागतो. विशिष्ट भाषेत असे शब्द, अनुभव, संदर्भ असलेले शब्द नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी पर्यायी शब्द नसले तरी; असे शब्दांतून प्राप्त होणारा आशय व्यक्त करण्याची क्षमता प्रत्येक भाषेत असते. उदाहरणार्थ, 'रामराज्य' या शब्दाला An ideal government, 'रामबाण औषध'ला A never failing remedy, 'यादवी' या शब्दाला Internecine dissensions, 'सांबाचा अवतार' या शब्दाला A credulous and simple person, 'सुभद्रा' या शब्दाला A beautiful woman असे पर्यायी शब्द वापरून अनुवाद-भाषांतर होताना दिसते. या संदर्भात ना. गो. कालेकर यांनी प्रतिपादन केलेला विचार लक्षात घेण्यासारखा आहे. ते लिहितात, ''म्हणी, वाक्प्रचार यांसारख्या अवशेषांतून समाजाच्या विशिष्ट अनुभवांचे दर्शन होते. 'Make hay while the sun shine', ही म्हण इंग्लंडात खरी आहे. त्याच्या भाषांतराने व्यक्त होणाऱ्या कल्पनेला मराठीत फारसा अर्थ नाही. म्हणून आपल्या जीवनातला यांसारखा एखादा अनुभव आपल्याला त्या जागी सांगावा लागेल. योग्य भाषांतरासाठी दोन्ही संस्कृतींच्या जीवनाची सूक्ष्म ओळख लागते ती यामुळेच. 'भटवाडीत कोंबडं', 'आपलं नाक कापून दुसऱ्याला अपशकुन' यांसारख्या मराठी म्हणी, old wine in a new bottle (नव्या बाटलीत जुने मद्य) यासारखे फ्रेंच किंवा इंग्रजी वाक्प्रचार केवळ शब्दांचे अर्थ माहीत असल्याने समजणार नाहीत. या समाजाचे जीवन, तेथे प्रचलित

असलेल्या समजुती, यांनाच असल्या अभिव्यक्तीच्या आशयग्रहणात पहिले महत्त्व दिले पाहिजे.'' (कालेलकर ना. गो. : १९९५, ध्वनिविचार, मुंबई मौन प्रकाशन, ११८)

५. बोलींचा परिचय

अनुवादकाला स्त्रोत अणि लक्ष्य भाषेच्या केवळ प्रमाणबोलीचे ज्ञान असून चालत नाही, तर त्या प्रमाणबोलीअंतर्गत अस्तित्वात असलेल्या विविध बोलींचा परिचय असावा लागतो. या बोली बोलणाऱ्या समाजगटांची संस्कृती, राहणीमान इत्यादींची किमान माहिती असावी लागते. प्रमाण भाषा व बोलींच्या परंपरांची जाण असावी लागते. कारण अनुवादकाला अनुवाद करताना शब्दकोशावर विसंबून राहता येत नाही. शब्दकोशातील कोणता पर्याय निवडावा, हे या ज्ञानाधारेच ठरवावे लागते. अनुवादात निर्माण होणारी क्लिष्टता आणि अर्थदुर्बोधता टाळण्यासाठी अनुवादकाला शब्दांची निवड करावी लागते. ही निवड आशयानुरूप होत असेल तरच अनुवाद वाचकाच्या पसंतीला उतरतो. यासाठी अनुवादकाला शब्दनिवड करता आली पाहिजे. त्याचबरोबर अनुवादकाला भाषांतर्गत व्यवस्थेचे म्हणजेच त्या भाषांच्या व्याकरणाचेही ज्ञान असावे लागते. प्रत्येक भाषेची व्याकरणिक वैशिष्ट्ये वेगळी असल्याने या ज्ञानाला अनुवादकार्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. एकूणच अनुवादकर्त्याला मूळ भाषा आणि लक्ष्य भाषेत व्युत्पन्नता सिद्ध करावी लागते.

६. वाचन

अनुवादकाजवळ चतुरस्त्र वाचनाची आवड आणि व्यासंग असावा लागतो. अनुवादकाचे वाचन खूप काळजीपूर्वक झाले पाहिजे. कलाकृतीचे सर्वसामान्य वाचन आणि अनुवाद कार्यासाठीचे वाचन यामध्ये मोठा फरक असतो. वाचन हा पूर्णत: वैयक्तिक अनुभव आहे. एखाद्या पुस्तकाच्या दोन वेगवेगळ्या वाचकांना त्या पुस्तकातून एकसारखाच अनुभव येईल, हे सांगता येत नाही. अनुवादकर्ता स्वत:च्या काळजीपूर्वक वाचनातून आपली शब्दसंपत्ती समृद्ध करीत असतो. त्यासाठी अशा वाचनाची चिकाटी आणि सातत्य अनुवादकाला ठेवावे लागते. वाचनानेच या चर्चेत अनुवादकांकडून अपेक्षिलेल्या अनेक गोष्टींची पूर्तता होऊ शकते. कारण सततच्या वाचनानेच भाषेची परिपूर्ण ओळख होते. शब्दसंग्रह, भाषेची व्याकरणिक वैशिष्ट्ये या सर्वच गोष्टींचे बारकावे समजण्यासाठी सततच्या वाचनाला पर्याय नाही.

७. पर्यायी शब्द

भाषांतरकाराला बऱ्याचदा नवे-नवे शब्द घडवावे लागतात. काही वेळा जुन्या शब्दांना नवे अर्थ प्राप्त करून द्यावे लागतात. पाश्चात्य परंपरेत उदयाला आलेल्या संज्ञा-संकल्पनांतून नवे शब्द मिळतात. यामुळे भाषेची लवचिकता वाढते. अर्थ अभिव्यक्तीची भाषेची क्षमता वृद्धिंगत होते. या एकूण प्रक्रियेत अशा तऱ्हेने लक्ष्य भाषेच्या संपदेत भर पडते. पर्यायाने भाषेचा विकास साधला जातो. म्हणून या प्रक्रिया भाषा विकासासाठी उपयुक्त आणि आवश्यक ठरतात. अनुवादकाला शब्दकोश हाताळण्याची सवय असावी लागते. शब्दकोशांमध्ये एका शब्दासमोर अनेक पर्यायी शब्द दिलेले असतात. या शब्दांपैकी कोणता शब्द

निवडायचा याचा निर्णय घेताना मूळ कलाकृतीतील आशयाची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी विचारात घ्यावी लागते. अनुवादकाजवळ भाषेच्या संस्कृती-इतिहासासंबंधी जाणून घेण्याची प्रबळ इच्छा असेल, तर पर्यायी शब्दांची निवड अचूक होते. अनुवाद-प्रक्रियेसाठी अनुवादकाला साहित्यव्यवहार आणि भाषाव्यवहारातील प्रत्येक घटकाचा अभ्यास आणि त्यासंदर्भातील रुची असावी लागते. हा अभ्यास आणि रुची असेल तर भाषांतरासाठी कोणती वाङ्मयीन कलाकृती निवडायची, साहित्यप्रकाराची निवड करायची या बाबी ठरवणे शक्य होते. या निवडीनंतरच अनुवादकाच्या परिश्रमाची दिशा ठरते. वाङ्मयीन कलाकृतीचा अनुवाद आणि इतर शास्त्रीय पुस्तकांचा अनुवाद यामध्ये बरीच तफावत असते. ललित साहित्याच्या भाषांतर-अनुवाद प्रक्रियेमध्ये सर्जनाची प्रेरणा असते. एखादा लेखक-कवी मानवी जीवनाचे दर्शन ज्या कलात्मकतेने वाचकांसमोर ठेवतो; ती ठेवताना जी अंत:प्रेरणा त्याला उत्तेजित करीत असते, तशीच काहीशी प्रेरणा अनुवादकाजवळ निर्माण होते. अशा विशिष्ट प्रेरणेतून अनुवादाची प्रक्रिया काही वेळा घडत असली तरी, अनुवादकाने मूळ कलाकृतीतील अनुभव, अनुभव कथनाचा बाज, प्रयोग भाषांतरित कलाकृतीत संक्रमित करण्याचे कौशल्य आत्मसात करावे लागते. वाङ्मयीन कलाकृतींच्या अनुवादप्रक्रियेत अनुवादकांना मूळ कलाकृतीशी प्रामाणिक राहात वैयक्तिक अनुभवांना फाटा द्यावा लागतो.

८. संस्कृतीचे ज्ञान

अनुवाद करताना स्रोतसाहित्यकृतीच्या लेखकाची लेखनशैली आणि विचारपद्धती समजून घेणे आवश्यक असते. कारण प्रत्येक लेखकाची स्वत:ची अशी एक शैली आणि भाषावापराची पद्धती असते. अनुवादकाने ही शैली ओळखणे महत्त्वाचे असते. स्रोतसाहित्यकृती जेव्हा लिहिली गेली त्या काळाचे सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय इत्यादी संदर्भांचे ज्ञान अनुवादकाजवळ असणे गरजेचे असते. स्रोतसाहित्यकृतीच्या आशयाची आणि भाषिक भांडाराची जाण अनुवादप्रक्रियेत महत्त्वाची ठरते. उदाहरणार्थ, प्रवीण बांदेकर यांच्या *'चाळेगत'* या कादंबरीचे भाषांतर करताना कोकणातील सामाजिक, राजकीय संदर्भ जसे माहीत असणे गरजेचे आहेत. तसेच तेथील मच्छिमार लोकांच्या भाषेची जाण, स्थानिक बोलीभाषेतील बारकावे आाणि एकूणच तेथील लोकांच्या भाषिक भांडाराचा परिचय महत्त्वपूर्ण ठरतो. साकव, गजाली, केंडमासा, देवचार यासारखे शब्द कोणती अर्थवत्ता देतात याचे ज्ञान अनुवादकाला असणे जरूरीचे आहे. त्याचबरोबर या कादंबरीत येणारा दशावताराचा खेळ, त्यातील संकासूर या गोष्टी माहिती पाहिजेत तरच अनुवादप्रक्रिया सुलभ होऊ शकते. इंग्रजी भाषेत दगडाला खंबीरतेचे प्रतीक मानले जाते; तर मराठी भाषेत दगडाला मूर्खपणाचे प्रतीक मानले जाते. यासारख्या रूपकांचा अनुवाद करताना दोन्ही संस्कृतींचे नीट भान असणे आवश्यक असते. याखेरीज दोन्ही संस्कृतीतील सण, चालीरीती, रूढी इत्यादी गोष्टी माहीत असणे आवश्यक असते. शिवाय स्रोतभाषा आणि लक्ष्यभाषेची व्याकरणिक वैशिष्ट्ये त्यांची बलस्थाने आणि मर्यादा, तसेच त्यांतील परस्परसंबंध. उदाहरणार्थ, मराठीत कर्तरी प्रयोगात क्रियापदाला लागणाऱ्या प्रत्ययाद्वारे कर्त्याचे लिंग सांगावे लागते. इंग्रजीत मात्र तसे नाही. यामुळे इंग्रजीतून मराठीत अनुवाद करताना वाक्यातील कर्त्याचे लिंग पुरेसे स्पष्ट नसल्यास अडचण येऊ शकते. परंतु मराठीच्या वैशिष्ट्यांचा नीट विचार केलेला असल्यास कर्तरीखेरीज इतर वाक्यरचना वापरून ही समस्या सोडवणेही शक्य होऊ शकते.

९. ग्राहक व गरज

आज जवळजवळ सर्वच क्षेत्रांमध्ये अनुवादाची गरज भासू लागलेली आहे. सर्वच क्षेत्रातील अनुवाद करताना एक गोष्ट सतत ध्यानात घ्यावी लागते, ती म्हणजे अनुवादकाचे ग्राहक कोण, ही होय. एखादी कलाकृती कुणासाठी अनुवादित करायची आहे, ही बाब खूप महत्त्वाची आहे. एखादी गोष्ट लहान मुलांसाठी अनुवादित करायची असेल, तर भाषा कशी वापरायची याचे स्वतंत्र चिंतन अपेक्षित असते. त्यानुसारच भाषेचे उपयोजन अनुवादात झाले पाहिजे. प्रौढ शिक्षणाची पुस्तके आणि उच्च शिक्षणासाठीची पुस्तके अनुवादित करताना भाषावापराच्या काही सीमारेषा आखून घ्याव्या लागतात. तसेच शिक्षण, प्रसारमाध्यमे, ललित-ललितेतर साहित्य इत्यादी सर्वच प्रकारांमध्ये अनुवाद करताना अनुवादाचा ग्राहक अनुवादकाने डोळ्यांसमोर ठेवूनच अनुवादाची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. आपल्या जगण्याचा एक भाग बनलेल्या जाहिराती आणि बातमी यांचा येथे अनुवादाच्या संदर्भाने थोडक्यात परिचय करून घेऊ.

४.६ समारोप

प्रस्तुत घटकामध्ये आपण अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर आणि अनुवादकाचे गुण व पूर्वतयारी याविषयी जाणून घेतले. अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर या तिन्ही संकल्पनांचे स्वरूप आणि या संकल्पनांमध्ये असणारा फरक याविषयी विस्ताराने चर्चा केली. अनुवादप्रक्रिया ही चालू काळाची गरज आहे. ती या काळाची एक मागणी आहे. जगभरातील शेकडो भाषांमध्ये विखुरलेले ज्ञानभांडार अनुवाद-भाषांतर प्रक्रियेशिवाय सर्वांना उपलब्ध होऊ शकणार नाही. जगातील सर्वच भाषा शिकणे, हे व्यवहार्य नसल्यामुळे आणि ती एक अशक्य गोष्ट असल्यामुळे अनुवादांना पर्याय नाही. भारतापुरता विचार केला तरी भारतातील बहुभाषिक अनुभवविश्व, सांस्कृतिक विविधता अनुवादांशिवाय समजून घेणे केवळ अशक्य आहे. अलीकडे अनुवादकांसाठी मोठी संधी निर्माण करणारी ठरली आहे. या अनुषंगाने प्रस्तुत घटकांमध्ये या अभ्यासक्षेत्राचा आपण विस्ताराने आढावा घेतला.

मराठीत झालेला अनुवादविचार, अनेक भाषांतरकार, भाषाभ्यासकांनी मांडलेले विचार आणि या अभ्यासक्षेत्राचे सांगितलेले विविध पैलू आपण अभ्यासले. जगभरात अनुवादित साहित्याचा एक दैदिप्यमान असा वारसा आहे. अनुवादाशिवाय आपले अनुभवविश्व समृद्ध होऊ शकणार नाही. त्यामुळे विविध अनुवादांचे स्वागत होताना दिसते. शेक्सपिअरसारखा युरोपियन नाटककाराच्या नाटकांचे स्वागत होताना दिसते. हा नाटककार आज जगभरातील भाषांमध्ये अभ्यासला-वाचला जातो याचे कारण त्याच्या नाटकांचे झालेले अनुवाद हेच आहे. अनुवाद ही आजच्या बहुसांस्कृतिक जीवनातील महत्त्वपूर्ण गोष्ट असून भाषांतरामुळे आपला विकास साधला जातो आहे. त्याचबरोबर अनुवादप्रक्रियेतून भाषांचा विकास होतो, भाषा समृद्ध होतात. असे असले तरी अनुवाद सहजसाध्य गोष्ट नाही. ती साध्य होण्यासाठी आपली काही पूर्वतयारी असावी लागते. अनुवादक म्हणून काही गुण आत्मसात करावे लागतात. या साऱ्याच गोष्टींची चर्चा आपण येथे केली.

४.७ शब्दार्थ व टिपा

- **स्रोत/मूळ भाषा :** ज्या कलाकृतीचे भाषांतर करायचे आहे त्या कलाकृतीची भाषा
- **लक्ष्य भाषा :** ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे ती भाषा.
- **जनक भाषा :** ज्या भाषेतून उदय झाला ती भाषा.
- **बहुसांस्कृतिक :** अनेक संस्कृतींनी समृद्ध
- **प्रयोजन :** हेतू/उद्देश
- **बहुराष्ट्रीय :** जगातील अनेक देशांमध्ये विस्तारलेली
- **बहुभाषिक :** अनेक भाषांनी समृद्ध.
- **आर्ष महाकाव्य :** ज्यांचा कर्ता ज्ञात नाही अथवा ऋषिमुनींनी लिहिलेली महाकाव्ये.
- **निषिद्ध :** त्याज्य, असंमत.
- **निष्णात :** निपुण
- **सर्जन :** उत्पत्ती /नवनिर्मिती
- **सर्जनशक्ती :** नवनिर्मितीची क्षमता
- **अन्वर्थक :** यथार्थ/रास्त

४.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

थोडक्यात उत्तरे लिहा.

प्रश्न : बहुभाषिक भारतातील अनुवादप्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट करा.

प्रास्ताविक : मानवी समाज हा भिन्नभाषिक आणि परस्परभिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमीत जगणारा आहे. सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विविध समाजगट अस्तित्वात आल्यामुळेच जगभरात अनेक भाषा-बोलींचा उदय झालेला आहे. एकूण मानवी समाजजीवनाचा विचार करता, अस्तित्वात आलेल्या विविध भाषा-बोलीच परस्परसंवाद प्रस्थापनेसाठी बऱ्याच वेळा एक अडथळा बनतात, असे दिसते. भारतात हा अनुभव सतत येत राहतो. भारत हा विविध भाषा व बोलींनी समृद्ध असलेला देश आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत येथे सर्वाधिक भाषिक विविधता दिसून येते. त्यामुळे येथील अनेक प्रश्नांच्या मुळाशी ही भाषिक विविधता आहे.

विवेचन : भारतातील भाषिक विविधता शिक्षण, समाजकारण, राजकारण अशा अनेक क्षेत्रांतील

अडचणी भाषेच्या पातळीवरच्या असतात. भारतामध्ये सामाजिक स्तराबाबतीत जशी एक उतरंड दिसते, त्यानुसारच त्या त्या समाजाच्या भाषांना प्रतिष्ठा आहे. भाषा ही अस्मितेशी आणि भूमीशी बांधून ठेवणारी गोष्ट असल्याने दक्षिणेतील अनेक राज्यांमध्ये हिंदी भाषेला विरोध झालेला आहे. त्मामुळे उत्तरेकडील राज्यातील लोकांना दक्षिणेतील लोकांशी संपर्क साधताना येणारा अडथळा हा भाषिक पातळीवरचा असतो. हा अडथळा दूर करण्यासाठीच अनुवाद-भाषांतरांची मदत घ्यावी लागते. संवाद-संपर्क हा केवळ एक उद्देश झाला. याव्यतिरिक्त अनेक क्षेत्रांमध्ये अनुवाद-भाषांतराची मदत घ्यावी लागते. शिक्षण, साहित्य, राजकारण, प्रशासन, उद्योग-व्यापार अशी अनेक क्षेत्रे भाषांतर-अनुवाद प्रक्रियेमुळे विस्तारत आहेत. ही आणि अनेक क्षेत्रांमध्ये अनुवादाची गरज वाढत चाललेली आहे. जागतिकीकरणानंतर इंग्रजीसारख्या भाषेच वाढलेले महत्त्व आणि उद्योग व्यवसायाच्या वृद्धीसाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना स्थानिक भाषा-बोलींची धरावी लागलेली कास अनुवादप्रक्रियेला गती देणारी आहे. भाषा ही भूमीशी जोडून ठेवणारी गोष्ट असते. याचे भान उद्योगव्यवसायिकांना आलेले आहे. परकीय कंपन्यांनी जाहिरात माध्यमात घेतलेल्या स्थानिक भाषांच्या आधारावरून ही गोष्ट लक्षात येते. या जाहिरातींवरून असे लक्षात येते की, येथे केवळ वस्तू विकली जात नाही; तर त्या वस्तुविषयी एक भाव ग्राहकाच्या मनामध्ये तयार केला जातो. कारण व्यवसायात वस्तू एकदा विकून चालत नाही, तर त्या वस्तूचा ग्राहक तयार व्हावा लागतो.

समारोप : भारतामध्ये असणारी भाषांची विविधता उद्योग व्यवसायिकांसमोरील एक अडचण असते. त्यातूनच अनुवादप्रक्रियेला महत्त्व मिळू लागले आहे. त्यामुळे भारतातील भाषिक विविधता ही व्यावसायिकांपुढील अडचण असली तरी, अनुवादकांसाठीची मोठी संधी आहे.

४.९ सरावासाठी प्रश्न

१. अनुवादाचे महत्त्व स्पष्ट करा.

२. अनुवादकाचे गुण लिहा.

३. अनुवादासाठी करावी लागणारी पूर्वतयारी लिहा.

४. बहुभाषिक समाजातील भाषांतराचे स्थान लिहा.

५. विविध क्षेत्रातील अनुवादाचे स्वरूप लिहा.

६. अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर या प्रक्रियेतील भेद स्पष्ट करा.

४.१० अधिक वाचन

१. भाषांतरमीमांसा : संपा. कल्याण काळे डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२. भाषांतर : डॉ. सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

४.११ उपक्रम

१. विविध भाषांमधून मराठीमध्ये अनुवादित झालेल्या वीस पुस्तकांची सूची तयार करा.

२. भाषा आणि जीवन पुणे या त्रैमासिकामधील अनुवादावरील लेख वाचा.

❑❑❑